# नरेंद्र मोदी

## एका कर्मयोग्याची संघर्षगाथा

प्रा. विनायक आंबेकर

**अग्नीपंख पब्लिकेशन**
ॲण्ड मिडिया सर्विसेस

**नरेंद्र मोदी**
एका कर्मयोग्याची संघर्षगाथा

■

**प्रकाशक :**
अग्नीपंख पब्लिकेशन
ॲण्ड मिडिया सर्विसेस
बी १०१, भारत भवन,
१३६०, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२
फोन : ०२०-२४४७८५२५

■

© २०१६, सौ. अमीता विनायक आंबेकर

■

**प्रथमावृत्ती :** मे २०१६

■

**कव्हर डिझाईन :** गिरीष सहस्त्रबुध्दे

■

**टाइपसेटिंग :**
स्मिता टाईपसेटर्स,
११२०, सदाशिव पेठ,
निंबाळकर तालीम चौक,
पुणे ४११०३०.

■

**मुद्रणस्थळ :**
स्मिता प्रिंटर्स,
१०१९, सदाशिव पेठ
पुणे ४११०३०.

■

**मूल्य १२० रुपये**

*राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा व अन्य क्षेत्रातील*
*विविध संस्था-संघटनांमध्ये त्यांच्या कार्याशी एकरूप होऊन*
*व आपल्या आयुष्याचे समर्पण करून काम करणाऱ्या*
*असंख्य संघ प्रचारकांना (पूर्ण वेळ कार्यकर्त्यांना)*
*आदरपूर्वक अर्पण*



# मनोगत

*"माणसाची खरी ताकद ही शारीरिक क्षमतेतून येत नाही तर माणसाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीतून (Indomitable will) येत असते." असे महात्मा गांधींचे प्रसिद्ध वाक्य आहे. सर्व यशस्वी व्यक्तींना हे वाक्य लागू होते. अशाच दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर २०१४ सालच्या निवडणुकीत नरेंद्र मोदींनी नवा इतिहास घडवला. स्वातंत्र्योत्तर भारतात जन्माला आलेले पहिले पंतप्रधान बनताना, स्पष्ट बहुमत मिळवणारे बिगर काँग्रेसी पहिले नेतेदेखील नरेंद्र मोदीच बनले. स्पष्ट बहुमताने पंतप्रधान बनलेले नेहरू-गांधी परिवाराच्या बाहेरचे ते पहिले पंतप्रधान आहेत. वडनगरसारख्या देशाच्या कोपऱ्यातल्या छोट्या खेड्यातल्या गरीब घरात जन्मलेल्या मोदींनी २०१४ च्या निवडणुकीत त्याआधी सलग १० वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेस पक्षाचा जो दारूण पराभव केला त्याला भारतीय लोकशाहीच्या इतिहासात तोड नाही. यामुळे नरेंद्र मोदी एकदम चर्चेत आले. त्यांच्याविषयी बरे-वाईट सांगण्याची व लिहिण्याची मोठी स्पर्धा प्रसारमाध्यमांमध्ये सुरू झाली.*

*तसे २००२ च्या गोध्रा हत्याकांडानंतरच्या दंगलीनंतर नरेंद्र मोदींवर प्रसारमाध्यमे सतत विनाकारण टीका करीत होतीच, पण नंतर २००२ ते २०१२ पर्यंत ज्या वेगाने त्यांनी गुजरातचा विकास केला त्यामुळे काँग्रेस व इतर विरोधी पक्षांनीदेखील आपल्या शत्रूंच्या यादीत त्यांना प्रथम क्रमांक दिला. २०१३ साली भारतीय जनता पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून त्यांच्या*

*नावाची घोषणा झाल्यावर या सर्वांनी मोदींच्या बदनामीसाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. मात्र सोशल मिडियाच्या उत्कृष्ट वापराने मोदींनी या सर्व अपप्रचाराला समर्थपणे तोंड दिले आणि ऐतिहासिक यश मिळवले. या गदारोळात मोदींचं व्यक्तिमत्त्व नेमकं कसं आहे आणि एवढ्या उच्च यशापर्यंतचा त्यांचा प्रवास नेमका कसा झाला याची वस्तुनिष्ठ माहिती वाचकांपर्यंत फारशी आली नाही.*

*पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून घोषणा झाल्यावर मोदींवर निघालेली बहुतेक पुस्तकं त्यांच्या राजकीय भूमिकेचं समर्थन किंवा टीका अथवा विश्लेषण करणारी आहेत. एक व्यक्ती म्हणून ते कसे आहेत, ते तसे कशामुळे घडले आणि आपल्या जीवनात त्यांना सतत कसा संघर्ष करावा लागला याचा तपशील वाचकांसमोर फारसा आला नाही.*

*६० वर्षे देशावर राज्य कारणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या राजकारण्यांचा विचार केला तर त्यांची राजकारणात येण्याची प्रेरणा– सत्ता लालसा (सत्ता उपभोगण्याची हौस), पैसा-प्रसिद्धी याची हाव, व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा, कुटुंबियांचा – पक्षाचा आदेश, सत्ता कुटुंबाबाहेर जाऊ नये ही इच्छा – अशा वेगवेगळ्या प्रेरणा दिसून येतात. त्याउलट नरेंद्र मोदींची प्रेरणा निःस्वार्थीपणे देशसेवा करण्याची, उच्च दर्जाची प्रेरणा आहे. त्यांच्यात शब्दात सांगायचे तर, ''मी माझ्या आयुष्यात काही बनायचे स्वप्न कधीच पाहिले नाही, मात्र काय काय करायचे आहे याची स्वप्नं मी नेहमी पाहिली.''*

*नरेंद्र मोदींच्या आजवरच्या जीवन प्रवासाची आणि त्यांच्या जीवनशैलीची माहिती घेतली तर पुढील गोष्टी प्रकर्षाने पुढे येतात. ते संपूर्ण शाकाहारी आहेत. लहानपणापासून पूर्णतः धार्मिक प्रवृत्तीचे आहेत. लहानपणापासून सातत्याने नवरात्रात नऊ दिवस कडक उपास करतात आणि फक्त पाण्यावर राहतात. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या शाही जेवणात ते वाईन-दारू तर नाहीच, पण कोल्ड्रींक पण पीत नाहीत. फक्त चहा, कॉफी किंवा लिंबू-पाणी पितात. काव्य-लेखन-वाचन सोडले तर त्यांना अन्य कोणताही छंद वा विरंगुळा नाही. सार्वजनिक जीवनात उच्च नीतिमत्ता पाळण्यासाठी त्यांनी माता हिराबा सोडता अन्य बहिण-भावांशी जाणीवपूर्वक संपर्क ठेवलेला नाही. माता हिराबा हिलासुद्धा ते निमित्तमात्रच भेटतात. त्यांना फारसे व्यक्तिगत मित्र नाहीत. आपल्या मित्रांसाठी त्यांनी गेल्या कित्येक वर्षांत वेळ वाया घालवलेला नाही.*

*ते रोज रात्री फक्त ४-५ तास झोपतात. उरलेल्या वेळापैकी वैयक्तिक – स्वत:साठी ते फक्त दोन तास देतात. त्यातील बराचसा वेळ हा ध्यानधारणा, योगसाधनेसाठी असतो. उरलेला सर्व वेळ म्हणजे दिवसाचे १६ ते १८ तास नरेंद्र मोदी फक्त आणि फक्त सार्वजनिक कामासाठीच देतात. अशा प्रकारचा दिनक्रम १९७२ साली संघप्रचारक झाल्यापासून गेली ४४ वर्षे अव्याहतपणे चालवला आहे. एवढ्या प्रदीर्घ काळात त्यांनी एकही सुट्टी घेतलेली नाही. संघ-भाजपा प्रचारक म्हणून काम करत असताना एखादे वेळेस आज काही काम नाही अशी वेळ आली असेल. मात्र ऑक्टोबर २००१ मध्ये मुख्यमंत्री झाल्यापासूनची साडेतेरा वर्षे आणि पंतप्रधान झाल्यापासूनची गेली सुमारे दोन वर्षे अशी गेली साडेपंधरा वर्षे (सुमारे ५५०० दिवस) वरील दिनक्रमानुसार ते सतत सार्वजनिक काम करत आहेत. या ५५०० दिवसांत त्यांनी एकही सुट्टी घेतलेली नाही. त्यांचा व्यक्तिगत खर्च अत्यल्प आहे आणि आपल्या पदासाठी मिळणाऱ्या पगारातूनच तो खर्च ते करतात. त्यांना मिळालेल्या सर्व भेटवस्तूंचा ते जाहीर लिलाव करतात आणि त्यातून मिळालेला पैसा परस्पर कन्या केळवाणीसारख्या समाजोपयोगी उपक्रमात जमा करतात. आपल्या पगारातील बराचसा भाग ते समाजासाठीच खर्च करतात. मुख्यमंत्रीपद सोडताना त्यांच्या पगारातून त्यांनी केलेल्या बचतीची सर्व २१ लाखांची रक्कम त्यांनी मुख्यमंत्री कार्यालयात/निवासात काम करणाऱ्या तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी दान केली आहे. वैयक्तिक नीतिमत्तेचा ते आदर्श आहेत. आपल्या सरकारी बंगल्यात आपल्या नातेवाईकांना त्यांनी कधी बोलावले नाही. आपल्या कोणत्याही नातेवाईकाच्या कामासाठी आपल्या अधिकारांचा कधीही वापर केला नाही. साडेतेरा वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत गुजरात शासनात नोकरी करणाऱ्या आपल्या लहान भावाला ते एकदाही एकट्याने कामाशिवाय भेटले नाहीत.*

*ही उच्च नीतिमत्ता, ही त्यांची कार्यनिष्ठा, सर्वस्व अर्पण करून काम करण्याची वृत्ती, काँग्रेस व विरोधकांच्या वैयक्तिक आणि गलिच्छ टीकेनंतरही त्यांनी पाळलेला संयम आणि ऐतिहासिक विजय मिळाल्यावर त्यांनी दाखवलेली अलिप्तता नरेंद्र मोदींमधल्या कर्मयोग्याचे दर्शन घडवते. कोणत्याही सामान्य माणसाला अशक्यप्राय वाटतील अशा या गोष्टी फक्त योगी व्यक्तीच्या*

जीवनाची सहज अंगे असू शकतात.

आपल्या देशातील अन्य राजकारण्यांनी चालवलेल्या स्वार्थी आणि भ्रष्ट राजकारणाच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदींचं पंतप्रधान होणं हे आपल्या देशाला मिळालेलं वरदानच आहे. ''मी एक पैसा खाणार नाही आणि कुणाला खाऊ देणार नाही'' या घोषणेनं आणि आपल्या कामाच्या धडाक्यानं नरेंद्र मोदींनी आपणा सर्व भारतीयांच्या मनात विकसित – समृद्ध भारताचं स्वप्न नव्याने जागवलं आहे. त्यामुळे अशा कर्मयोग्याची माहिती सर्व समाजापुढे आणि विशेष करून सर्व तरुणांपुढे येणं आवश्यक आहे असे वाटल्याने हे पुस्तक लिहिले आहे. तुम्ही-आम्ही सामान्य नागरिक आपल्या आयुष्यात जो संघर्ष करतो त्यापेक्षा कितीतरी कठीण संघर्ष मोदींना त्यांच्या आयुष्यात करावा लागला. पक्षातले आणि पक्षाबाहेरचे विरोधक त्यांचा सतत द्वेष करत राहिले, त्यांना सर्व प्रकारे अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत राहिले. सामान्य वकुबाच्या पक्ष सहकाऱ्यांनी त्यांचा अपमान केला, टोकाला जाऊन त्यांना विरोध केला. परंतु या सगळ्या नकारात्मक घटनांमध्येही नरेंद्र मोदींना त्यांच्या उत्कृष्ट गुणांमुळे सतत प्रगतीच्या नवनवीन संधी मिळत गेल्या.

आजच्या स्पर्धात्मक जगामध्ये उच्च ध्येयाच्या प्राप्तीसाठी धडपडणाऱ्या युवा वर्गाला नरेंद्र मोदींच्या या गुणांचा परिचय करून द्यावा हा देखील या पुस्तकामागचा हेतू आहे. या महान व्यक्तीने आयुष्यभर सतत केलेला संघर्ष आणि प्रत्येक वेळी त्यात मिळवलेला विजय मी वस्तुनिष्ठ पद्धतीने तुमच्यासमोर मांडला आहे. मोदींच्या आयुष्यातील प्रत्येक महत्त्वाच्या वळणावर त्यांच्या ज्या गुणांमुळे त्यांना यश मिळत गेलं, त्या गुणांची मी आवर्जून स्वतंत्रपणे नोंद केली आहे. नरेंद्र मोदींच्या आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांप्रमाणे मी प्रकरणांची रचना केली आहे. यामुळे त्यांच्या बदलत्या भूमिकांमधला त्यांचा इतरांशी आणि स्वत:शी झालेला संघर्ष आणि त्यात त्यांनी मिळवलेलं यश वाचकांसमोर सविस्तर व स्पष्टपणे उलगडले जाईल.

नरेंद्र मोदी हे एक अत्युच्च दर्जाचं गुणसंपन्न व्यक्तिमत्त्व आहे. आजच्या तरुणांनी आणि त्यांच्या पालकांनी या व्यक्तिमत्त्वाकडून काही गुण घ्यावे आणि आपल्या देशाच्या प्रगतीत आपले स्वत:चे अंशदान आवर्जून द्यावे ही प्रेरणा देण्याच्या हेतूने हे पुस्तक लिहिले आहे.

*या पुस्तकाच्या लेखनास प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या कुटुंबियांचे आणि माझ्या पत्नीचे ऋण व्यक्त करतो. या पुस्तकाच्या निमित्ताने आपण बाल व तरुणांसाठी प्रेरणादायी पुस्तक निर्मितीच्या कामाला सुरुवात करूया अशी सूचना करणारे माझे सामाजिक कामातील सहकारी डॉ. दीपक वेडे व सौ. प्रीती ठकार यांचे आभार मानतो. या पुस्तकाच्या निर्मितीमध्ये अक्षरजुळणी, मुद्रण, मुखपृष्ठ व प्रूफरिडींग अशा सर्व कामात मदत करणाऱ्या सहकाऱ्यांना धन्यवाद देतो.*

*मित्रांनो, आपल्या प्रतिक्रियांचं जरूर स्वागत आहे!*

**प्रा. विनायक आंबेकर**

Email:ambekar.v@vsnl.net

cell : 9822044520

# अनुक्रम


मनोगत ........................................................ ५

- वडनगरचे बालपण ........................................ ११
- स्वप्नपूर्तीच्या शोधात ....................................... २५
- संघ समर्पित दिवस ........................................ ३३
- राजकारणाच्या पटावरील दिवस ........................ ५४
- सर्वोत्तम मुख्यमंत्री ........................................... ८२
- अंतिम ध्येयाकडे झेप .................................. १२२

संदर्भ सूची .............................................. १३६


✦✦

# वडनगरचे बालपण

**व**डील दामोदरदास मोदी आणि आई हिराबा यांच्या तिसऱ्या अपत्याचा जन्म १७ सप्टेंबर १९५० रोजी झाला. त्याचं नाव ठेवलं नरेंद्र. दामोदरदास मोदी यांचं कुटुंब गुजरात राज्यातल्या मेहसाणा जिल्ह्यातल्या वडनगर या छोट्याशा गावात राहत असे. या दांपत्याला एकूण ५ मुलगे आणि एक मुलगी होती.

नरेंद्रचे जन्मस्थान वडनगर. हे १९५० साली सुमारे आठ हजार लोकवस्तीचं खेडेगावच होतं. गावाला सुमारे २५०० वर्षांपूर्वीपासूनची परंपरा आहे. महाभारतामध्ये देखील वडनगरचा उल्लेख अनार्तपूर असा असल्याचं तेथील रहिवासी सांगतात. येथील अनार्त योद्धे महाभारततली प्रसिद्ध लढाई कौरव आणि पांडव दोघांच्याही सैन्यात सामील होऊन लढले असे रहिवासी सांगतात. पुरातत्त्व खात्यानं केलेल्या अलीकडच्या काळातील उत्खननात वडनगर येथे पूर्वीच्या काळी एक समृद्ध सांस्कृतिक व धार्मिक महत्त्वाचं शहर असल्याच्या खुणा दर्शवणारे अवशेष मिळाले आहेत. वडनगरला प्राचीन काळी बोधीसत्त्वाची मूर्ती आणि बौद्ध विहार असल्याचा उल्लेख चिनी प्रवासी ह्युअॅनसँग याच्या प्रवास वर्णनातही आढळतो.

नरेंद्रला दोन मोठे भाऊ सोमा आणि अमृत आणि दोन छोटे भाऊ प्रल्हाद आणि पंकज. नरेंद्रच्या बहिणीचे नाव वासंती आहे. मोदी कुटुंब हे मोढ घांची या इतर मागासवर्गीय संवर्गामध्ये (OBC) समाविष्ट असलेल्या समाजातलं. या समाजाचा परंपरागत व्यवसाय तेल गाळण्याचा होता. नरेंद्रचे वडील देखील या परंपरागत तेल आणि किराणाच्या व्यवसायात होते. परंतु तो व्यवसाय नीट चालत नसल्याने वडनगरच्या रेल्वे स्टेशनवर ते चहाचा स्टॉल चालवत असत.

मोदी कुटुंब परंपरागत पद्धतीच्या एक मजली मातीच्या छोट्याशा

घरात राहत असे. सुमारे चारशे चौरस फुटाच्या तीन खोल्यांच्या या घरातील एका खोलीला खिडक्या नव्हत्या. त्याकाळी स्वयंपाक लाकडे पेटवून केलेल्या चुलीवर केला जात असे. त्याकाळी वीज उपलब्ध नसल्याने रॉकेलच्या दिव्यावर रात्र घालवावी लागे. या दोन्हीमुळे घरात धूर भरलेला असे. त्याकाळी मुले शौचाला, आंघोळीला नदीवर किंवा तलावावर जात असत. पिण्याचे पाणी देखील नदीवरून भरून आणावे लागत असे. एकंदरीत नरेंद्रची लहानपणीची परिस्थिती अत्यंत हलाखीची आणि कष्टाची होती.

नरेंद्रचे प्राथमिक शिक्षण वडनगरमधील सरकारी शाळेत पूर्ण झाले. नंतर माध्यमिक शिक्षणासाठी त्याला वडनगरच्या भागवताचार्य नारायणाचार्य हायस्कूलमध्ये प्रवेश देण्यात आला. या शाळेला वडनगरमध्ये बी.एन. हायस्कूल म्हणून ओळखतात. ही शाळा देखील सामान्य वर्गातल्या मुलांची शाळा म्हणूनच ओळखली जाते. मात्र आपल्या उच्च दर्जा बाबतही शाळा ओळखली जाते. नरेंद्रच्या डोक्यात तेव्हा सैनिकी शाळेत जाऊन सैनिक बनण्याची देखील इच्छा होती. परंतु सैनिकी शाळेची फी परवडणारी नसल्याने त्याची ती इच्छा पूर्ण झाली नाही.

नरेंद्रला लहानपणापासूनच कष्टाची सवय लागली. वडील आपले वडिलोपार्जित किराणा दुकान सांभाळून रेल्वे स्टेशनवर चहाचा स्टॉल चालवत असत. त्यामुळे त्यांना मदतीची आवश्यकता होतीच. लहानपणी मोठा भाऊ सोमा याच्याबरोबर नरेंद्र देखील वडिलांच्या चहाच्या स्टॉलवर मदतीला जाऊ लागला. पुढे थोडा मोठा झाल्यावर शाळा सांभाळून उरलेल्या वेळात नरेंद्र स्वतंत्रपणे वडिलांना मदत करत असे. नरेंद्र आपल्या भावाला स्वयंपाकात देखील मदत करत असे. लहान भावंडांच्या जन्माच्या वेळी मोठा भाऊ सोमा घरचे स्वयंपाकघर सांभाळत असे आणि नरेंद्र त्याला मदत करायचा. नरेंद्रला त्या वयात देखील स्वयंपाक चांगला जमायचा. खमंग, तेलकट, तिखट पदार्थांचे नरेंद्रला फारसे आकर्षण नसायचे पण गूळ मात्र आवडायचा.

लहानपणापासूनच नरेंद्रचे वेगळेपण दिसून येत होते. बालसुलभ आकर्षणे ही त्याच्या स्वभावातच नव्हती. खाऊ, खेळणी, पुस्तके यासारख्या गोष्टींसाठी त्याने कधीच हट्ट धरला नाही. या तीन गोष्टींवरूनच लहान मुलांमध्ये

भांडणे होत असतात. त्यामुळे लहानपणी नरेंद्र आपल्या भावंडांशी कधीच भांडत नसे. एखादी गोष्ट त्याच्या मनाविरुद्ध केली तर तो तासन्तास मौन धरून कोपऱ्यात बसत असे.

नरेंद्रच्या घरचे वातावरण धार्मिक होते. त्यामुळे धार्मिक वृत्तीचे संस्कार लहानपणीच नरेंद्रवर झाले. नवरात्रामधील नऊ दिवस काहीही अन्न न घेता कडक उपवास करायला नरेंद्रने कळत्या वयापासूनच सुरुवात केली आणि आजही ते उपवास नरेंद्र मोदी करतात. नरेंद्रला आपल्या आई-वडिलांबद्दल प्रचंड आदर आहे. स्वत:च्या आई हिराबा यांच्यावर त्यांची अनन्य श्रद्धा आहे. आपल्या आजपर्यंतच्या आयुष्यात प्रत्येक वेळी नवीन जबाबदारी स्वीकारताना मोदी आपल्या आईचा आशीर्वाद घेतात. गुजरातमध्ये असले तर आपल्या प्रत्येक वाढदिवसादिवशी ते आईचा आशीर्वाद घेतात. आपल्या किशोर वयात नरेंद्र जेव्हा संन्यास घेण्याच्या ध्यासाने घराबाहेर पडून भटकंतीला निघाले तेव्हा त्यांनी फक्त अंगावरचे कपडे आणि आईचा फोटो एवढेच सामान आपल्या जवळ बाळगले होते.

आपले वडील दामोदरदास यांच्याबद्दल नरेंद्रला भीतीयुक्त आदर होता. स्वत: दामोदरदास यांना आपल्या या मुलाबद्दल खूप कौतुक होते. इतर मुलांपेक्षा कितीतरी प्रकारे वेगळा वागणाऱ्या या मुलाबद्दल सुरुवातीला त्यांना खूप काळजी वाटे. त्याच्या वयाची मुले जेव्हा दंगा-मस्ती करत असत तेव्हा, त्यांचा मुलगा मोठ्या मोठ्या पुस्तकात डोके खुपसून वाचत बसत असे. एकदा त्यांनी न राहवून एका साधूला नरेंद्रचा हात दाखवला. त्या साधूने त्यांना सांगितलं की, "तुमचा हा मुलगा खूप मोठा होणार आहे. एकतर तो फार मोठा साधू होईल किंवा मोठा नेता होईल." त्यानंतर वडिलांना आपल्या या मुलाबद्दल अपार कौतुक असे. त्या काळच्या प्रथेनुसार त्या दोघा बाप-लेकात फारशा गप्पा होत नसतील पण दोघांनाही एकमेकांबद्दल अपार प्रेम होतं.

प्राथमिक शाळेत असतानाच वयाच्या सातव्या वर्षी नरेंद्रचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेशी संबंध आला. नरेंद्रला लहानपणापासूनच व्यायामाची आणि खेळाची आवड होती. या आवडीमुळे तो संघ शाखेकडे वळला. पुढील आयुष्यात नरेंद्रला मानसपुत्र मानणाऱ्या लक्ष्मणराव इनामदारांनी त्याला संघकार्याची शपथ दिली. त्यामुळे त्या वयातही नरेंद्र दिवसा शाळा

नंतर गृहपाठ, सायंकाळी संघ शाखा आणि यातून उरलेला सर्व वेळ वडिलांना चहाच्या स्टॉलवर मदत असा भरगच्च दिनक्रम पाळत असे. सतत कामात मग्न राहण्याची सवय त्यांनी आयुष्यभर चालू ठेवली आहे.

पडेल ते काम करण्याची सवय देखील नरेंद्रला लहानपणापासून लागली आहे. वडिलांच्या रेल्वे स्टेशनवरील चहाच्या स्टॉलवर तो पडेल ते काम करत असे. चहा देणे, रेल्वेमध्ये किंवा प्लॅटफॉर्मवर 'चहा, चहा' असे ओरडून चहा विकणे, कप विसळणे, टेबल किंवा काउंटर साफ करणे, फडकी धुणे अशी सर्व प्रकारची कामे बाल नरेंद्र न लाजता करत असे. या कामांची नरेंद्रला लाज कधीच वाटली नाही. उलट आपण आपल्या वडिलांना त्यांच्या कामात मदत करतो याचा त्याला अभिमान वाटत असे.

नरेंद्र लहानपणापासूनच निर्भीड आणि धाडसी स्वभावाचा होता. वडनगर या गावात पुरातन असा शर्मिष्ठा तलाव आहे. या तलावात पोहण्याचा नरेंद्रला छंद होता. डॉ. सुधीर जोशी या त्यांच्या बालमित्राने सांगितले की, लहानपणी ते दोघे या तलावात पोहायला जात असत. गावच्या या तळ्यामध्ये मध्यभागी एक बेट आहे. या बेटावर एक प्राचीन मंदिर आहे. कोणत्याही मंदिरावर असतो त्याप्रमाणे त्या मंदिरावरही ध्वज होता पण तो जीर्ण होऊन फाटला होता. मंदिराचा पुजारी तीर्थयात्रेला गेल्यामुळे बरेच दिवस तो ध्वज बदलला गेला नव्हता. हा ध्वज फाटला आहे आणि तो बदलायला हवा अशी चर्चा गावामध्ये होत होती. परंतु त्या बेटाजवळ मगरी आहेत आणि त्या जवळ आलेल्या माणसांना मारून खातात असा गावकऱ्यांचा समज असल्याने घाबरून कोणी मंदिराकडे जायला तयार होत नव्हते. १२ वर्षांच्या नरेंद्रच्या कानावर ही चर्चा आली. एके दिवशी घरी न सांगता हातात ध्वज घेऊन नरेंद्रने तलावात उडी मारली आणि मंदिरावरचा जीर्ण ध्वज बदलून आला देखील. पुढे बरेच दिवस गावकऱ्यांमध्ये बाल नरेंद्रच्या या धाडसाची चर्चा होती. या तलावात पोहताना एकदा नरेंद्रच्या हातात एक मगरीचे पिलू सापडले. इतर मुले घाबरून पळून गेली, पण नरेंद्रने त्या पिल्लाला उचलून आपल्या घरी आणले. आईने समजावल्यावर नरेंद्र त्या पिल्लाला तलावात सोडून आला.

बी.एन. हायस्कूलमध्ये देखील नरेंद्र त्याच्या धीटपणाबद्दल प्रसिद्ध होता. नरेंद्रच्या हरीश पटेल नावाच्या वर्गमित्राने नरेंद्रच्या धीटपणाची गमतीदार

गोष्ट सांगितली. शाळेमध्ये एकदा ९वी च्या वर्गातील चार आडदांड मुले ६वी च्या वर्गातल्या एका मुलाला छोट्याशा कारणावरून मारत होती. तो मुलगा मार सहन न होऊन रडत होता. सर्व शाळेतील मुले गोळा होऊन हा प्रकार पाहत होती. परंतु त्या आडदांड मुलांना घाबरून कोणीही काहीच करत नव्हते. नरेंद्रला त्या मुलाचे रडणे सहन होईना. परंतु आपण एकटे त्या चार आडदांड मुलांशी लढू शकणार नाही आणि आपले घाबरट वर्गमित्र आपल्या मदतीला येणार नाहीत हे त्याने मनोमन ओळखले. मग नरेंद्रने आपल्या कल्पनाशक्तीचा वापर केला. त्याने आपले शाईचे पेन उघडले आणि मारहाण करणाऱ्या त्या आडदांड मुलांच्या शर्टावर त्यातली शाई उडवली. लगेचच तो पळत मुख्याध्यापकांच्या कार्यालयात गेला आणि त्यांना घेऊन आला. मुख्याध्यापकांना येताना पाहून सगळी मुले वर्गात पळून गेली. परंतु तो मुलगा रडत तेथेच थांबला होता. मुख्याध्यापकांनी ९वी च्या वर्गात जाऊन सर्व मुलांना उभे केले. प्रत्येकजण 'मी तो नव्हेच– मी काहीच केले नाही' असा नेहमीचा बचाव करू लागला, परंतु नरेंद्रने आपल्या कल्पनाशक्तीने त्यांची ओळख परेड आधीच करून ठेवली होती. शर्टवरच्या शाईच्या डागांमुळे ती चारही मुले पकडली गेली आणि मुख्याध्यापकांनी त्यांना चांगलीच शिक्षा दिली.

याच वर्गमित्राने सांगितले की, आमच्या वर्गातली बाकीची मुले मुख्याध्यापक आणि वर्गशिक्षकांना घाबरायची मात्र नरेंद्र कोणत्याही शिक्षकांना भेटून आपले म्हणणे बेधडकपणे मांडायचा. वर्गप्रतिनिधीच्या निवडणुकीच्या वेळी गावातल्या प्रतिष्ठित किंवा वजनदार घरातल्या मुलांची नावे सहजगत्या पुढे यायची. इतर मुले घाबरून त्या नावांना विरोध करत नसत. मात्र नरेंद्रने असा विचार कधीच केला नाही. त्याला हवा तो सामान्य घरातला मुलगा निवडून त्याला नरेंद्र वर्गप्रतिनिधी पदासाठी निवडणूक लढवायला लावत असे आणि युक्त्याप्रयुक्त्या करून निवडूनही आणत असे.

आपल्या मुद्द्यावर ठाम राहण्याचा नरेंद्र मोदींचा स्वभाव लहानपणापासूनच दिसून येतो. त्यांच्या संस्कृत शिक्षकांनी सर्व मुलांना गृहपाठ दिला. नदी या शब्दाची विभक्ती रूपे लिहून आणा. दुसऱ्या दिवशी तो गृहपाठ स्वत: न तपासता वर्गप्रतिनिधीला दाखवा असे त्यांनी मुलांना सांगितले. वर्गप्रतिनिधीचे संस्कृतचे ज्ञान माहिती असल्याने सर्व मुलांना हसायला आले. परंतु घाबरून

सर्व मुलांनी गुपचूप आपापला गृहपाठ वर्गप्रतिनिधीला दाखवला. नरेंद्रने मात्र ठामपणे नकार दिला. माझी वही तपासण्याचा अधिकार फक्त शिक्षकांनाच आहे असे त्यानी वर्गप्रतिनिधीला सांगितले, आणि आपली वही संस्कृतच्या शिक्षकांनाच तपासायला लावली.

प्रल्हाद पटेल या नरेंद्रच्या शिक्षकांनी एका मुलाखतीत असे सांगितले की, नरेंद्र अतिशय प्रामाणिक व नियमित विद्यार्थी होता. परीक्षेमध्ये तो कधी पहिल्या नंबरमध्ये आला नाही. मात्र गृहपाठ तो नियमितपणे करीत असे. नरेंद्रचा ओढा शाळेतील अभ्यासेतर उपक्रमांकडे जास्त असे. शाळेत होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, नाटके यामध्ये तो हिरिरीने भाग घेत असे. प्रल्हाद पटेल यांनी वादविवाद मंडळ स्थापन केले होते आणि नरेंद्र त्यात अत्यंत नियमितपणे उपस्थित राहत असे.

नरेंद्र मोदींच्या शालेय दिवसांतील जडण-घडणीत कोणत्याही विशिष्ट शिक्षकाची फार मोठी भूमिका दिसत नाही. याचं प्रमुख कारण नरेंद्रकडे शिक्षकांना भेटायला व त्यांचे विशेष मार्गदर्शन घ्यायला वेळच उपलब्ध नसे. शाळेचे तास संपल्यावर संघ स्थानावर जाण्याची घाई असे आणि शाळेत जाण्यापूर्वी आणि शाळा संपल्यावर मधल्या उपलब्ध वेळेत तो वडिलांना मदत करायला रेल्वे स्टेशनवर चहाच्या स्टॉलवर जात असे.

नरेंद्र बालपणापासूनच सामाजिक प्रश्नांबाबत जागरूक होता. समाजाच्या अडचणीच्या प्रसंगात आपल्या हातून काही मदत केली जावी अशी सहज प्रवृत्ती त्याच्यामध्ये दिसून येते. विविध सामाजिक प्रश्नांबाबत नरेंद्रच्या मनात उत्सुकता जागृत करण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दैनंदिन संघशाखेत जाण्याने झाले. नरेंद्रला खेळ आणि व्यायामाची आवड असल्यामुळे प्रथमत: तो संघ शाखेत जाऊ लागला. मात्र व्यायाम आणि खेळाबरोबरच संघ शाखेत वैचारिक चर्चा देखील होतात. संघाच्या सर्व शाखांमध्ये प्रतिवर्षी सहा उत्सव साजरे केले जातात. या उत्सवात जसे कवायत आणि खेळांचे प्रात्यक्षिक सादर केले जाते तसे उत्सवांच्या निमित्ताने उत्तम वक्त्याचे भाषण देखील होते. या शिवाय 'सांघिक' म्हणजे स्वयंसेवकांचे एकत्रीकरण ठराविक काळाने घेतले जाते त्यातही उत्तम वक्ते 'बौद्धिक वर्ग' म्हणजे विशिष्ट विषयावर भाषण देतात. संघ ही देशप्रेमी व राष्ट्रवादी संघटना असल्याने संघाच्या शाखेवरील सर्व भाषणांचे विषय आपल्या देशाची

प्रगती, आपल्या देशापुढील समस्या, आपला दैदीप्यमान इतिहास आणि दुर्दैवी वर्तमान, आपल्या समाजापुढील प्रश्न आणि त्यावर संघाला अपेक्षित उत्तरे असेच असतात. शाखेवरील सर्व भाषणांमधून हिंदू समाजावर प्रेम करा, आपल्या देशावर प्रेम करा आणि आपले तन, मन, धन समाजाला आपल्या देशाला समर्पित करा असा संदेश स्वयंसेवकांना सतत दिला जातो.

नरेंद्र हा स्वभावत:च जिज्ञासू होता. त्याच्या संस्कारक्षम वयातच संघ शाखेवर त्याच्या कानावर समाज आणि देशप्रेमाचे विचार पडले. अनेक थोर नेत्यांची, समाजसुधारकांची नावे त्याच्या कानावर पडली. आपल्या हिंदू समाजापुढील अनेक प्रश्नांचा वेगवेगळ्या वक्त्यांनी केलेला उल्लेख नरेंद्रच्या कानावर पडला. स्वाभाविकच नरेंद्रची उत्सुकता चाळवली गेली. नरेंद्रने मोठ्या प्रमाणावर वाचनाची सुरुवात केली. शाखेवर ज्या महान पुरुषांचा उल्लेख झाला त्या छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, सुभाषचंद्र बोस आशा अनेक थोर व्यक्तींची चरित्रे त्यांचे विचार मांडणारी पुस्तके वाचून काढण्याचा सपाटा नरेंद्रने लावला. शाळेच्या ग्रंथालयातून जाडजूड पुस्तके घेऊन जाणारा नरेंद्र हा त्याच्या वर्गामित्रांच्यामध्ये चर्चेचा विषय झाला. वडनगरच्या वाचनालयातही तो वारंवार वाचताना दिसत असे.

या सर्वांच्या परिणामस्वरूप वयाच्या बाराव्या वर्षापासूनच नरेंद्रच्या वागण्या-बोलण्यामध्ये गंभीरता व समजूतदारपणा दिसू लागला. त्याच्या वयाच्या अन्य मुलांप्रमाणे आपला मुलगा वागत नाही म्हणून त्याच्या वडिलांना काळजी वाटायला लागावी इथपर्यंत परिस्थिती गेली होती. शेवटी वडिलांनी गावात आलेल्या साधूला त्याचा हात दाखवला, ''हा मुलगा मोठेपणी जर संन्यासी झाला तर मोठा आध्यात्मिक पुरुष होईल कदाचित शंकराचार्य देखील होईल. जर तो राजकारणात गेला तर फार मोठ्या पदापर्यंत पोहोचेल'' असे भविष्य साधूने सांगितल्यावरच वडील शांत झाले.

संघ शाखेतील संस्कार आणि स्वत: करत असलेले वाचन, चिंतन व मनन यातून नरेंद्र एक समाजसेवी वृत्तीचा, देशभक्त कार्यकर्ता म्हणून घडत होता. त्याच्या व्यक्तिमत्त्वात, विचार प्रक्रियेमध्ये त्या काळी कोणते

विचार पक्के होत होते याचे दर्शन आपल्याला पुढील काही प्रत्यक्ष घडलेल्या प्रसंगातून होते.

नरेंद्रने वयाच्या बाराव्या वर्षी त्यांच्या शाळेच्या स्नेहसंमेलनामध्ये एक एकपात्री नाटक सादर केले. नाटकाचे नाव होते 'पीला फूल.' या एकपात्री नाटकाचे लेखन देखील नरेंद्रनेच केले होते. नाटकाचे कथानक थोडक्यात असे होते, एक गरीब दलित स्त्री मोलमजुरी करून कसातरी आपल्या कुटुंबाचा सांभाळ करीत होती. अचानकपणे तिचा मुलगा आजारी पडतो. तिच्याकडे डॉक्टरची फी द्यायला पैसे नसतात त्यामुळे ती अनेक घरगुती उपचार करते पण मुलाच्या तब्येतीत काही फरक पडत नाही. असहाय्य होऊन ती स्त्री गावातील साधू, संत, श्रीमंत, डॉक्टर सर्वांकडे मदतीची याचना करते परंतु कोणीही तिला मदत करत नाही. थकून भागून ती असहाय्य स्त्री एका मंदिराच्या समोर रडत बसते. तेथून जाणारी एक व्यक्ती तिला सांगते की, समोरच्या मंदिरात एक पिवळे फूल प्रसाद म्हणून देतात ते आणून तुझ्या मुलाला दे. तो बरा होईल. मोठ्या आशेने ती माता मंदिरात जाऊन पुजाऱ्याकडे प्रसादाची याचना करते. परंतु तू दलित आहेस, तुला मंदिराचा प्रसाद मिळणार नाही असे म्हणून पुजारी तिला हाकलून देतो. त्या माऊलीचा मुलगा थोड्याच वेळात मरण पावतो.

अस्पृश्यतेच्या रूढीबद्दल परिणामकारक पद्धतीने भाष्य करणारी ही अवघ्या १२ वर्षांच्या मुलाने सादर केलेली एकांकिका सर्वांना सामाजिक समानतेची गरज समजावून गेली. नरेंद्रचे फार कौतुक झाले.

नरेंद्रला शाळेमध्ये असताना नाटकात काम करण्याची फार मोठी हौस होती. बी.एन. हायस्कूलमध्ये असताना जवळजवळ प्रत्येक वर्षी तो स्नेहसंमेलनात होणाऱ्या नाटकांमध्ये भाग घेत असे. १९६५ साली त्याने शाळेमध्ये होणाऱ्या 'जोगीदास खुभाण' या नाटकात भाग घेण्यासाठी नाव नोंदवले. सौराष्ट्रातून हद्दपार करण्यात आलेल्या जोगीदास नावाच्या दरोडेखोराच्या सत्यकथेवर आधारित हे नाटक होते. धाडसी नरेंद्रला खरेतर दरोडेखोराची भूमिका करायची इच्छा होती. परंतु दरोडेखोराच्या भूमिकेला शोभेशी शरीरयष्टी त्याच्याकडे नव्हती. त्यामुळे नरेंद्रला राजाची भूमिका मिळाली. राजाला लुटणाऱ्या जोगीदासला उपदेश करून त्याचे हृदयपरिवर्तन करण्यात राजा यशस्वी होतो असा नाटकाचा शेवट होता. नरेंद्रने राजाची

भूमिका अतिशय उत्तम साकारली. या नाटकाचे सर्वांनीच कौतुक केले. मतपरिवर्तन झालेला दरोडेखोर खरोखरीच संत झाला होता. अहमदाबादच्या अक्षरधाम मंदिरात याच संताचे 'स्वामी नारायणां'चे स्मृती स्थळ आजही आपल्याला पाहायला मिळते.

लगेचच पुढच्या वर्षी म्हणजे १९६६ साली नरेंद्रने 'हरियाळनो हत्यारा' या नाटकात एका भारतीय सैनिकाची भूमिका केली. चीनने भारतावर केलेल्या आक्रमणाच्या वास्तवावर हे नाटक आधारलेले होते. या वर्षीची सैनिकाची भूमिका पण नरेंद्रने चांगल्या प्रकारे केल्याने नरेंद्रच्या अभिनय कौशल्याची सर्व पालकांमध्ये चर्चा झाली.

याच सुमारास शाळेच्या कंपाउंडची भिंत दुरुस्त करण्यासाठी शाळेला पालक आणि इतर नागरिकांकडून निधी गोळा करण्याची गरज असल्याचे नरेंद्रच्या कानावर आले. निधी संकलनासाठी काय उपाय योजावेत? पालकांना आवाहन कसे करावे? असे प्रश्न मुख्याध्यापकांच्या समोर उभे होते. सामाजिक सेवेची नरेंद्रमधील ऊर्मी जागृत झाली. त्याने मुख्याध्यापकांसमोर एक प्रस्ताव मांडला. आपण गावात शाळेच्या मदतीसाठी म्हणून एक व्यावसायिक नाटकाचा प्रयोग करू. पालकांना आवाहन करून तिकिटे खरेदी करायला लावू आणि तिकीट विक्रीतून जमा झालेला पैसा शाळेच्या गरजेसाठी वापरू. नरेंद्रची कल्पना सर्व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी उचलून धरली. पालकांना एक चांगले नाटक पाहायला मिळाले तर शाळेला गरजेएवढे पैसे देखील मिळाले.

नरेंद्र नऊ वर्षांचा असतानाची गोष्ट. तेव्हा भारताच्या अनेक भागांत प्रचंड पाऊस पडला आणि तापी नदीला मोठ्ठा पूर आला. या पुरामुळे प्रचंड नुकसान झाले. लाखो लोक बेघर झाले आणि सर्वदूर ओल्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली. सर्व वर्तमानपत्रांतून ठिकठिकाणच्या नुकसानीच्या बातम्या येत होत्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते देशावर आलेल्या प्रत्येक नैसर्गिक आपत्तीमध्ये हमखास मदत कार्य सुरू करतात. ते त्या वेळीही त्यांनी सुरू केले होते. त्यामुळे संघ शाखेवरूनही मदतीचे आवाहन होत होते. शासकीय यंत्रणा आणि माध्यमे तर असे आवाहन करीत होतेच. या सर्व बातम्या वाचून आपण दुष्काळग्रस्तांना मदत करायचीच असा निश्चय तर नरेंद्रने मनाशी ठरवला. परंतु घरची परिस्थिती आर्थिक ओढग्रस्तीची

होती. आठ माणसांचे कुटुंब आणि मर्यादित उत्पन्न. त्यामुळे वडिलांकडून दुष्काळग्रस्तांसाठी पैसे मागणे नरेंद्रलाच चुकीचे वाटले.

तेवढ्यात श्रावण महिन्यात भरणारी वडनगर मधील गौरीकुंड येथील जत्रा सुरू झाली. नरेंद्रच्या वडिलांनी नरेंद्रला जत्रेत जाऊन मजा करण्यासाठी एक रुपया दिला. त्या वयातल्या इतर मुलांनी मिळालेला रुपया लवकरात लवकर खर्च कसा करायचा याचा विचार केला असता. नरेंद्रच्या मनात रुपया स्वत:साठी खर्च करण्याचा विचारच आला नाही. त्याच्या मनात विचार होता एवढ्या मोठ्या संकटात आपण फक्त एक रुपयाचीच मदत करायची का? नरेंद्रमधली समाजसेवी वृत्ती त्याला स्वस्थ बसून देत नव्हती. मग आपल्या कल्पक डोक्यातून त्यानं एक शक्कल लढवली. त्यानं सर्व वर्गमित्रांना बोलावून एक कल्पना त्यांच्यासमोर मांडली. सर्व मित्रांना घरून मिळालेले पैसे एकत्र करून भांडवल म्हणून वापरायचे. जत्रेत चहाचा स्टॉल लावून नफा कमवायचा आणि भांडवल अधिक नफा अशी मोठी रक्कम पूरग्रस्त सहाय्यता निधीला द्यायची. चहाच्या स्टॉलची इत्थंभूत माहिती नरेंद्रला होतीच. सर्वच मित्रांना ही नरेंद्रची कल्पना पसंत पडली असे नाही. परंतु ज्यांना पसंत पडली त्यांनी लगेचच पैसे एकत्र केले.

नरेंद्रने स्टोव्ह, भांडी, किटली, कप या सर्व साहित्याची तत्परतेने व्यवस्था केली. मित्रांनी जमा केलेल्या पैशांतून चहा, साखर, दूध व कच्चा माल जमा केला. जत्रेचे सर्व दिवस स्टॉल अतिशय उत्तम रीतीने चालवला. शेवटच्या दिवशी जमा झालेला नफा आणि मूळ मुद्दल अशी घसघशीत रक्कम पूर-निवारण निधीत जमा करण्यात आली.

समाजातील गरजूंचे, उपेक्षितांचे दु:ख दूर करण्याची सहज वृत्ती नरेंद्रमध्ये लहानपणापासून होती. संघ शाखेतील संस्काराने त्या ऊर्मीला संघटित स्वरूप देऊन अधिक परिणामकारकपणे मदत कार्य कसे करावे याचा वस्तुपाठ वयाच्या १५व्या वर्षी नरेंद्रला अनुभवता आला. एक समर्पित समाजसेवक घडण्याची ती पहिली पायरीच म्हणावी लागेल.

बी.एन. हायस्कूलमध्ये असताना जासूद खान पठाण आणि नरेंद्र बरेच वर्ष एका बाकावर बसून शिकले. शाळेत नरेंद्रला सर्व जातिधर्माचे मित्र होते. प्रत्येकाच्या सणाच्या दिवशी सगळे एकमेकांकडे जात असत. जासूद खानशी नरेंद्रची मैत्री प्रदीर्घ काळ टिकली. नरेंद्र मोदीनी आपल्या संपूर्ण

आयुष्यात अनेक प्रकारच्या लोकांशी सलोख्याचे संबंध कायम ठेवले आहेत. रसिकभाई दवे नावाचे वडनगरचे काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांचा मुलगा नरेंद्रच्या शाळेतला मित्र. अनेकदा रसिकभाईंनी आयोजित केलेल्या काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमात नरेंद्र आणि त्याच्या वर्गमित्रांची टोळी स्वयंसेवक म्हणून काम करत असे. समाजातल्या सर्व स्तरातल्या, सर्व विचारांच्या, सर्व धर्मांच्या माणसांशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचा संस्कार नरेंद्रवर लहानपणापासूनच घडत होता.

मित्रांनो, नरेंद्रच्या शालेय जीवनाचा आढावा घेताना आपल्याला ज्या गोष्टी ठळकपणे लक्षात येतात त्या इथे देत आहे. शालेय जीवनात सर्वच गोष्टी नरेंद्रने ठरवून केल्या असे म्हणणे पूर्णतः चुकीचे ठरेल. परंतु शालेय वयात त्याचा ज्या व्यक्तींशी, ज्या विचारांशी, ज्या संघटनेशी नजीकचा संबंध आला त्या सर्वांचा परिणाम नरेंद्रचे व्यक्तिमत्त्व घडण्यात झाला हे निश्चितच मान्य करावे लागेल. नरेंद्र हा लहानपणी चळवळ्या स्वभावाचा (Hyper Active) मुलगा होता. हे वरील सर्व वर्णनावरून आपल्या लक्षात आले असेलच. अशा मुलांमध्ये एक प्रचंड ऊर्जा निसर्गतः असते. अशी ऊर्जा त्यांना शांत बसू देत नाही, असा मुलगा ज्या पर्यावरणात वावरतो (इथे पर्यावरण म्हणजे कौटुंबिक वातावरण, मित्रमंडळी, दररोज जाण्याचे ठिकाण, शाळेतील शिक्षकवर्ग, त्या मुलाच्या विचार प्रक्रियेवर परिणाम करणाऱ्या घटना व कार्यक्रम असा अर्थ अभिप्रेत आहे) त्या पर्यावरणामुळे त्या मुलाची ती ऊर्जा सकारात्मक अथवा नकारात्मक कार्याकडे वळते.

नरेंद्रच्या लहानपणी त्याच्या पर्यावरणातील घटकांची माहिती घेतली तर पुढील निष्कर्ष प्रकर्षाने समोर येतात– नरेंद्रच्या कुटुंबातील वातावरण हे धार्मिक होते. आर्थिक सुबत्ता नसली तरी आई-वडिलांचे प्रेम, वडिलांची पापभीरू, कष्टाळू व प्रामाणिकपणाची राहणी, आईचा प्रेमाचा धाक या सर्व गोष्टींचा सकारात्मक परिणाम (Positive Impact) नरेंद्रच्या जडणघडणीमध्ये निश्चित झाला आहे.

नरेंद्रच्या भावंडांमध्ये मोठा भाऊ सोम हा सॅनिटरी इन्स्पेक्टर म्हणून नोकरीला लागला. दुसरा ज्येष्ठ भाऊ अमृत याने आयटीआय मध्ये जाऊन टर्नरचा कोर्स केला आणि एक खासगी कंपनीत त्याने टर्नरची नोकरी स्वीकारली. त्याच्या नंतरची वासंती ही बहीण जुजबी शिक्षण घेऊन लग्न

करून संसारात रमली. लहान भाऊ प्रल्हाद याने डिग्रीपर्यंतचे शिक्षण घेऊन खाजगी नोकरी स्वीकारली आणि दुसरा लहान भाऊ पंकजने जर्नालिझमचा कोर्स करून गुजरात शासनाच्या माहिती खात्यात नोकरी धरली.

नरेंद्रची सर्व भावंडे एका सर्वसामान्य आर्थिक स्थितीतील कुटुंबातील मुलांप्रमाणे वागली. फक्त नरेंद्रच त्या सर्वांपेक्षा वेगळ्या मार्गाने गेला. याचाच अर्थ नरेंद्र हा जन्मत:च या सर्वांपेक्षा वेगळ्या विचारांचा, क्षमतेचा व बुद्धिमत्तेचा होता. त्याकाळी मुलांच्या करिअरकडे लक्ष देण्यासाठी सर्वसामान्य आर्थिक परिस्थितीतल्या पालकांना वेळ नसायचा. शिवाय त्या काळी आजच्या सारखी स्पर्धात्मक परिस्थितीही नव्हती आणि संधीपण मर्यादित होत्या. त्यामुळे नरेंद्रच्या क्षमतेचा किंवा बुद्धिमत्तेचा अंदाज घेऊन त्याच्या पालकांनी त्याच्या यशासाठी कोणतेच विशेष प्रयत्न केले नाहीत. 'खूप मोठा हो' या आशीर्वादा इतकीच आपल्या मुलाच्या करिअरविषयीची त्यांची कल्पना मर्यादित व सोपी होती.

नरेंद्रचे वर्गमित्र हे एका खेडेवजा गावातील मध्यम व कनिष्ठ मध्यम वर्गीय कुटुंबातून आलेले सर्वसामान्य विद्यार्थी होते. त्यातील कोणीही पुढील आयुष्यात फार यशस्वी किंवा मोठा झाला नाही. त्यावरून त्यांच्यातील कोणीही फार मोठे ध्येय ठेवून वावरत असेल, तसा प्रयत्न करत असेल असे वाटत नाही. नरेंद्रचा वर्गमित्र नागजी देसाई, जो आता वडनगरला कॉंग्रेसचा स्थानिक नेता आहे, त्याने सांगितलेला त्यांच्या लहानपणीचा किस्सा पुढीलप्रमाणे आहे– 'एकदा आम्ही वर्गमित्र शाळा सुटल्यावर घरी परतत होतो. वाटेत एक भविष्य सांगणारा भेटला. सहजसुलभ उत्सुकतेने आम्ही सर्वांनी त्याला आमचे भविष्य विचारले, आम्हा सर्वांबद्दल त्याने फार विशेष अशी कोणतीही गोष्ट सांगितली नाही मात्र नरेंद्रचे भविष्य सांगताना त्याने हा मुलगा मोठेपणी एकतर आदरणीय संत होईल किंवा मोठा राजकीय नेता होईल असे सांगितले. पुढे कितीतरी दिवस आम्ही नरेंद्रला 'नेताजी' म्हणून चिडवीत असू.'

संस्कारक्षम वयात असलेल्या मित्रांच्या सहवासाचा मोठा परिणाम प्रत्येकावर होत असतो असे म्हणतात. नरेंद्रच्या जडणघडणीत मित्रांच्या सहवासाचा कोणताही परिणाम झालेला दिसत नाही. नरेंद्रच्या लहानपणीच्या प्रत्येक प्रसंगात नरेंद्र मित्रांना नेतृत्व देत होता, विशिष्ट काम करून घेत

होता असे दिसते. मित्रांकडून काही घेण्यापेक्षा वर्गमित्रांनाच नरेंद्रने बरेच काही दिले.

नरेंद्रच्या शाळेतील शिक्षकांमध्ये नरेंद्रच्या व्यक्तिमत्त्वावर खोलवर प्रतिमा (Deep Impact) निर्माण करणारा असा कोणीही शिक्षक त्याच्या आयुष्यात आलेला दिसत नाही. याची प्रामुख्याने कारणे दोन असू शकतील, काही शाळांमध्ये असतात तसे विद्यार्थीहिताची काळजी करणारे, विद्यार्थी घडवण्याची इच्छा असणारे शिक्षक नरेंद्रला लाभले नसतील. दुसरे आणि जास्त बरोबर वाटणारे कारण म्हणजे आपल्या वडिलांना त्याच्या चहाच्या स्टॉलवर मदत करण्यासाठी जायची घाई असल्याने नरेंद्र कधीच शाळेत रेंगाळून शिक्षकांकडून विशेष मार्गदर्शनाची मागणी करत नसावा. त्यामुळे आणि नरेंद्रची गणना वर्गातला प्रथम पाचांमध्ये होत नसल्याने त्याच्या शालेय जीवनातील कोणाही शिक्षकाचा नरेंद्रच्या जडणघडणीत काही वाटा दिसत नाही.

मात्र आपल्या गुरुजनांबद्दल आदरभाव नरेंद्रच्या मनात कायम होता. पुढे बी.एन. हायस्कूलच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाला नरेंद्र मोदींना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यात आले होते. त्या वेळी ते गुजरातचे मुख्यमंत्री होते. कार्यक्रमात आता नरेंद्र मोदींचा शिक्षकांच्या हस्ते सत्कार करण्यात येईल अशी घोषणा निवेदकाने केली. नरेंद्र मोदींनी त्याला निक्षून नकार दिला. भारतीय परंपरेत गुरुजनांचा सत्कार विद्यार्थी करत असतो. त्यामुळे मी त्यांचा सत्कार करणार असे सांगून स्वत: बरोबर आणलेल्या सत्कार साहित्याने त्यांनी गुरुजनांचा सत्कार केला.

नरेंद्रच्या शालेय जीवनातील पर्यावरणातील उरलेला घटक म्हणजे त्याचे दररोज जाण्याचे ठिकाण हा होय. आपल्या वयाच्या सातव्या वर्षी नरेंद्रने संघ शाखेवर जायला सुरुवात केली. वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत तो वडनगरला राहत होता आणि अतिशय नियमितपणे संघ शाखेत जात असे. संघशाखेतील गटनायक, मुख्य शिक्षक, कार्यवाह अशा पदांवरही त्याने काम केले होते.

नरेंद्र मोदी स्वत: देखील हे मोकळेपणाने मान्य करतात की त्यांची खऱ्या अर्थाने जडणघडण झाली ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रचनेत वावरताना. मग ती दैनंदिन शाखा असो, बौद्धिक वर्ग आणि संघ शिक्षावर्ग

असोत किंवा संघाचा प्रचारक म्हणून मोदी काम करत असताना त्यांना मानसपुत्र मानणाऱ्या लक्ष्मणराव इनामदार ऊर्फ वकीलसाहेबांसारख्या संघप्रचारकांच्या सहवासाचा परिणाम असो. मोदींच्या शालेय जीवनात त्यांच्यावर चारित्र्याचे, राष्ट्रप्रेमाचे, समाजासाठी आपण कार्य केले पाहिजे या मूलभूत प्रेरणेचे संस्कार दररोजच्या संघशाखेमुळे झाले. अनेक थोर नेत्यांची नावे व त्यांचे कार्य त्यांना संघशाखेवर ऐकू आले. हिंदू समाजाची विदारक अवस्था आणि हिंदू समाजापुढे उभे असलेले अनेक प्रश्नांची जाणीव त्यांना प्रथम संघशाखेवरच झाली. अनेक ग्रंथांचे वाचन करण्याची प्रेरणा त्यांना संघशाखेवरच मिळाली.

एकंदरीत नरेंद्रच्या शालेय जीवनात त्याच्या भावी आयुष्यातील यशाकडे जाण्याची प्रेरणा त्याला संघशाखेवरच मिळाली. त्यामुळे नरेंद्रच्या शालेय जीवनाच्या काळामधील जडणघडणीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा महत्त्वाचा वाटा आहे.

मित्रहो, प्रत्येक मुलाच्या किशोरवयापर्यंत किंवा किमान संस्कारक्षम वयात त्याचे पालक, त्याचे शिक्षक, त्याचे मित्र किंवा तो नियमितपणे ज्यांच्या संपर्कात असतो अशा व्यक्ती, मंडळ, संघटना यांचा महत्त्वाचा वाटा असतो. अर्थात या वयातील मुलाला चूक-बरोबर, योग्य-अयोग्य ठरवण्याची क्षमता आलेली नसल्यामुळे आपला मुलगा योग्य पर्यावरणात वावरतो आहे ना हे तपासून पाहण्याची, त्यात आवश्यक ते बदल करण्याची जबाबदारी ही पालकांचीच मानली पाहिजे. मात्र या लहानपणीच्या जडणघडणीचा मोठा परिणाम मुलांच्या पुढील आयुष्यातील ध्येयाच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीवर होत असतो हे निश्चित.

✦✦

# स्वप्नपूर्तीच्या शोधात

**कि**शोर वय हे आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातील स्वप्न पाहायचे वय असते. सर्वसामान्यत: किशोरवयातील मुलांना एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीच्या जीवनाबद्दल विशेष आकर्षण तयार होते. ती व्यक्ती ही त्या किशोरवयीन मुलाचे आदर्श स्थान (Role Model) बनते. त्या व्यक्तीबद्दल जास्तीत जास्त माहिती मिळवण्याचा, त्या व्यक्तीसारखं बनण्याचा, त्या व्यक्तीसारखं जीवन जगण्याचा प्रयत्न किशोरवयीन मुलं करतात. त्यांच्या किशोर वयातील स्वप्नांमध्ये त्यांच्या या आदर्शाचं विशेष स्थान असतं. अर्थात प्रत्येक किशोरवयीन मुलाच्या विचारांची दिशा व त्याची आवड ही त्यांचा आदर्श निश्चित करते. गाण्याची आवड असणाऱ्या मुलांचा आदर्श एखादा प्रसिद्ध गायक असतो तर क्रिकेटची आवड असणाऱ्या मुलांचा आदर्श सचिन तेंडुलकर असतो. उद्योग व्यवसायात जाऊ इच्छिणारे टाटा बिर्ला किंवा धीरुभाई अंबानींना आदर्श मानतात तर समाजसेवा करू इच्छिणारे बाबा आमटे यांना आपलं रोलमॉडेल आदर्श मानतात. यापुढील काळात समाजकारणात व राजकारणात जाऊ इच्छिणारे किशोर आणि तरुण निश्चितपणे नरेंद्र मोदींना आपले रोल मॉडेल-आदर्श स्थान मानतील. सांगण्याचे तात्पर्य, आपापल्या आवडीनुसार, आपले विचार ज्या मार्गाकडे मार्गक्रमण करत असतात त्या त्या क्षेत्रातल्या महान व्यक्तीला किशोरवयीन मुले आपले रोल मॉडेल मानतात.

यापूर्वीच्या प्रकरणात दिलेल्या नरेंद्रच्या शालेय जीवनातील निवडक प्रसंगांवरून नरेंद्रच्या बालपणी त्याची विचारांची दिशा आणि आवड आपल्या लक्षात येते. आपण मोठा झाल्यावर आपल्या देशाची, आपल्या समाजाची सेवा करायची हा विचार बाल नरेंद्रच्या मनात शालेय जीवनातच घोळत होता. नरेंद्र शाळेत असताना १९६२ साली चीनने आपल्या देशावर

आक्रमण केले नंतर १९६५ साली भारत-पाक युद्ध झाले. या दोन्ही युद्धांच्या वेळी युद्धावर जाणाऱ्या भारतीय जवानांना वडनगर रेल्वे स्टेशनवर स्वयंप्रेरणेने मोफत चहा देण्याचा उपक्रम बाल नरेंद्रने राबवला होता. तसेच देशात आलेल्या पुरानंतर त्या पूरग्रस्तांना जास्तीत जास्त मदत देता यावी म्हणून आपल्या वर्गमित्रांना गोळा करून नरेंद्रने गावच्या जत्रेत चहाचा स्टॉल लावून जास्तीत जास्त निधी गोळा केला होता. संपूर्ण शालेय जीवनात नरेंद्र संघशाखेवर नियमितपणे गेलाच शिवाय संघाच्या छोट्याशा अनेक जबाबदाऱ्या देखील त्याने पार पाडल्या होत्या. यावरून एकंदरीत संपूर्ण शालेय जीवनात नरेंद्रच्या विचारांची दिशा ही देशप्रेमाची आणि समाजप्रेमाचीच होती.

शाळेत असताना वयाच्या १२व्या वर्षापासूनच नरेंद्रला वाचनाची आवड लागली. नरेंद्र वेगवेगळ्या थोर व्यक्तींचे विचार व चरित्र वाचत असे. या वाचनामधूनच नरेंद्रच्या मनात स्वामी विवेकानंदांबद्दल विशेष आकर्षण तयार झाले. स्वामी विवेकानंद हे हिंदू धर्माचे प्रचारक होते. ते संन्यासी होते. स्वामी रामकृष्ण परमहंस हे त्यांचे गुरू. रामकृष्णांच्या शिकवणीनुसार सर्वसमावेशक हिंदू धर्माचा स्वामी विवेकानंदांनी आयुष्यभर प्रचार केला. विवेकानंदांनी हिंदू धर्माच्या प्रसारासाठी जगभर प्रवास केला. शिकागो येथे भरलेल्या वर्ल्ड पार्लमेंट ऑफ रिलिजन्समध्ये हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून ११ सप्टेंबर १८९३ रोजी त्यांनी केलेले भाषण जगभर गाजले होते. हिंदू हे कोणत्याही धर्मातल्या व्यक्तीला आपला 'बंधू आणि भगिनी' समजतात. 'हिंदू धर्म हा विश्व धर्म आहे, हिंदू धर्माचे जगातल्या कोणत्याही इतर धर्माशी शत्रुत्व नाही.' अशी स्वामी विवेकानंदांची शिकवण आहे. ''येणाऱ्या काळात हिंदू धर्मच या जगाला दिशा देईल'' असे त्यांनी शिकागो धर्मपरिषदेत आग्रहाने सांगितले होते. 'उत्तीष्ठत जाग्रत' असा संदेश त्यांनी आपल्या देशातील युवकांना दिला होता.

विवेकानंदांचे चरित्र आणि त्यांचे विचार यांनी नरेंद्र फारच प्रभावित झाला. योगायोग असा की, स्वामी विवेकानंदांचे मूळ नाव देखील नरेंद्रच होते. पुढे अहमदाबादला आल्यावरही विवेकानंद साहित्याचा अभ्यास नरेंद्रने चालू ठेवला होताच. किशोरवयात स्वामी विवेकानंद हे नरेंद्रचे रोल मॉडेलच नव्हे तर आराध्य दैवत बनले. स्वामी विवेकानंदांनी ऐहिक जीवनाचा त्याग

करून संन्यास घेतला आणि आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेत व्यतीत केले होते. रामकृष्ण आश्रमाची स्थापना करून हिंदू धर्म सेवकांची एक संघटना त्यांनी तयार केली. या आश्रमाद्वारे विवेकानंदांच्या विचाराने प्रेरित झालेले तरुण संन्यास घेऊन हिंदू धर्मप्रसाराचे कार्य करत असतात. ख्रिश्चन धर्मातील मिशनरी पद्धतीशी साधर्म्य असलेली रामकृष्ण मिशन ही संस्था जगभरात अनेक ठिकाणी काम करते. नरेंद्रच्या मनात हळूहळू आपण देखील स्वामी विवेकानंदांसारखा संन्यास घेऊन धर्मप्रसाराला व समाजसेवेला वाहून घ्यावे असा विचार जोर धरू लागला. आपल्या आयुष्याचे ध्येय सर्वसामान्यांसारखे संसारी जीवन जगण्याचे असू नये, आपण काहीतरी वेगळे जीवन जगावे असे त्याने ठरवले.

आतापर्यंत नरेंद्रचे शालेय शिक्षण पूर्ण होत आले होते आणि नरेंद्र १७ वर्षांचा झाला होता. नरेंद्रच्या दोन मोठ्या भावांची लग्नं झाली होती. आणि त्यांचा संसार मार्गी लागला होता. दामोदरदास एक जबाबदार प्रेमळ पिता होते आणि त्यांच्या डोक्यात सदैव आपल्या मुलांच्या कल्याणाचाच विषय घोळत असे. त्याकाळी मोढ घांची समाजात बालविवाहाची प्रथा होती. या प्रथेमध्ये वयाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षी मुलाचे आणि मुलीचे वडील एकमेकांना मुलांच्या लग्नाचे वचन देत असत. हा वचन देण्याचा प्रकार एक स्वतंत्र विधी करून होत असे आणि ज्या मुलांना काहीच कळत नसते अशा मुलांना मांडीवर बसवून त्यांचे आईवडील हा लग्नाचे वचन देण्याचा विधी करीत असत. नंतर मुले कळत्या वयात आल्यावर प्रत्यक्ष लग्न होत असे.

नरेंद्रचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर सन १९६८ मध्ये नरेंद्रच्या वडिलांनी एक दिवस घरात नरेंद्रच्या लग्नाचा विषय काढला. तुझ्या लहानपणीच आम्ही ब्राह्मणवाडा गावच्या चिमणलाल मोदींच्या मुलीशी तुझे लग्न ठरविले आहे व ते आता करायचे आहे असे वडिलांनी सांगितले. तोपर्यंत नरेंद्रला त्याचा बालविवाह झाला असल्याची कल्पनाच नव्हती. आपल्या आयुष्यात आपण सर्वसामान्य माणसासारखे संसारी जीवन जगायचे नाही हा निश्चय नरेंद्रने त्या आधीच केलेला होता. आपल्या आईवडिलांना नरेंद्रने आपला निर्णय निक्षून सांगितला. नरेंद्रचे वडील रूढीप्रिय होते. आपण मुलीच्या वडिलांना दिलेला शब्द पाळला गेला नाही तर आपल्याकडून मोठे पाप

होईल, समाजात आपली बेअब्रू होईल असे त्यांना वाटायला लागले. त्यामुळे ते त्यांचा हट्ट सोडायला तयार होईनात. घरातले वातावरण एकदम तणावपूर्ण झाले. नरेंद्रच्या आईनेही आपल्या पतीची बाजू घेतली. आपली आई ही नरेंद्रच्या दृष्टीने देवता समान होती. आपल्या आईवर नरेंद्रची प्रचंड श्रद्धा होती. त्याच्या मनाची प्रचंड घालमेल उडाली. एकीकडे सामान्यांपेक्षा वेगळे जीवन जगण्याची मनापासूनची इच्छा आणि दुसरीकडे त्याला माहीत देखील नसताना वडिलांनी ठरवलेल्या बालविवाहामुळे त्यांचा लग्न करण्याचा आग्रह.

आई-वडिलांनी नरेंद्रचे लग्न झालेच पाहिजे असा टोकाचा आग्रह धरल्यावर मोठा भाऊ सोमाभाईने पुढाकार घेतला व लग्नाची तारीख ठरवली. लग्नाचा विधी वडनगर येथे चिमणलाल मोदींच्या नातेवाइकांच्या घरी पार पाडण्यात आला. लग्नाच्या रात्री नरेंद्र व सर्व नातेवाईक आपल्या घरी परत आले. नरेंद्रची पत्नी जसोदा तिच्या आई-वडिलांकडेच परत गेली. लग्नाच्या वेळी नरेंद्रचे वय होते १८ वर्षं आणि जसोदाबेनचे वय होते १६ वर्षांचे. समाजातल्या रुढींनुसार थोड्याच दिवसांनी जसोदाबेन आपल्या सासरी दाखल झाली. मात्र त्यावेळी जसोदा शिकत होती त्यामुळे शाळा सुरू झाल्यावर ती आपल्या वडिलांच्या घरी पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी परत गेली.

आपल्या मनाविरुद्ध घडणाऱ्या आणि आपण स्वत: ठरवलेल्या आयुष्याच्या ध्येयाची प्राप्ती करण्यास अडसर ठरणाऱ्या घटनांमुळे नरेंद्र प्रचंड अस्वस्थ झाला. आपण वडनगरला आपल्या कुटुंबीयांबरोबर राहिलो तर हळूहळू हे लोक आपल्याला संसारात गुंतवतील याची त्याला खात्री पटली. स्वामी विवेकानंदांचे विचार त्याला खुणावत होते. हिंदू युवकांनी फक्त स्वत:च्या आयुष्याचा स्वार्थी विचार न करता स्वार्थत्याग करून समाजाच्या सेवेला वाहून घेतलं पाहिजे हे स्वामी विवेकानंदांचे आवाहन त्याच्या डोक्यात सतत घोळत होते. या काळातही स्वामीजींच्या साहित्याचा अभ्यास त्याने चालू ठेवलाच होता, शिवाय रामकृष्ण मिशन या संस्थेची संपूर्ण माहिती देखील तो मिळवत होता.

स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या श्रीरामकृष्ण मिशनचे कार्य देशात व परदेशात अनेक ठिकाणी चालते. आपल्या देशात ठिकठिकाणी

या मिशनने मठ किंवा आश्रम काढले आहेत. अनेक ठिकाणी रामकृष्ण मिशनची केंद्रे आहेत. हिंदू धर्म आणि हिंदू समाजासाठी काम करण्याची इच्छा असलेले अनेक तरुण आपल्या कुटुंबाचा त्याग करून संन्यास घेतात आणि आपले उर्वरित आयुष्य हिंदू समाजाच्या सेवेत घालवतात. रामकृष्ण मिशनच्या कार्यात समाजातील गरिबांसाठी शिक्षण स्वच्छता, आरोग्य आणि संस्कार पुरवण्याचे काम प्राधान्याने केले जाते.

नरेंद्रने मिळवलेल्या माहितीत गुजरातमधील राजकोट येथे रामकृष्ण मिशनचे केंद्र असल्याची माहिती मिळाली होती. आता फार उशीर करून चालणार नाही आणि कुटुंबीयांबरोबर राहिल्यास संसाराची बेडी आपल्याला तोडता येणार नाही अशी खात्री झाल्यावर नरेंद्रने घरच्या कुणालाही न सांगता अचानकपणे घर सोडले आणि संन्यासी होण्याच्या आपल्या स्वप्नाच्या शोधात तो मार्गक्रमण करू लागला. घरच्या कुणालाही संशय येऊ नये म्हणून त्याने बरोबर घेतले एक कपड्यांची जोडी आणि आपल्या आईचा एक फोटो. नरेंद्र अचानक नाहीसा झाल्यावर घरात हलकल्लोळ उसळला परंतु नरेंद्रने हुशारीने आपल्या आईकडे आधीच संकेत देऊन ठेवला होता. मी संन्यास घ्यायला जाणार आहे मला शोधण्याचा प्रयत्न करू नका. योग्यवेळी मी परत येईन.

नरेंद्रने रामकृष्ण मिशनच्या राजकोटमधल्या केंद्रात जाऊन तेथील प्रमुख स्वामी आत्मस्थानंदांची भेट घेतली. त्या केंद्रात काही दिवस राहून स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा अभ्यास करण्याची परवानगी त्याने मिळवली. आश्रमात पडेल ते काम करून त्याने स्वामी आत्मस्थानंदांचा विश्वास प्राप्त केला. एक दिवस त्याने स्वामीजींकडे मला तुमच्यासारखे संन्यासी व्हायचे आहे अशी आपली इच्छा प्रकट केली. ''तू अजून एवढा मोठा निर्णय घ्यायला लहान आहेस'' असे स्वामींनी त्याला सांगितले. निराश न होता नरेंद्रने आपला आग्रह चालूच ठेवला. नरेंद्र तेव्हा फक्त अठरा वर्षांचा होता. शिवाय राजकोट केंद्राला नवीन संन्यासी स्वीकारण्याचा अधिकार देखील नव्हता. तो अधिकार बेलूर मठालाच होता. त्यामुळे राजकोटच्या स्वामींनी नरेंद्रला बेलूर मठामध्ये पाठवण्याचा निर्णय घेतला. बेलूर मठाच्या स्वामीजींना उद्देशून लिहिलेले एक पत्रही त्यांनी नरेंद्रकडे दिले. बेलूर मठ हा रामकृष्ण मिशन या संस्थेचा मुख्य मठ आहे. रामकृष्ण मिशनच्या

देशभरातील कार्याचे महत्त्वाचे निर्णय येथे घेतले जातात. त्या वेळी बेलूर मठाचे प्रमुख स्वामी मध्वानंदजी महाराज होते. नरेंद्रने त्यांची भेट घेतली व राजकोट केंद्राच्या स्वामीजींनी दिलेले पत्र त्यांना सादर केले. बेलूर मठाच्या प्रमुख स्वामीजींनी नरेंद्रला बेलूर मठात ठेवून घेतले. मठातील दररोजच्या कार्यात नरेंद्रला सहभागी करून घेतले. दररोजच्या आपल्या कामातून वेळ मिळेल तेव्हा स्वामी मध्वानंदजी नरेंद्रशी चर्चा करत असत. नरेंद्रची सामाजिक प्रश्नांबद्दलची सखोल माहिती बघून स्वामीजी चकित झाले. त्यांनी संन्यासी जीवनाबद्दलची सर्व माहिती नरेंद्रला दिली. अनेक दिवस चर्चा व माहितीची देवाण-घेवाण झाल्यावर निर्णयाचा दिवस आला.

''संन्यास घेण्याचा एवढा मोठा निर्णय घेण्यासाठी तू अजून फार लहान आहेस व ग्रॅज्युएट नाहीस. तू प्रथम शिक्षण पूर्ण कर. सध्या तुला आम्ही संन्यासी म्हणून रामकृष्ण मिशनमध्ये घेऊ शकत नाही.'' असा निर्णय प्रमुख स्वामीजींनी दिला. संन्यास घेण्यासाठी अधीर झालेला नरेंद्र प्रचंड नाराज झाला. त्याने बेलूर मठाचा निरोप घेतला. नरेंद्रचा जिद्दी स्वभाव त्याला स्वस्थ बसू देईना. त्याने तेथून अलमोरा येथे प्रयाण केले. अलमोरा या ठिकाणी रामकृष्ण मिशन मठामध्ये काही दिवस वास्तव्य केले. अलमोराच्या रामकृष्ण मठाच्या स्वामींनी देखील नरेंद्रला तोच सल्ला परत दिला. त्यानंतर त्याने हिमालय पर्वतामध्ये ठिकठिकाणी असलेल्या साधूंच्या आश्रमांची माहिती घेतली. पुढे अनेक दिवस नरेंद्रने पूर्वोत्तर भारतातील हिमालयाच्या पर्वतराजीमध्ये मुक्त भटकंती केली. अनेक साधू, संन्यासी, आखाडे यांची माहिती घेतली. हिमालयातील साधू आणि संन्यासी हे खऱ्या अर्थाने जीवनमुक्त असतात. समाजाशी त्यांचा संपर्क पूर्णपणे तुटलेला असतो. या प्रकारचा संन्यास घेण्याचे ध्येय नरेंद्रच्या मनात नव्हते. स्वामी विवेकानंदांचा हिंदू समाजाला द्यायचा संदेश त्याच्या मनात रुजलेला होता. 'उत्तीष्ठत जाग्रत' असा संदेश त्याला संपूर्ण हिंदू समाजाला द्यायचा होता. त्यामुळे सुमारे दोन वर्षांच्या पूर्वोत्तर भारताच्या पर्वतराजीतील भटकंती नंतर नरेंद्र पुन्हा राजकोटला परतला.

राजकोटच्या रामकृष्ण मिशनच्या केंद्रात जाऊन नरेंद्रने पुन्हा स्वामी आत्मस्थानंदांच्या पायावर डोके ठेवले. स्वामीजींनी त्याच्याकडून सर्व माहिती ऐकून घेतली. नरेंद्रच्या अंगातले सर्व गुण स्वामीजींनी ओळखले होते.

नरेंद्रच्या मनातील समाजसेवेची तीव्र इच्छा त्यांना माहिती होती. नरेंद्रची कष्टाची तयारी, राहण्यातला साधेपणा, तीक्ष्ण स्मरणशक्ती या सर्व गुणांचे त्यांना फार कौतुक होते. त्यामुळे स्वामी आत्मस्थानंदांनी त्याला योग्य मार्गदर्शन केले. संन्यासी होऊन समाजापासून अलिप्त होण्यापेक्षा समाजात राहून समाजसेवा करणे कसे आवश्यक आहे ते नरेंद्रला पटवून दिले. तुझ्यातील नेतृत्व गुणांचा, संघटन कौशल्याचा पूर्ण वापर एखाद्या सामाजिक संस्थेत जास्त होईल असे त्यांनी नरेंद्रला समजावून सांगितले. स्वामीजींनी अधिकार वाणीने समजावून सांगितल्यावर नरेंद्रला बऱ्याच गोष्टींची जाणीव झाली. स्वामीजींचे विचार त्याला पटले. स्वामीजींच्या उपदेशाने आपला संन्यासी होण्याचा हट्ट नरेंद्रने सोडून दिला. आपल्या आयुष्यात समाजसेवेचा अन्य मार्ग स्वीकारण्यासाठी तो तयार झाला.

मित्रांनो, किशोर वयातील आपल्या कल्पनाशक्तीने आपण स्वत:च्या भावी आयुष्यासाठी रंगवलेली स्वप्नं आणि जगातलं वास्तव यात मोठा फरक असतो. प्रत्येक मुलाने त्या वयात भव्य दिव्य स्वप्नं पाहिलीच पाहिजेत. तुम्ही देखील अशी स्वप्नं जरूर पाहा. मात्र आपल्या स्वप्नांची आपल्या माता-पित्यांशी, घरच्या वडीलधाऱ्यांशी मोकळेपणाने चर्चा करा. बऱ्याच वेळा आपल्या जवळच्या व्यक्ती त्या विषयात अनभिज्ञ असू शकतात. सुदैवाने आपल्या समाजात तुम्हाला आपुलकीने मार्गदर्शन करतील असे त्या त्या विषयातले जाणकार उपलब्ध आहेत. आपल्या शाळा-महाविद्यालयातून अनेक सामाजिक संस्थांमधून अशा जाणकारांची आपल्याशी भेट घालून दिली जात असते, त्यावेळी आवर्जून त्या जाणकारांना भेटा, त्यांच्याशी चर्चा करा, त्यांच्या संपर्कात राहा, त्यांचं मार्गदर्शन घ्या.

भव्य स्वप्न पाहणे ही चूक निश्चितच नाही मात्र पूर्ण माहिती घेतल्याशिवाय एखाद्या स्वप्नाच्या मागे लागणे हे निश्चितच चुकीचे व धोकादायक आहे. तसेच त्या त्या विषयातील तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन न घेणे किंवा न मानणे ही देखील मोठ्ठी चूक ठरू शकते.

नरेंद्रने लहानपणापासून संन्यासी होण्याचं स्वप्न पाहिलं होतं. त्याच्या अंगभूत गुणांनुसार त्याच्या हातून काही भव्य असं देशोपयोगी कार्य घडणं शक्य होतं. रामकृष्ण मठाच्या स्वामीजींनी आपल्या अनुभवी नजरेनं हे ओळखलं आणि नरेंद्रला योग्य सल्ला दिला. नरेंद्रने तो सल्ला न मानता

आपला संन्यासी होण्याचा हट्ट चालू ठेवला असता तर नरेंद्र आज यशाच्या शिखरावर पोहोचला नसता. मुख्यमंत्री आणि प्रधानमंत्री झाल्यावर मा. नरेंद्र मोदी जेव्हा बेलूर मठात जाऊन स्वामी आत्मस्थानंदांना भेटले त्या वेळी त्यांनी देखील स्वामीजींना स्वत:च्या तरुणपणी दिलेल्या योग्य सल्ल्याबद्दल धन्यवाद दिले. ही गोष्ट तुम्ही सर्व विद्यार्थी मित्रांनो, तुमच्या मनात अधोरेखित करून ठेवा. किशोर वयात भव्य स्वप्ने जरूर पाहा पण किशोरवयातील आपल्या स्वप्नांबाबत अनुभवी ज्येष्ठांचा सल्ला देखील जरूर घ्या आणि योग्य वाटला तर त्या सल्ल्याप्रमाणे जरूर वागा.

✦✦

# संघ समर्पित दिवस

**स्वा**मी आत्मस्थानंदांच्या प्रेमळ आणि स्पष्ट सल्ल्यानंतर नरेंद्रच्या मनातली अस्वस्थता बऱ्याच प्रमाणात कमी झाली. आपल्या पुढील आयुष्यात समाजात राहून समाजसेवा करायची हे ध्येय निश्चित झालं. बालपणापासून संघशाखेचा जवळचा संबंध असल्यानं समाजसेवेचे माध्यमदेखील निश्चित झाले. त्यामुळे आपल्या कुटुंबियांना भेटण्यासाठी नरेंद्र वडनगरला आपल्या स्वगृही परतला. पुढील शिक्षणाची सोय वडनगरला नसल्यानं अहमदाबाद येथे कँटीन चालवणाऱ्या आपल्या काकांकडे बाबूभाईंकडे आपली राहण्याची व नोकरीची सोय होईल का अशी त्याने विचारणा केली. कँटीनमध्ये मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने काकांनी आपला होकार लगेच कळवला होता. वडनगरला थोडे दिवस राहून अहमदाबादला निघून जाण्याचा नरेंद्रचा विचार होता. इकडे मुलगा परत आल्यावर आईने पुन्हा त्याला संसारबंधनात अडकवण्यासाठी प्रयत्न करायचे ठरवले. बालविवाहात लग्नानंतर ''गौना' नावाचा विधी असतो, ज्यामध्ये लग्न होऊनही लहान असल्याने आपल्या माहेरी राहणाऱ्या वधूला वयात आल्यावर विधीपूर्वक सासरी आणले जाते आणि मुलगा आणि मुलगी एकत्र राहून वैवाहिक आयुष्याला सुरुवात करतात. नरेंद्रच्या आईने हा विधी करण्याचे ठरवले. हा सर्व प्रकार नरेंद्रला न कळवता त्याच्या नकळत सुरू होता. प्रत्यक्षात जेव्हा नरेंद्रला या गोष्टींची माहिती मिळाली तेव्हा त्याचा आई-वडिलांशी जोरदार वाद झाला. ''मी पूर्वीपासूनच तुम्हांला सांगितले आहे, मला सामान्य माणसासारखे संसारी आयुष्य जगायचे नाही. मी माझे जीवन समाजकार्यालाच वाहून घेणार आहे'', असे आपल्या आई-वडिलांना परत निक्षून सांगून नरेंद्रने आपले घर सोडले आणि तो अहमदाबादला आपल्या काकांकडे निघून आला. जसोदाबेन या आपल्या वडिलांकडे परत गेल्या. शिक्षणशास्त्राचा कोर्स

करून शिक्षिका म्हणून नोकरी करू लागल्या.

अहमदाबादला नरेंद्रच्या काकांचे गीता मंदिर बस स्टँडमधे कँटीन होते. तो गुजरात सरकारच्या स्टेट ट्रान्स्पोर्टच्या बसचा स्टँड होता. नरेंद्र अहमदाबादला बाबुभाईंच्या घरी राहू लागला आणि चुलत भावाला कँटीन चालवायला मदत करू लागला. या दरम्यान त्याने एम्.एन्. कॉलेज (शेठ मानेकलाल नानचंद कॉलेज) विसानगर येथे प्रथम वर्ष बी.ए.साठी प्रवेशही घेतला होता.

या दरम्यान नरेंद्र मोदी नावाचा आपला एक चांगला स्वयंसेवक वडनगरवरून अहमदाबाद येथे पुढील शिक्षणासाठी आला आहे असा निरोप वडनगरच्या संघ कार्यकर्त्यांनी अहमदाबादच्या संघ कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवला होता. अहमदाबादच्या संबंधित भागातील कार्यकर्ते श्री. अंबालाल खोस्ती यांनी नरेंद्रची कँटीनमध्ये जाऊन भेट घेतली. नरेंद्र रा.स्व. संघाच्या शाखेमध्ये पुन्हा नियमितपणे जाऊ लागला. अंबालाल हे नरेंद्रपेक्षा वयाने बरेच मोठे होते; परंतु नरेंद्रशी त्यांची चांगली दोस्ती जमली. अंबालाल यांनी नरेंद्रला कांकरीया रोडवरील हेडगेवार भवन या संघकार्यालयात नेऊन नरेंद्रची स्थानिक संघकार्यकर्ते, प्रचारक यांची ओळख करून दिली. हळूहळू नरेंद्र संघकार्यात पुन्हा गुंफला गेला.

गुजरातमध्ये त्यावेळी लक्ष्मणराव इनामदार नावाचे संघप्रचारक होते. त्यांचा जन्म महाराष्ट्रातल्या सातारा जिल्ह्यातील खटावचा. पुणे विद्यापीठातून कायद्यातील पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर सन १९४३ मध्ये त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रचारक म्हणून कामाला सुरुवात केली. स्वातंत्र्य चळवळीत आणि हैदराबादच्या निझामाविरुद्धच्या आंदोलनात भाग घेतल्यानंतर १९४४ साली त्यांनी गुजरातमध्ये संघप्रचारक म्हणून जबाबदारी स्वीकारली. ''संघाच्या रचनेमध्ये प्रचारक म्हणून जबाबदारी स्वीकारली की ती व्यक्ती आपलं स्वत:चं अस्तित्व विसरून जाते आणि संघकार्याशी एकरूप होऊन जाते. संघकार्याच्या गरजेनुसार आवश्यक असलेलं तेवढंच त्यांचं अस्तित्व उरतं आणि वेळोवेळी संघकार्याच्या गरजेनुसार ते बदलतं देखील.'' असं आदर्श प्रचारकाचं वर्णन संघकार्यकर्ते करतात. लक्ष्मणराव इनामदारांना हे वर्णन यथातथ्य लागू होतं.

वकिलीचं शिक्षण पूर्ण केल्यावर लक्ष्मणरावांनी संघकार्य करायचं म्हणून

वकिलीचा व्यवसाय केला नाही, परंतु म. गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीत जेव्हा अनेक कुटुंबं उद्ध्वस्त झाली तेव्हा या पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी संघकार्य म्हणून त्यांनी वकिली सुरू केली आणि एक पैसादेखील फी न घेता असंख्य कुटुंबांना न्याय मिळवून दिला. तेव्हापासून संघवर्तुळात ते 'वकीलसाहेब' म्हणून ओळखले जाऊ लागले.

अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता, आर्जवी व शांत स्वभाव आणि संघकार्यावर पराकोटीची निष्ठा असणारे वकीलसाहेब नरेंद्रचे गुरू आणि मार्गदर्शक (Guide & Philosopher) बनले. लक्ष्मणराव इनामदारांनी गुजरातभर प्रवास करून ठिकठिकाणच्या तरुणांना संघकार्यासाठी प्रेरित करण्याचे काम अनेक वर्षे सातत्याने केले. त्यांच्यामुळे अनेक उत्तम कार्यकर्ते संघकार्यात जोडले गेले आहेत.

संघ कार्यालयात नियमित जाण्या येण्याबरोबर नरेंद्रच्या संघकार्यातल्या जबाबदाऱ्या वाढू लागल्या व संघकामातली नरेंद्रची रुची वाढू लागली. नरेंद्रचे विचार, त्यांची कामे करण्याची धडाडी, त्याचा तडफदार स्वभाव संघ कार्यकर्त्यांच्या विशेष करून लक्ष्मणरावांच्या नजरेत भरला. नरेंद्रने कँटीनचे काम सोडून संघकार्यालयात यावे व शिक्षण पूर्ण करावे असा सल्ला त्याला लक्ष्मणरावांनी दिला. हेडगेवार भवनमधे त्याची राहण्याची व भोजनाची सोय करण्याची तयारीदेखील दर्शवली.

नरेंद्रच्या कँटीनमधील कामावर त्याचे काका खूश होते. कोणतेही काम करण्याची तयारी आणि स्वीकारलेली जबाबदारी मन लावून पूर्ण करण्याची सवय यामुळे साधा मदतनीस म्हणून कँटीनला येणारा नरेंद्र थोड्याच दिवसांत 'मॅनेजर'देखील झाला होता; परंतु शरीराने नरेंद्र कँटीनमध्ये असला तरी मनाने तो संघकार्यात रमलेला असे. त्याला मनापासून या कँटीनच्या कामात काहीच रस नव्हता. त्यामुळे लक्ष्मणरावांनी त्याला संघ कार्यालयात राहायला ये असा आग्रह केल्यावर त्याने कँटीनच्या कामाला रामराम केला आणि तो अहमदाबादचे संघाचे मुख्यालय डॉ. हेडगेवार भवनमधे दाखल झाला.

संघ कार्यालयात त्यावेळी प्रामुख्याने संघाचे अन्य प्रचारक, स्वतः लक्ष्मणराव इनामदार व अन्य काही स्वयंसेवक राहत असत. इथला दिवस पहाटे ५.३० ला प्रातःस्मरणाने सुरू होत असे. कार्यालयात राहत असताना

नरेंद्रने कार्यालय झाडणे, फरशी पुसणे, पाणी भरणे, दूध आणणे, स्वयंपाकात मदत करणे, स्वत:चे आणि लक्ष्मणरावांचे कपडे धुणे अशी सर्व कामे अनेक वर्षे आवडीने केली.

नरेंद्रने आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करावे असे लक्ष्मणरावांनी आग्रहाने सांगितले होते. त्यामुळे नरेंद्रने दिल्ली विद्यापीठाच्या राज्यशास्त्राच्या बी.ए. डिस्टन्स एज्युकेशन कोर्सला प्रवेशही घेतला. संघकार्यालयात राहिल्यामुळे नरेंद्रचा संपर्क संघाबरोबरच संघाच्या परिवारातील अन्य संघटनांच्या कार्यकर्त्यांशी देखील येऊ लागला. त्या संघटनांच्या कार्यक्रमांमध्येदेखील तो उत्साहाने भाग घेत असे. त्या काळात भारत-पाक सीमेवर पाक घुसखोरांच्या वारंवार चकमकी होत असत. सरहद्दीवर तैनात भारतीय जवानांना या चकमकीत लढण्यासाठी रसद पुरवली जात असे. अहमदाबादमधून पाठवल्या जाणाऱ्या लष्कराच्या रसदीची चढउतार विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते उत्साहाने करीत असत. नरेंद्र त्यामध्ये नेहमी आघाडीवर असे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या कार्यकर्त्यांसाठी तीन स्तरांवर चालणारा अभ्यासवर्ग चालवतो. या वर्गाला संघशिक्षावर्ग असे नाव आहे. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष असे त्याचे तीन स्तर आहेत. प्रत्येक वर्षासाठी साधारण महिनाभराचा पूर्ण निवासी वर्ग चालवण्यात येतो. या महिनाभरात संघाची शाखा चालवण्याचे प्रशिक्षण दिले जाते, संचलन व इतर शारीरिक कवायतींचा सराव करून घेतला जातो. याबरोबरच संघकार्याचा उद्देश आणि संघकार्यामागची वैचारिक भूमिका सहभागी स्वयंसेवकांना समजावून सांगण्यात येते. यातला तिसऱ्या वर्षाचा संघ शिक्षावर्ग हा संघाचे मुख्यालय असलेल्या नागपूरमध्ये घेतला जातो. संघकार्यालयात राहत असताना नरेंद्रने प्रथम आणि द्वितीय वर्षाचे संघ शिक्षावर्गाचे प्रशिक्षण पूर्ण केले होते. सन १९७२ मध्ये नरेंद्रने नागपूर येथे जाऊन संघ शिक्षावर्गाच्या तृतीय वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केले.

संघाच्या नियमानुसार नरेंद्र आता पूर्ण वेळ प्रचारक म्हणून काम करण्यास पात्र झाला होता. अहमदाबादला परतल्यावर नरेंद्रने आपले गुरू लक्ष्मणराव इनामदार यांना भेटून आपण संघाचा पूर्ण वेळ प्रचारक होऊ इच्छितो असे सांगितले. लक्ष्मणरावांनी नरेंद्रमधल्या अंगभूत गुणांना ओळखले होते. त्यांना नरेंद्रच्या निर्णयाने अतिशय आनंद झाला. संघाच्या नियमानुसार

कोणत्याही तरुणाने प्रचारक होण्याचा आपला निर्णय आपल्या कुटुंबीयांच्या पूर्वसंमतीनेच घ्यावा लागतो. गुजरात विभागाचे संघाचे प्रचारक व्यवस्थाप्रमुख श्री. अनंतराव काळे यांनी नरेंद्रला तू तुझ्या आईवडिलांची परवानगी घेऊन ये असे सांगितले.

नरेंद्र आपल्या मातापित्यांना भेटून त्यांची मान्यता मिळवण्यासाठी वडनगरला पोहोचला. आपल्या आईवडिलांना आपला निर्णय सांगून त्या निर्णयाला मान्यता देण्याची विनंती नरेंद्रने केली. कोणत्याही प्रेमळ आईला आपला मुलगा घर सोडून कायमचा समाजकार्य करायला निघून जाणार हे ऐकून धक्का बसणारच. नरेंद्रची आईदेखील काही वेगळी नव्हती. त्या मातेने आपल्या पद्धतीने नरेंद्रची समजूत घालण्याचा भरपूर प्रयत्न केला; परंतु मनातून तिला नरेंद्रचा जिद्दी स्वभाव माहीत होता. नरेंद्रचे वडील दामोदरदास यांनी देखील नरेंद्रला समजावण्याचा थोडाफार प्रयत्न केला; परंतु त्यांनीच नंतर पत्नी हिराबाची समजूत काढली आणि दोघांनी अत्यंत जड मनाने ''यशस्वी हो, खूप मोठा हो'' असा आशिर्वाद दिला आणि नरेंद्रचा संघाचा पूर्ण वेळ प्रचारक बनण्याचा मार्ग मोकळा झाला.

ते वर्ष होतं सन १९७२. नरेंद्र आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पूर्ण वेळ प्रचारक म्हणून दिवसरात्र संघकार्यात काम करू लागला. प्रचारक झाल्यावर पहिले काही दिवस मोदींचा निवास अहमदाबादच्या संघ कार्यालयातच होता. कार्यालय सांभाळणे, पत्रव्यवहार करणे, आजारी कार्यकर्त्यांची शुश्रूषा करणे, प्रवासी कार्यकर्त्यांची व्यवस्था पाहणे असे त्याचे कामाचे स्वरूप होते. १९७३ साली संघ प्रचारक म्हणून नरेंद्रवर पहिली मोठी जबाबदारी देण्यात आली. सिद्धपूर येथे संघाच्या गुजरात प्रांताचा विशाल मेळावा म्हणजे शिबिर घेण्याचे ठरले होते. या मेळाव्याला राज्यभरातून स्वयंसेवक येणार होते. त्या सर्व स्वयंसेवकांची राहण्याची, नाश्ता व भोजनाची, स्वच्छतागृहांची, कवायती आणि मेळाव्यासाठी मैदानाची व्यवस्था स्थानिक स्वयंसेवकांनी करायची होती. या सर्व व्यवस्थांचे नियोजन आणि समन्वयाच्या प्रमुखपदाची जबाबदारी नरेंद्रवर देण्यात आली. या मेळाव्याला संघाचे देशभरातील प्रमुख नेते देखील उपस्थित राहणार होते.

नरेंद्र त्यावेळी फक्त २३ वर्षांचा होता. त्याला जबाबदारी घेणार का असे विचारल्यावर त्याने क्षणभराचाही विचार न करता होकार दिला.

चाणाक्ष नरेंद्रने या मेळाव्यासाठी लागणाऱ्या कष्टापेक्षा त्यामागे दडलेल्या संधीचा विचार केला. स्वत:ची पात्रता सिद्ध करण्याची, स्वत:च्या कौशल्यांची इतरांना खात्री करून देण्याची हीच संधी होती. सर्व काम उत्तम काम करून दाखवले तर संपूर्ण गुजरातच्या स्वयंसेवकांकडून आणि राष्ट्रीय स्तरावरच्या नेत्यांकडून त्याची दखल घेतली जाणार होती.

नरेंद्रने अहोरात्र विचार करून सर्व व्यवस्थांचे बारकाईने नियोजन केले. लागणाऱ्या साहित्याची बारीकसारीक गोष्टींसहित यादी तयार केली. त्या सर्व गोष्टी मिळवल्या आणि स्थानिक स्वयंसेवकांना विश्वासात घेऊन प्रत्येक व्यवस्था चोखपणे पुरवली.

संघप्रचारक म्हणून दिलेली पहिलीच जबाबदारी उत्कृष्टपणे पूर्ण केल्यामुळे नरेंद्र गुजरातच्या संघवर्तुळात भरपूर कौतुक झाले. त्याच्या व्यवस्थापन कौशल्याची नोंद सर्व संघनेत्यांच्या मनाने निश्चितच घेतली. मिळालेल्या संधीचे सोने झाले. सिद्धपूरच्या मेळाव्यानंतर एका वर्षभरासाठी नरेंद्रकडे हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यातील जिल्हाप्रचारक म्हणून जबाबदारी होती. नरेंद्रचा गुजरातमध्ये जास्त उत्तम उपयोग होऊ शकतो, हे जाणून लक्ष्मणराव इनामदार यांनी त्याची पुन्हा गुजरातमध्ये नियुक्ती करून घेतली.

ते वर्ष होतं १९७४. त्यावेळी देशभरात जयप्रकाश नारायण यांचे नवनिर्माण आंदोलन जोर पकडत होतं. राजकीय भ्रष्टाचाराला विरोध करण्यासाठी हे आंदोलन सुरू झालं होतं. या आंदोलनाला गुजरातमध्ये विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्या वेळी गुजरातमधे काँग्रेसचे चिमणभाई पटेलांचे सरकार होते. या सरकारमधील काही मंत्र्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे पेपरमधे छापून आली. राज्यातील विद्यार्थ्यांनी याविरुद्ध आंदोलन सुरू केले. बघताबघता सर्वच विद्यार्थी संघटना या आंदोलनात सामील झाल्या. कॉलेज बंद करून विद्यार्थी रस्त्यावर उतरू लागले. प्रथम हे आंदोलन भ्रष्टाचाराविरुद्ध सुरू झालं, पण नंतर काँग्रेस सरकार या आंदोलनाला दडपण्याचा प्रयत्न करू लागल्यावर त्या आंदोलनाला प्रथम सरकारविरोधी नंतर काँग्रेसविरोधी रंग मिळाला.

यानंतर या आंदोलनात अनेक संस्था, संघटना व विरोधी पक्ष सामील होऊ लागले. या सर्वांची मिळून एक ''नवनिर्माण आंदोलन समिती'' स्थापन करण्यात आली. कोणतेही आंदोलन करणे संघाच्या कार्यपद्धतीत

बसत नाही त्यामुळे संघाने या समितीमधे सदस्यत्व घेतले नाही. मात्र संघ परिवारातील अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) व भारतीय मजदूर संघ (BMS) या संघटनांनी नवनिर्माण आंदोलन समितीचे सभासदत्व स्वीकारले. संघनेतृत्वाला या आंदोलनाआडून देशविरोधी किंवा समाजविरोधी शक्ती गुजरातमधे हिंसा घडवून आणतील अशी भीती वाटल्याने संघनेतृत्वाने नरेंद्रवर नवनिर्माण आंदोलन समिती व प्रत्यक्ष आंदोलक यामधे समन्वय ठेवण्याची जबाबदारी सोपवली.

नरेंद्रने या आंदोलनाची विविध पक्ष-संघटनांच्या प्रतिनिधींची मिळून बनलेल्या संयोजन समितीमधे प्रवेश मिळवला. त्याने संपूर्ण आंदोलनाच्या काळात आंदोलन राज्यभर पसरेल, आंदोलन फक्त शांततामय मार्गाने चालेल आणि आंदोलनात देशविरोधी शक्तींना स्थान मिळणार नाही यासाठी विशेष प्रयत्न केले. मात्र नरेंद्र स्वत: संघप्रचारक असल्याने संघाच्या शिस्तीचे पालनही त्याने तेवढ्याच जागरूकतेने केले. नरेंद्र आंदोलनादरम्यान कोणत्याही व्यासपीठावर गेला नाही, त्याने केव्हाही भाषण दिले नाही किंवा कोणत्याही पत्रकावर आपले नाव छापू दिले नाही.

या आंदोलनाला पाठिंबा म्हणून ज्येष्ठ नेते मोरारजी देसाई यांनी उपोषण सुरू केले. यामुळे जनतेमध्ये काँग्रेस पक्षाविरुद्ध प्रचंड राग तयार झाला. शेवटी चिमणभाई पटेलांनी राजीनामा दिला. काँग्रेस सरकार बरखास्त करण्यात आलं आणि विधानसभेच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या.

निवडणुका जाहीर झाल्यावर नरेंद्रने नवनिर्माण आंदोलनाशी संबंध ठेवणे बंद करून पुन्हा संघकार्यात पूर्वीप्रमाणे काम करायला सुरुवात केली. संघ प्रचारक म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला संघ नेमून देईल ते आणि तेवढेच काम त्याला करावे लागते. प्रचारकाच्या व्यक्तिगत आवडी-निवडीचा त्यात काही संबंध नसतो. प्रचारकाचे काम ठरवणारे देखील ज्येष्ठ प्रचारक असतात आणि करायच्या कामाचे स्वरूप आणि प्रचारकाच्या व्यक्ती म्हणून असलेल्या क्षमता आणि मर्यादा याचा विचार करूनच ते निर्णय घेतात. त्यामुळे संघाच्या अधिकाऱ्यांनी नरेंद्रवर दिलेली जबाबदारी त्याने पूर्ण केल्यावर नरेंद्रला वेगळ्या कामावर नेमण्यात आले. नरेंद्रचा आणि नवनिर्माण आंदोलनाचा संबंध संपला.

परंतु नरेंद्रचे परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करणे आणि विश्लेषण

करून निष्कर्ष मनात नोंदवण्याचे काम चालूच होते. भारतीय राजकारणाची मोठी समस्या राजकीय नेत्यांची व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा आणि स्वत:च्या स्वार्थासाठी वाट्टेल त्या तडजोडी करण्याची बेशरम मानसिकता आहे असे मत नरेंद्रने त्याच वेळी नोंदवले. आपल्यानंतर आपल्या कुटुंबातच सत्ता राहावी यासाठी वेडे झालेले थोर नेते त्याने पाहिले. भारतातील राजकारण्यांच्या मनात सत्तेविषयी विकृत आकर्षण आहे आणि त्यामुळे 'सत्तेसाठी पैसा आणि पैशासाठी सत्ता' या दुश्चक्रात हे सर्व राजकारणी अडकल्याचे मत त्याने नोंदवले. या सत्तालोलुप माणसांच्यात वावरण्यापेक्षा संघप्रचारकाचे पवित्र काम चांगले असा विचार करून नरेंद्रने संघाच्या पवित्र कामात स्वत:ला झोकून दिले.

याच सुमारास देशभरात एक अनपेक्षित घटना घडली. अलाहाबादच्या उच्च न्यायालयाने भ्रष्टाचाराच्या कारणावरून इंदिरा गांधींची लोकसभेवर झालेली निवड रद्द ठरवली. केंद्रात सत्तेवर राहण्यासाठी धडपडणारा काँग्रेस पक्ष एकदम हादरला.

काँग्रेस प्रमुख इंदिरा गांधींची सत्ता सोडायची तयारी नव्हती. जयप्रकाश नारायण यांचे इंदिरा हटाओ आंदोलन देखील जोरात होतेच. त्यांचे नवनिर्माण आंदोलन तोपर्यंत देशाच्या अनेक प्रांतांत पसरले होते. त्यामुळे आपली सत्ता टिकवण्यासाठी इंदिरा गांधी यांनी देशात अंतर्गत आणीबाणी जाहीर केली. आणीबाणी जाहीर केल्यामुळे इंदिरा सरकारला जे विशेष अधिकार मिळाले त्याआधारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्यात आली. संपूर्ण देशातील संघाच्या आणि विरोधी पक्षांच्या प्रमुख कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली आणि ठिकठिकाणच्या तुरुंगात त्यांना राजकीय कैदी म्हणून ठेवण्यात आले. संघाच्या प्रचारकांना पकडण्यासाठी पोलीस यंत्रणा सक्रिय झाली.

मित्रांनो, संकटामुळे घाबरून जाण्याचा सर्वसामान्य व्यक्तींचा स्वभाव असतो. संकटामुळे घाबरून ते निष्क्रिय होतात किंवा चुकीचे वागतात आणि अजूनच मोठ्या संकटात जातात. मात्र काही निर्भीड आणि निश्चयी लोक संकटांमुळे घाबरून न जाता शांतपणाने परिस्थितीचा आढावा घेतात आणि संकटाशी सामना करायला लगेच सुरुवात करतात. नरेंद्र हा निर्भीड आणि निश्चयी स्वभावाचा असल्याने आलेल्या परिस्थितीशी सामना करायला

लगेच सिद्ध झाला.

४ जुलै १९७५ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली असा आदेश केंद्र सरकारने काढला. लगेचच देशभरातील पोलीस व सरकारी गुप्तचर यंत्रणेला देशभरातील संघप्रचारकांना व पदाधिकाऱ्यांना शोधून काढा आणि जेलमधे टाका, त्यांच्यावर मीसा कायद्याखाली खटले भरा असा स्पष्ट आदेशही सरकारने दिला. त्या काळात आजच्यासारखे प्रसारमाध्यमांचे जाळे नव्हते. वर्तमानपत्रांमधे बातम्या छापायला आणीबाणीमुळे बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे काही कळायच्या आत गुजरातमधील संघ आणि जनसंघाच्या प्रचारकांवर आणि पदाधिकाऱ्यांवर अटक वॉरंट जारी करण्यात आली. त्या परिस्थितीतही नरेंद्रने पोलीस यंत्रणा कशा हालचाली करू शकेल याचा अंदाज बांधला आणि अनेक कार्यकर्त्यांना अटकेपासून वाचवले. नथुलाल झगडा हे संघाचे पदाधिकारी. त्या दिवशी ते घरी नव्हते. संघकार्यासाठी प्रवासात होते. त्यांच्या घरी पोलीस जाऊन आले, हे कळल्यावर नरेंद्रने नथुलालजींना ते घरी पोहोचायच्या आत रस्त्यात गाठले आणि अज्ञात स्थळी पोहोचवले. संघाचे दुसरे ज्येष्ठ नेते केशवराव देशमुख संघ कार्यालयात होते. पोलीस त्यांच्यापर्यंत पोहोचले पण पोलिसांनी झडती घ्यायच्या आत त्यांना बोलण्यात गुंतवून नरेंद्रने देशमुखांकडील महत्त्वाचे कागदपत्र हस्तगत केले आणि एका महिला कार्यकर्तीकडे देऊन सुरक्षित ठिकाणी पोहोचवले.

आणीबाणी जाहीर झाल्यावर गुजरातमधील सर्व छोट्या-मोठ्या विरोधी पक्षांचे आणि संघटनांचे काम ठप्प झाले. आणीबाणीविरोधात जनतेमधे जागृती निर्माण करून आणीबाणीविरोधी आंदोलन उभे करणे तर आवश्यक होते. अशा वेळी सर्व विरोधी पक्षांना एकत्रित करून गुजरात लोक संघर्ष समिती तयार करण्यात आली. संघाच्या वतीने या समितीमधे नरेंद्रचा समावेश केला होता आणि त्याच्यावर जनरल सेक्रेटरी पदाची जबाबदारी सर्वांच्या मान्यतेने देण्यात आली होती. आणीबाणीच्या संपूर्ण काळात नरेंद्रने भूमिगत राहून हे काम अत्यंत उत्तम प्रकारे पार पाडले.

आणीबाणीच्या काळातील अनेक प्रसंगांमधून नरेंद्रच्या धाडसी स्वभावाचे समयसूचकतेचे आणि संघटनकौशल्याचे अद्‌भूत दर्शन घडून येते. शंकरसिंह वाघेला आणि विष्णू पंड्या यांना पोलिसांनी अटक करून जेलमधे ठेवले

होते. त्यांच्यापर्यंत एक निरोप पोचवायचा होता. नरेंद्रने सफाई कामगाराचा वेष केला. जेलमधे सफाईसाठी नेमलेल्या महिलेबरोबर तिचा सहाय्यक म्हणून जेलमधे प्रवेश मिळवला आणि तो निरोप पोचवला. आणीबाणीत वर्तमानपत्रातील बातम्यांवर कडक निर्बंध टाकण्यात आले होतेच. शिवाय गुजरातच्या संघाचे मुखपत्र मानले जाणारे 'साधना' साप्ताहिक आणीबाणीच्या वटहुकुमानंतर लगेचच बंद करण्यात आले. त्या कार्यालयाला सरकारी सील लावण्यात आले. आणि सर्व कर्मचाऱ्यांना अटक करून जेलमध्ये टाकले होते. यामुळे गुजरात प्रांतातील ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांपर्यंत कोणत्याही बातम्या पोहोचवणे अशक्य झाले. त्या काळी आपल्या देशात टिव्ही, इंटरनेट अशा कोणत्याही सुविधा नव्हत्या. यावर उपाय म्हणून जनतेपर्यंत खऱ्या बातम्या पोचवण्यासाठी 'भूमीवाणी' नावाचे भूमिगत वृत्तपत्र सुरू करण्यात आले. या भूमिगत वृत्तपत्राच्या लेखनाची, संपादनाची, छपाईची आणि वितरणाची चोख व्यवस्था नरेंद्रने स्वत:च्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

या काळात गुजरातमधे नरेंद्रने आणीबाणीविरोधी अनेक कार्यक्रमांचे धाडसी आयोजन केले. ६ सप्टेंबर १९७५ ला दत्तोपंत ठेंगडी हे कामगार नेते गांधीनगरला आले. सर्व कामगार पुढाऱ्यांबरोबर त्यांची मिटिंग ठेवण्यात आली. पोलिसांना सुगावा लागल्यावर त्यांनी दत्तोपंत ठेंगडींना अटक करण्याचा प्रयत्न केला. पण नरेंद्रच्या जागरूकतेने पोलीस मिटिंगच्या ठिकाणी पोहोचायच्या आत दत्तोपंतांना तेथून हलवण्यात आले होते.

आणीबाणीच्या काळात नरेंद्रने गुजरात लोक संघर्ष समितीच्या माध्यमातून गुजरातमधील आणीबाणीविरोधी कामाची सर्व जबाबदारी सांभाळली होतीच, पण अन्य राज्यातील आणीबाणीविरोधी आंदोलनाला देखील भरपूर मदत केली. १४ नोव्हेंबर १९७५ ला संपूर्ण देशभरात एकाच वेळी सत्याग्रह करण्याचे ठरले. राजस्थानातील कार्यकर्त्यांना सत्याग्रहाच्या प्रचारासाठी पत्रके छापून हवी होती. शिवाय ती प्रत्येक जिल्ह्यात पोचवणार कशी हा मोठ्ठा प्रश्न त्यांच्यापुढे होता. नरेंद्रने सर्व नियोजन त्यांना करून दिले. त्याने अहमदाबादमध्ये पत्रके छापून घेतली. राजस्थानमधल्या प्रत्येक जिल्ह्यातून एका कार्यकर्त्याला प्रवासी म्हणून बॅग आणि होल्डॉल घेऊन अहमदाबादला बोलावले आणि त्यांच्या बॅगेत आणि होल्डॉलमधे पत्रके टाकून त्यांना

त्यांच्या गावच्या बस ट्रेनमधे सुखरूप बसवूनदेखील दिले.

आणीबाणीच्या काळात दिल्लीमध्ये कॉमनवेल्थ देशांच्या संसद सदस्यांचे एक अधिवेशन इंदिरा गांधींनी भरवले होते. भारतातील आणीबाणीच्या परिस्थितीबद्दल कोणतीही माहिती या सदस्यांपर्यंत जाणार नाही याची चोख व्यवस्था इंदिरा गांधींनी केली होतीच. मात्र भारतातील या दडपशाहीच्या वस्तुस्थितीची माहिती त्या संसद सदस्यांपर्यंत पोहोचावी अशी सर्व आणीबाणीविरोधी कार्यकर्त्यांची इच्छा होती. नरेंद्रने ही अवघड जबाबदारी स्वीकारली. इंदिराजींच्या हुकूमशाही कारवायांची महिती देणाऱ्या सहा वेगवेगळ्या इंग्रजी भाषेतल्या पुस्तिका त्याने अहमदाबादमधे छापून घेतल्या आणि त्या अधिवेशनात सर्व कॉमनवेल्थ देशांच्या प्रतिनिधींपर्यंत पोचवल्यादेखील.

आणीबाणीचा संपूर्ण कालखंड हा नरेंद्रच्या दृष्टीने एक कठोर परिश्रमाचा; परंतु नरेंद्रच्या व्यक्तिमत्त्वाला झळाळी देणारा कालखंड ठरला. आणीबाणी हटवणे या समान उद्दिष्टासाठी लढणाऱ्या वेगवेगळ्या विचारसरणीच्या, वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या पक्ष, संघटनांमधील व्यक्तींबरोबर त्याला काम करायला मिळाले. गुजरात लोक संघर्ष समितीच्या जनरल सेक्रेटरी पदाची जबाबदारी त्याच्यावर सोपवण्यात आली होती. आणीबाणीतला प्रत्येक दिवस हा नवीन प्रश्न आणि नवीन आव्हाने घेऊनच उगवत होता. आणि या सर्व प्रश्नांना उत्तरं त्याला स्वत: शोधायची होती. आणि ही सर्व कामे करत असताना सरकारी यंत्रणा आणि पोलीस सदैव त्याच्या पाळतीवर असायचे. पण ही सर्व आव्हाने नरेंद्रने समर्थपणे पेलली. वेळप्रसंगी सरदारजी बनून तर कधी पांढरी दाढी असलेल्या म्हाताऱ्याचा वेष करून त्याने स्वत:ला कधी अटक होऊ दिली नाही.

स्वत: नरेंद्र मोदी या आणीबाणीतील आपल्या अनुभवांबद्दल वेगळ्या कारणासाठी समाधानी आहेत. जून २०१३ साली लिहिलेल्या ब्लॉगमध्ये ते लिहितात, ''माझ्यासारख्या तरुणाला आणीबाणीमुळे एका समान उद्दिष्टासाठी झगडणाऱ्या वेगवेगळ्या विचारसरणीच्या ज्येष्ठ व्यक्तींचा सहवास मिळाला. संघाच्या विचारधारेतले उत्तुंग नेते मा. अटलजी, मा. लालकृष्ण अडवानी, मा. दत्तोपंत ठेंगडी, मा. नानाजी देशमुख यांचा जवळून संबंध आला. समाजवादी विचारसरणीतले मा. जॉर्ज फर्नांडिस तर काँग्रेसमधले आणीबाणीवर नाराज असलेले मा. मोरारजी देसाई, मा. रविंद्र वर्मा यांच्याशी अनेक वेळा

विचारविनिमय करता आला. गुजरात विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरू मा. धीरुभाई देसाई, ज्येष्ठ मानवतावादी मा.सी.टी. दारु, मुस्लिम विचारवंत मा. हबीब उर रेहमान यांच्याकडून मला भरपूर काही शिकता आले.

डिसेंबर १९७५ ला आम्ही एका महत्त्वाच्या अशा विरोधी पक्षांच्या खासदारांच्या गांधीनगर येथे झालेल्या बैठकीसाठी काम करत होतो. यामधे मा. पुरुषोत्तम मावळंकर, मा. उमाशंकर जोशी आणि कृष्णकांत यासारख्या दिग्गजांनी भाग घेतला होता. आणीबाणीमुळे नरेंद्र मोदींना अनेक गांधीवादी नेत्यांना व संघटनांना भेटण्याची संधी मिळाली. आणीबाणीत भेटलेल्या नेत्यांपैकी मा. जॉर्ज फर्नांडिस आणि मा. नानाजी देशमुख यांच्याबरोबर झालेल्या चर्चांचे मोदी विस्ताराने कथन करतात. आपल्या आणीबाणीतल्या अनुभवांवर त्यांनी 'आपत्कालमें गुजरात' हे पुस्तकही लिहिले आहे.

मित्रांनो, आपल्या आयुष्यात मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करणारा माणूसच यशस्वी आणि नामवंत होतो हे आपणा सर्वांना माहिती आहे. नरेंद्र मोदींनी त्यांच्या आयुष्यात मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने केले आहेच, पण मोदींच्या व्यक्तिमत्त्वाचं वेगळेपण असे आहे की, त्यांच्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक संकटाचा वापरही ते स्वत:च्या फायद्यासाठी करून घेऊ शकतात. आपल्या स्वभावातील संयम आणि सोशिकतेमुळे कोणत्याही संकटाने गडबडून न जाता ते थंड डोक्याने विचार करू शकतात आणि आपल्या अंतर्भूत निर्भीड आणि बेडर स्वभावाने संकटावर स्वार होऊन संकटांचे संधीत रूपांतर करतात.

आपल्या वयाच्या २५ व्या वर्षी अचानकपणे आलेल्या आणीबाणीच्या संकटात त्यांनी हे सिद्ध केले. त्या काळात त्यांना संघात येऊन फक्त ३ वर्षे झाली होती. पोलीस व कायदा यंत्रणेचा पूर्वानुभव अजिबातच नव्हता, पण त्यांनी अतिशय निर्भीडपणे, स्वयंस्फूर्तीने असे काम केले की, प्रत्येक राष्ट्रीय नेत्याने त्यांचे कौतुक केले. त्यांचे गुरू आणि पालक लक्ष्मणराव इनामदार यांनीदेखील त्यांचे भरपूर कौतुक केले. शिवाय त्या काळी मोदींना राष्ट्रीय स्तरावरच्या नेत्यांमध्ये वावरण्याची संधी मिळाल्याने मोदींच्या व्यक्तिमत्त्वामध्ये परिपक्वता आली.

नरेंद्र मोदी त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक नेत्याचे सूक्ष्म निरीक्षण करतात. गुजरातमध्ये संघप्रचारक म्हणून काम करत असताना संघ व

संघपरिवारातील अनेक ज्येष्ठ नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा सहवास त्यांना मिळाला. यात नरेंद्रला पित्याची माया देणाऱ्या आणि स्वत:चा मानसपुत्र मानणाऱ्या लक्ष्मणराव इनामदार यांनी तर त्याला घडवलेच. संघ प्रचारक हो या सल्ल्यापासून १९८४ साली ते स्वर्गवासी झाले तोपर्यंत नरेंद्रला प्रत्येक निर्णयामध्ये लक्ष्मणराव मार्गदर्शन करत असत. नरेंद्रच्या जडणघडणीमध्ये त्यांचा अतिशय महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्याबरोबरच संघाचे, जनसंघाचे अन्य प्रचारक नथुलाल झगडा, मधुकरराव भागवत, अनंतराव काळे, केशवराव देशमुख तसेच स्वत:चा संसार सांभाळून संघकार्यात सहभागी झालेले डॉ. प्राणलाल दोशी, डॉ. विश्वनाथ वणीकर, वसंतराव गजेंद्रगडकर, जलशास्त्रज्ञ के.का. शास्त्री, काशीनाथ बागवडे, बाबुभाई ओझा, बच्चूभाई भगत, वासुदेवराव तळवलकर, वसंतराव चिपळूणकर या व अशा अनेक समर्पित कार्यकर्त्यांचा सहवास नरेंद्रला लाभला. या सर्व कार्यकर्त्यांच्या संघनिष्ठेबद्दल व त्यांच्या संपूर्ण संघसमर्पित जीवनाबद्दल नरेंद्र मोदींना प्रचंड आदर आहे. अशा १६ व्यक्तिचित्रांचा समावेश असलेले 'ज्योतिपुंज' हे पुस्तक नरेंद्र मोदींनी पुढील आयुष्यात लिहिले आणि त्याचे प्रकाशन अटलजी वाजपेयींच्या हस्ते केले. या सर्व व्यक्तींचा नरेंद्र मोदींच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा आहे.

मित्रांनो, तरुण वयात जेव्हा तुमची वैचारिक बैठक पक्की होत असते. तेव्हा सद्विचारी, अभ्यासू, सज्जन व निगर्वी ज्येष्ठ व्यक्तींचा सहवास तुम्ही अवश्य मिळवा. आपल्या आजूबाजूला अशा अनेक व्यक्ती निश्चित असतात. या व्यक्तींच्या जीवनाचे सूत्र साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे असते. त्यामुळे पैशाच्या व सत्तेच्या भपक्याला भुलून जाणाऱ्या सर्वसामान्यांना त्यांचे महत्त्व वाटत नाही, ते राजकारणी आणि श्रीमंतांना आपला आदर्श मानतात. परंतु चिरकालीन टिकणारे आणि उच्च दर्जाचे यश तुम्हांला प्राप्त करायचे असेल तर तुम्ही अशा उच्च विचारसरणीच्या आणि साध्या राहणीच्या विचारवंतांचा सहवास जरूर मिळवा. नरेंद्रने आपल्या तरुण वयात ही गोष्ट आवर्जून केली आणि त्याचा त्याला आपल्या उच्च ध्येयापर्यंत पोहोचण्यास भरपूर फायदा झाला.

१९७७ मध्ये आणीबाणी संपली आणि सार्वत्रिक निवडणुका झाल्या. आणीबाणीविरोधात सर्व विरोधी पक्षांबरोबर संघाने केलेल्या समाज जागृतीचा

फायदा होऊन इंदिरा गांधींच्या काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला. राजकीय कार्यकर्ते आणि राजकारण याचा प्रत्यक्ष संबंध सोडून नरेंद्र पुन्हा संघकार्यात पूर्वीप्रमाणे कार्यरत झाला. आणीबाणी संपल्यावर नरेंद्रवर संघाने दिलेल्या जबाबदारीत बरीच वाढ झाली. सहा जिल्ह्यांच्या विभागाचा विभाग प्रचारक म्हणून जबाबदारी नरेंद्रवर देण्यात आली.

संघाचा प्रचारक म्हणून काम करताना नरेंद्रचा संबंध समाजातील सर्व स्तरातील लोकांशी येत असे. नरेंद्रची निरीक्षण शक्ती अतिशय सूक्ष्म आहे आणि स्मरणशक्ती फार तीक्ष्ण आहे. प्रचारक म्हणून काम करताना जे जे लोक भेटत असत त्या सर्वांच्या स्वभावाचा व विचारप्रक्रियेचा अंदाज घेण्याचा प्रयत्न नरेंद्र सतत करत असे. त्यामुळे संघप्रचारक म्हणून काम करत असताना नरेंद्रने भेटणाऱ्या व्यक्तींच्या मनात डोकावण्याचे कसब आत्मसात केले. ज्याचा पुढील आयुष्यात त्याला फार फायदा झाला. त्यांना भेटणाऱ्या असंख्य व्यक्तींशी मोदी जेव्हा बोलतात तेव्हा त्यांची भेदक नजर समोरच्या माणसाच्या चेहऱ्यावरच्या हावभावांचे सूक्ष्म निरीक्षण (Face Reading) करीत असते. समोरच्या माणसाच्या मुद्यांमधे किती तथ्य आहे किंवा समोरचा माणूस मांडत असलेली भूमिका तो मनापासून मांडतो आहे का? हे समजण्यास त्याचा उपयोग होतो. मोदी त्यामुळे फार चटकन निर्णय घेऊ शकतात.

सन १९७९ साली ऑगस्ट महिन्यात गुजरातमधील मोरवी शहराला पाणीपुरवठा करणारे मच्छु धरण फुटले. धरण फुटल्यामुळे आलेल्या पुरात सर्व मोरवी शहर वाहून गेले. हजारो नागरिक पुरात मरण पावले आणि हजारो घरे वाहून गेली. देशावर आलेल्या प्रत्येक नैसर्गिक आपत्तीमधे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक तातडीने मदतकार्य सुरू करतात. मोरवीतील पूरग्रस्तांच्या मदतकार्याला संघाने त्वरित सुरुवात केली. या मदतकार्याच्या सुसूत्रतेसाठी संघाने एक समिती तयार केली होती. नरेंद्रच्या संघटनकौशल्याची खात्री आणीबाणीत पटलेली असल्याने त्याच्यावर या समितीचा प्रमुख या नात्याने संपूर्ण जबाबदारी देण्यात आली. नरेंद्रनेही पूर्ण वर्षभर पूरग्रस्त पुनर्वसनाचे काम अहोरात्र राबून यशस्वीपणे केले... देशभरातून पूरग्रस्तांसाठी मदतनिधी मिळवण्यापासून मिळालेल्या निधीचा योग्य वापर करून अधिक चांगल्या प्रकारे पुनर्वसन करण्यापर्यंतच्या सर्व कामांचा

समावेश त्याच्यावरील जबाबदारीमध्ये होता.

संघप्रचारक असताना त्याच्यावर दिलेली प्रत्येक जबाबदारी नरेंद्र अतिशय सक्षम व समर्थपणे पार पाडत होता. त्याच्या या गुणांची चर्चा संघपरिवारात सगळीकडे होऊ लागली. १९८० पासून नरेंद्रच्या जबाबदारीत वाढ झाली. संघाच्या गुजरात प्रांताच्या कार्यकारीणीमधे देखील त्याला स्थान मिळाले. १९८० पासून संभाग प्रचारक अशी जबाबदारी मिळाल्याने त्याचे कार्यक्षेत्रही वाढले.

सन १९८१ मधील एक घटना मोठी विचित्र होती. केशवराव देशमुख हे प्रांतप्रचारक होते. अहमदाबादजवळ श्री गुरुजी जयंतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या स्वराजंली या कार्यक्रमाला त्यांना घेऊन नरेंद्र गेला. कार्यक्रम व्यवस्थीत पार पडला. रात्री संघ कार्यालयाकडे परत येताना नरेंद्र जीप चालवत होता आणि केशवराव त्याच्या शेजारच्या सीटवर बसून त्याच्याशी गप्पा मारत होते. बोलता-बोलता अचानक केशवरावांना हार्ट अ‍ॅटॅक आला आणि काही कळायच्या आतच ते अचेतन होऊन नरेंद्रच्या अंगावर कोसळले. रात्रीच्या अंधारात शेजारी बसून गप्पा मारताना सहप्रवाशाचा तडकाफडकी अचानक मृत्यू व्हावा, अति विलक्षण आणि घाबरवून टाकणारी घटनाच ती. पण नरेंद्रने संयम ढळू दिला नाही. प्रथम जीप रस्त्याच्या कडेला घेऊन थांबवली. केशवरावांचा वेडावाकडा झालेला अचेतन देह सरळ केला. नाडी तपासली, श्वास चालू आहे का ते पाहिले, परंतु सर्व काही संपले आहे हे लक्षात आले. त्या काळी मोबाइल फोन नव्हते, फोनसुद्धा फार कमी असायचे. नरेंद्रने शांतपणाने जीप कार्यालयापर्यंत आणली, आणि अन्य कार्यकर्त्यांना बोलावून पुढील व्यवस्था लावली. अत्यंत तरुण वयातच मानवी आयुष्य किती क्षणभंगुर आहे याचे कटू प्रत्यक्ष दर्शन नरेंद्रला आले. या घटनेचा ठसा नरेंद्रच्या मनावर खोलवर उमटला होता. आपल्या भावी आयुष्यात नरेंद्रने दाखवलेल्या कणखरपणात या प्रसंगाचादेखील थोडाफार परिणाम निश्चितच असावा.

यानंतरच्या काळात नरेंद्रवर संघातील जबाबदाऱ्या झपाट्याने वाढत गेल्या. केशवरावांच्या मृत्यूनंतर नरेंद्रला अहमदाबाद येथे राहून संघ परिवारातल्या विविध संघटना व संस्थांशी समन्वय साधण्याची, त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी देण्यात आली. संघाच्या परिभाषेत या जबाबदारीचे नाव होते

‘गुजरात प्रांत व्यवस्था प्रमुख.’ सन १९८४ पासून विश्व हिंदू परिषदेने राम-जानकी रथयात्रांच्या माध्यमातून रामजन्मभूमी मुक्ती आंदोलनाचे पूर्वपिठिका तयार करण्याचे काम हाती घेतले होते. सर्व समाजापुढे रामजन्मभूमी मुक्तीचा विषय पोहोचवणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट होते. प्रभू श्रीराम हे साऱ्या भारतीयांचे दैवत आहेत. त्यांच्या मंदिराची उभारणी ही फक्त हिंदूंसाठीच नाही तर या देशाच्या सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आवश्यक गोष्ट आहे अशी विश्व हिंदू परिषदेची भूमिका होती. नरेंद्रकडे या सर्व आंदोलनाचे समन्वयाचे काम होते. याबरोबरीनेच संघ परिवारातल्या अनेक शैक्षणिक संस्था आरोग्यविषयक संस्था, बँका व अन्य आर्थिक संस्था यांच्या समन्वयाच्या कामाचा देखील नवीन जबाबदारीत समावेश होता. एका अर्थाने संघाच्या निर्णयप्रक्रियेत आता नरेंद्रला स्थान मिळाले होते. या नवीन जबाबदारीला देखील नरेंद्रला मनापासून स्वीकारले. आपल्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीने समोरच्या माणसाचे मन वाचायची विलक्षण हातोटी त्याच्याकडे होतीच. शिवाय भीड, राग-लोभ, स्नेह-शत्रूत्व अशा व्यक्तीसापेक्ष भावनांचा नरेंद्रच्या मनाला कधी स्पर्शच होत नसल्याने तो स्पष्टवक्ता देखील होता. त्यामुळे नरेंद्रचे निर्णय बहुसंख्यवेळा अचूक ठरत असत. त्याच्या निर्णयशक्तीचा बोलबाला संघ परिवारात यामुळे सुरू झाला. अनेक प्रश्नांवर त्याचा सल्ला घेतला जाऊ लागला.

नरेंद्र त्या काळात संघ प्रचारक म्हणून काम करण्यात मशगूल होता. मनापासून संघ कार्याची धुरा सांभाळत होता; परंतु संघाचे राष्ट्रीय नेते आणि संघाच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या भारतीय जनता पक्षाचे नेते यांच्या मनात वेगळीच गणिते मांडली जात होती. भाजपा हा देशाच्या आणि गुजरातच्या राजकारणात नव्याने दाखल झालेला राजकीय पक्ष होता. अनेक वर्षांची परंपरा असलेला काँग्रेस पक्ष आणि आणीबाणीमुळे प्रकाशात आलेला जनता पक्ष यासारख्या अन्य सर्व प्रस्थापित पक्षांशी टक्कर देऊन या नव्या पक्षाला जनतेच्या मनात स्वत:चे स्थान निर्माण करायचे असेल तर त्यासाठी योग्य नेतृत्व आणि अथक परिश्रमांची गरज होती.

गुजरातच्या त्या वेळच्या भाजपाच्या पक्ष संघटनेची स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. जनसंघाच्या स्थापनेपासून नि:स्वार्थपणे व मनापासून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी वयस्कर झाली होती. मध्यंतरात पक्षात

आलेल्या कार्यकर्त्यांमधे पक्षनिष्ठ व नेतृत्वक्षम व्यक्ती कमी होत्या. त्यामुळे संघाच्या व भाजपाच्या राष्ट्रीय स्तरावर नेत्यांमध्ये चर्चा होऊन संघटन कुशल व कष्टाळू नरेंद्रला गुजरात भाजपाच्या कार्यासाठी भाजपाला देण्याचा निर्णय घेण्यात आला. ते साल होते १९८७. त्यासाली नेतृत्वाकडून ''आता तू भाजपामध्ये काम कर'' असा निर्णय नरेंद्रला सांगण्यात आला. नरेंद्रच्या यशाकडे चाललेल्या वाटचालीतले हे एक महत्त्वाचे वळण (Turning Point) होते.

भाजपा ही संघाने स्थापन केलेली राजकीय संघटना आहे. त्यामुळे भाजपाच्या स्थापनेपासून भाजपाच्या कार्याच्या वाढीसाठी व भाजपा कार्यकर्ते व संघ यंत्रणा यातील समन्वयासाठी, आपले काही प्रचारक संघाकडून भाजपामधे पाठवले जातात. सर्वसाधारणपणे पाळल्या जाणाऱ्या प्रथेनुसार हे संघ प्रचारक भाजपामधले पडद्याआडचे कार्यकर्ते (Back Room Boys) म्हणून काम करतात. भाजपाचे सर्वच कार्यकर्ते संघ परिवारातून आलेले नसतात. त्यामुळे हे संघप्रचारक भाजपाचे काम नीट प्रकारे चालेल, भाजपामधे गटबाजी व संघविचाराच्या विरोधी काम होणार नाही याची काळजी घेण्याचे काम करतात. साधारणपणे या संघ प्रचारकांना 'संघटन मंत्री' असे पद दिले जाते.

सन १९८७ साली संघ नेतृत्वाच्या आदेशानुसार नरेंद्र भाजपामधे दाखल झाला. १९८८ मधे गुजरात भाजपाचा संघटन सचिव (General Secretary - Organisation) पदावर त्याची नियुक्ती अधिकृतरीत्या जाहीर झाली. यशाच्या शिखरावर जाण्याचा महत्त्वाचा टप्पा नरेंद्रने गाठला. त्याचे वय होते फक्त ३७ वर्षांचे.

मित्रांनो, तुमच्या आयुष्यात जेव्हा तुम्ही प्रगतीच्या संधी शोधत असता तेव्हा अनेक प्रगतीच्या संधी (Opportunities) देखील तुम्हाला म्हणजेच एका योग्य व पात्र उमेदवाराला शोधत असतात. गरज असते तुम्ही सक्षम म्हणजे योग्य क्षमतांनी सिद्ध असण्याची आणि तुमच्या क्षमता सिद्ध करून दाखवण्याची.

संघ कार्यकर्ता आणि प्रचारक म्हणून काम करताना सन १९७२ ते १९८७ या १५ वर्षांच्या कालखंडात नरेंद्रने स्वतःला अनेक गुणांनी – क्षमतांनी सजवले आणि अनेक वेळा या आपल्या क्षमता, आपले गुण

सिद्ध करून दाखवले. म्हणून यशाच्या शिखरावर जाण्यासाठीची पुढची संधी त्याला आपोआप मिळाली. संघकार्यात असताना नरेंद्रने ज्या क्षमता मिळवल्या आणि सिद्ध करून दाखवल्या त्यांचा गोषवारा देत आहे. आपण सर्वांनी त्या अवश्य मिळवल्या पाहिजेत.

**सर्वस्व ओतून, समर्पित होऊन काम करणे (to do every work with total devotion) :** संघ प्रचारक म्हणून स्वीकारलेलं प्रत्येक काम, प्रत्येक जबाबदारीने नरेंद्रने आपले सर्वस्व ओतून आणि त्या कार्याला पूर्णपणे समर्पित होऊन पूर्ण केलेली आहे. संघ प्रचारक झाल्यावर लगेचच स्वीकारलेली सिद्धपूरच्या संघ शिबिराच्या व्यवस्थेची जबाबदारी असो किंवा नवनिर्माण आंदोलनाच्या समन्वयाची जबाबदारी असो किंवा मोरवी पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाची जबाबदारी असो, दिलेली प्रत्येक जबाबदारी आपले सर्वस्व ओतून नरेंद्रने पूर्ण केली आहे. अनेक वेळा जबाबदारी सोपवणाऱ्यांच्या अपेक्षांपेक्षा कितीतरी अधिक चांगल्या प्रकारे नरेंद्रने त्या जबाबदाऱ्या पूर्ण करून दाखवल्या. अशा सातत्याने केलेल्या समर्पित कामांमुळे नरेंद्र म्हणजे पूर्ण समर्पित कार्यकर्ता अशी नरेंद्रची उज्ज्वल प्रतिमा सर्व संघ पदाधिकाऱ्यांमधे आणि कार्यकर्त्यांमधे तयार झाली आहे.

**निर्भीड, बेडर आणि साहसी मनोवृत्ती (fearless and courageous mind) :** संघ प्रचारक म्हणून काम करताना आणि विशेषत: आणीबाणीच्या काळात नरेंद्रच्या निर्भीड आणि साहसी वृत्तीचे अनेक प्रसंग पाहायला मिळतात. गुजरात लोक संघर्ष समितीच्या सचिव पदाची जबाबदारी स्वीकारून संपूर्ण गुजरातमधे आणीबाणीविरुद्ध जनजागरण करणे, साधना साप्ताहिकावर बंदी घातल्यावर 'भूमिवाणी'द्वारे गुप्तपणे आणीबाणी विरोधी आंदोलनाच्या बातम्या छापणे व भूमिवाणीचे सर्वदूर वितरण करणे, जेलमधे असलेल्या शंकरसिंह वाघेला व विष्णू पंड्या यांची सफाई कामगाराच्या वेषात जाऊन जेलमधे भेट घेणे या सर्व प्रसंगांतून नरेंद्रची निर्भीड आणि साहसी वृत्ती लक्षात येते.

**समयसूचकता आणि निर्णयक्षमता (Instantaneous decision making ability) :** आणीबाणीच्या संपूर्ण कालखंडात नरेंद्र मोदींनी आपल्या समयसूचकतेचा आणि त्वरित निर्णय घेण्याच्या क्षमतेचा वापर केला. नथुलाल झगडांच्या घरावर पोलीस पहारा आहे हे लक्षात आल्यावर ते घरी

जायच्या आत त्यांना गाठून अज्ञात स्थळी पोचवणे, दत्तोपंत ठेंगडींच्या कामगार नेत्यांच्या बरोबर सुरू असलेल्या बैठकीच्या ठिकाणी पोलीस पोहोचायच्या आत दत्तोपंतांना सुखरूप बाहेर पोहोचवणे, केशवराव देशमुखांची झडती सुरू व्हायच्या आधीच शेजारच्या खोलीतील कागदपत्रे सुरक्षित ठिकाणी पोहोचवणे इ. अनेक प्रसंगांतून नरेंद्रची समयसूचकता आणि त्वरित निर्णय घेण्याची क्षमता लक्षात येते.

**ज्येष्ठ नेत्यांचा, विचारवंतांचा आदर आणि घनिष्ठ संबंध (Closeness with veterans from organisation) :** संघ रचनेमधे काम करताना नरेंद्रचा संबंध संघातील अनेक ज्येष्ठ नेत्यांशी आला. नवनिर्माण आंदोलनात आणि आणीबाणी विरोधी लोकसंघर्ष समितीमधे काम करताना संघाबाहेरील विविध विचारसरणीच्या ज्येष्ठ नेत्यांशी नरेंद्रचा संबंध आला. नरेंद्रने आवर्जून यातील अनेक नेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले. नरेंद्रला या ज्येष्ठांविषयी प्रचंड आदर आणि अभिमान होता. त्याने प्रयत्नपूर्वक त्यांचा सहवास आणि मार्गदर्शनही मिळवले. यामुळे नरेंद्रच्या विचारांमध्ये परिपक्वता आली. त्याची वैचारिक बैठक पक्की झाली. गुजरातचे ज्येष्ठ संघ प्रचारक लक्ष्मणराव इनामदार यांना तो आपल्या वडिलांसमान मानत असे. लक्ष्मणरावांच्या सांगण्यावरून तो संघ प्रचारक झाला. प्रथम बी.ए. (राज्यशास्त्र) आणि नंतर एम.ए. (राज्यशास्त्र) पर्यंतचे शिक्षण त्याने लक्ष्मणरावांच्या आग्रहामुळेच पूर्ण केले. संघ प्रचारक म्हणून काम करत असताना अनेक वेळा नरेंद्र त्यांचा सल्ला घेत असे. पुढे मोदींनी एका मुलाखतीत सांगितले. ''वकीलसाहेब (लक्ष्मणराव इनामदार) असताना कोणताही अडचणीचा प्रसंग आला की मी त्यांच्यापर्यंत पोहोचत असे, त्यांच्या मृत्यूनंतर माझ्या नकळतच मी स्वयंनिर्णयी झालो.''

संघ परिवारातील ज्येष्ठ नेत्यांशी नरेंद्रने प्रयत्नपूर्वक तयार केलेल्या जिव्हाळ्याच्या व आपुलकीच्या संबंधांमुळे त्या सर्व नेत्यानी नरेंद्रच्या भाजपामधील नियुक्तीला पटकन होकार दिला व पाठिंबा दिला.

**प्रचंड शारीरिक कष्टाची क्षमता व मानसिकता (Ability and intention to do hard work) :** संघ प्रचारक म्हणून काम करताना नरेंद्र अहोरात्र कामाला तयार असे. प्रचारक म्हणून सतत प्रवास चालत असे. संघशिबिरे, संघ शिक्षा वर्ग, विविध प्रकारच्या बैठकांच्या वेळी प्रचंड

शारीरिक कष्ट करावे लागत असत. त्यात पाणी भरणे, स्वयंपाक करणे, वाढणे, मैदानावर प्रात्यक्षिक शिकवणे, संघशाखा घेणे अशी कामे करावी लागत असत. नरेंद्र ती सहजपणे आणि आवडीने करत असे. नवनिर्माण आंदोलन आणि आणीबाणीच्या विरोधातील जनसंघर्ष समितीचे कामात तर रात्रंदिवस एक करून नरेंद्रने काम केले. त्याकाळी प्रवासाच्या आजच्या एवढ्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे वेळी अवेळी मिळेल त्या वाहनाने प्रवास करावा लागत असे. स्कूटर, जीप अशी वाहने उपलब्ध झाली तर ड्रायव्हिंग स्वत:च करावे लागत असे. नरेंद्रने संघ प्रचारक म्हणून काम करताना आपली प्रचंड शारीरिक कष्टाची क्षमता आणि आवड प्रत्येक कामात सिद्ध करून दाखवली. नरेंद्रने कोणत्याही प्रकारच्या कामाला कधीच नाकारले नाही. त्यामुळे अतिशय कष्टाळू आणि उत्साही प्रचारक अशी त्याची प्रतिमा तयार झाली.

**अभ्यासपूर्ण नियोजनाची सवय (Habit of studied planning) :** संघप्रचारक म्हणून दिलेल्या प्रत्येक जबाबदारीचा नरेंद्र प्रथम संपूर्ण अभ्यास करत असे. दिलेल्या जबाबदारीच्या सर्व बाजूंचा अभ्यास झाल्यावर नरेंद्र ती जबाबदारी कशी पूर्ण करायची याचे पूर्ण नियोजन करत असे आणि मगच कामाला सुरुवात करत असे. एका जिल्ह्याचा प्रचारक म्हणून जबाबदारी मिळाल्यावर त्या जिल्ह्याची भौगोलिक माहिती, सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी, त्या जिल्ह्यातून पूर्वी निवडून आलेल्या खासदार-आमदारांची माहिती अशी पूर्ण माहिती मिळवूनच त्यांनी कामाचे नियोजन केले. त्यामुळे त्यांच्या कामाला चांगले यश मिळाले. अभ्यासपूर्ण नियोजनाची पद्धत नरेंद्रने आपल्यावर दिलेल्या सर्व जबाबदाऱ्यांमधे वापरली. त्यामुळे अभ्यासू आणि योजनापूर्वक काम करणारा कार्यकर्ता अशी नरेंद्रची ख्याती झाली.

नरेंद्रची भाजपामधील नियुक्ती ही नियतीच्या खेळाचा एक भाग आहे किंवा नरेंद्रच्या दैवात (Destiny) भाजपामधील प्रवेश लिहिला होता असा सूर काही चरित्रकारांनी लावला आहे. तर काही टीकाकार नरेंद्रने भाजपाचे काम स्वत:हून मागून घेतले असा दावा करतात. मित्रांनो, नरेंद्रच्या जडणघडणीचा आपल्या मार्गदर्शनासाठी अभ्यास करणाऱ्या तुम्हा मित्रांनी या वादात जाण्याऐवजी एकच महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. गुजरात भाजपासाठी एक कर्तृत्ववान, कष्टाळू, नियोजनबद्ध काम

करणारा समर्पित प्रचारक हवा आहे असा विषय जेव्हा भाजपा नेत्यांनी संघ पदाधिकाऱ्यांसमोर मांडला तेव्हा त्यांनीच नरेंद्रच्या नावाचा आग्रह धरला होता.

'भाजपासाठी एका राज्यस्तरीय कार्यकर्त्याची आवश्यकता' ही संधी जेव्हा तयार झाली तेव्हा नरेंद्र मोदींनी आपल्या पंधरा वर्षाच्या संघ प्रचारक पदाच्या काळात तयार केलेली स्वत:ची प्रतिमा त्यांच्यासाठी महत्त्वाची ठरली. नरेंद्र मोदी हे पसंतीचा पर्याय (Preferred Choice) म्हणून समोर आले आणि ती संधी त्यांना मिळाली.

तुम्ही देखील स्वत:ला गुणसंपन्न करत राहा. आपल्या गुणांना संधी मिळताच सिद्ध करत राहा. संधी तुमच्या दारात आपोआप चालत येईल.

✦✦

# राजकारणाच्या पटावरील दिवस

**स**न १९८७ ला नरेंद्र मोदींना संघ नेतृत्वाने गुजरात भाजपामध्ये संघटन मंत्री म्हणून काम सुरू करण्याचा आदेश दिला. नरेंद्र मोदींनी भाजपा नेत्यांशी संपर्क सुरू केला. १९८८ साली भाजपाच्या नेतृत्वाने त्यांना गुजरात भाजपाचे संघटन सचिव म्हणून नियुक्त केल्याची घोषणा केली. नरेंद्र मोदीनी आपल्या नव्या जबाबदारीच्या कामाला सुरुवात केली.

आपल्या स्वत:च्या विशिष्ट शैलीत त्यांनी या कामाला सुरुवात केली. कोणतीही जबाबदारी स्वीकारल्यावर प्रथम त्या जबाबदारीचा सर्वांगीण अभ्यास करण्याची मोदींची पद्धत आहे. त्यांच्या जबाबदारीचे कार्यक्षेत्र होते संपूर्ण गुजरात राज्य. त्यामुळे गुजरात राज्याचा सर्वांगीण अभ्यास करणे गरजेचे झाले. त्या काळात गुजरातमध्ये भीषण दुष्काळ पडला होता. सरकार दुष्काळावर बरेच पैसे खर्च करीत होते; परंतु दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळत नाही अशा बऱ्याच तक्रारी येत होत्या. शिवाय दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी सरकार बरेच प्रकल्प सुरू केल्याचे सांगत होती. त्या प्रकल्पांची सद्यस्थिती फारशी चांगली नाही अशी चर्चा होती. नरेंद्र मोदीनी या गोष्टींची प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्णय घेतला आणि न्याय यात्रेचा कार्यक्रम जाहीर केला. गुजरातभरच्या १५०० खेड्यांमध्ये आणि ११५ तालुक्यांमध्ये त्यांनी प्रवास केला. या निमित्ताने त्यांना भाजपाच्या प्रांतभरातील कार्यकर्त्यांची भेट घेण्याची संधी मिळाली. आपल्या पाहणीचा अहवाल त्यांनी राज्याच्या नेतृत्वाला सादर केला.

या न्याय यात्रेदरम्यान त्यांच्या लक्षात आले की सामान्य जनतेमधे काँग्रेसच्या शासनाविरुद्ध प्रचंड असंतोष आहे. त्या पुढच्या निवडणुका सन १९९० मध्ये होणार होत्या. त्यात मतदार काँग्रेसला मतदान करण्यास अनुत्सुक दिसत होते; परंतु त्याचा फायदा सरळ सरळ भाजपाला मिळणार

नव्हता. कारण भाजप राज्यात अजून सर्वदूर पसरलेला नव्हता. अनेक गावात भाजपाचे कार्यकर्ते व शाखा नव्हती. अनेक गावात भाजपाचे नाव देखील माहित नव्हते. गुजरातमध्ये भाजपा रुजवायचा असेल तर भाजपा गुजरातच्या प्रत्येक खेड्यात पोहोचला पाहिजे हे ओळखून १९८९ साली त्यांनी लोकशक्ती रथयात्रेची घोषणा केली.

गुजरातमधल्या भाजपाच्या स्थापनेपासून १९८० पासून ते १९८७ पर्यंतच्या प्रगतीचा नरेंद्र मोदींनी अभ्यास केला. तसेच गुजरातमधील एकूण राजकीय परिस्थितीचाही अभ्यास केला. भाजपाने स्थापनेनंतर लढवलेल्या १९८० च्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला फक्त ९ जागा आणि सुमारे १२% मते मिळाली होती. त्या निवडणुकीच्या वेळी काँग्रेसचे मुख्यमंत्री माधवसिंह सोळंकी यांनी गुजरातमध्ये क्षत्रिय, हरिजन, आदिवासी आणि मुस्लिम जातिधर्माचे नेते एकत्र करून त्यांची एक व्होट बँक तयार केली होती. त्याला राजकीय परिभाषेत खाम (KHAM) व्होट बँक असे ओळखले जात असे. त्या जाती व धर्मांच्या लोकांच्या मतांवर सत्ता मिळवायची आणि त्यांच्या नेत्यांबरोबर ती वाटून घ्यायची अशी त्यांची योजना होती. सत्ता मिळाल्याबरोबर आपल्या व्होट बँकेला खूश ठेवण्यासाठी फक्त त्याच वर्गातील लोकांना सवलती देण्यास त्यांनी सुरुवात केली. या तोडा आणि वापरा (Devide and Rule) राजनीतीमुळे संपूर्ण समाजात मोठा असंतोष पसरला होता. परंतु तरीही १९८५ साली याच व्होटबँकेच्या आधारावर काँग्रेसने पुन्हा सत्ता मिळवली होती. १९८५ साली भारतीय जनता पक्षाला १४.९६% मते आणि ११ जागांवर विजय मिळाला होता.

नरेंद्र मोदींनी या माहितीचे आपल्या तंत्रानुसार विश्लेषण करून आपले ध्येय निश्चित केले. काँग्रेसची खाम व्होट बँकेची रणनीती फार दिवस चालणार नाही. मात्र या विरुद्ध तयार होणाऱ्या जनमताचा फायदा घ्यायचा असेल तर भाजपाला एक समर्थ पर्याय म्हणून गुजरातभर आपले अस्तित्व निर्माण करावे लागेल असे त्यांचे विश्लेषण होते. १९८९ साली लोकशक्ती रथयात्रा काढून त्यांनी संपूर्ण राज्याचा प्रवास केला. प्रत्येक महत्त्वाच्या गावाला भेट दिली. ज्या ठिकाणी भाजपाच्या शाखा नव्हत्या अशा प्रत्येक गावात भाजपाची शाखा स्थापन केली.

नरेंद्र मोदींच्या कार्यपद्धतीचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे आपल्यावर

दिलेल्या जबाबदारीचा ते प्रत्येक बारीक तपशिलात जाऊन विचार करतात आणि व्यापक नियोजन (Macro Planning) करण्याआधी छोट्या घटकांच्या नियोजनावर (Micro Planning) भर देतात. आपल्या कामाची सुरुवात देखील ते प्रत्येक छोट्या घटकापासूनच करतात. भाजपाचा संघटन मंत्री म्हणून कामाला सुरुवात केल्यावर त्यांच्याकडे अहमदाबाद महानगर पालिकेच्या निवडणुकीचे निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली. भाजपाने तो पर्यंत फक्त राजकोट आणि जुनागढ नगरपालिकांमध्येच यश मिळवले होते. अहमदाबादची जबाबदारी मिळाल्यावर नरेंद्र मोदींनी त्या निवडणुकीतला सर्वांत छोटा घटक हजारी भाग किंवा बूथ (Booth) याकडे लक्ष केंद्रित केले. आपल्या नियोजनाची आणि नंतर व्यवस्थापनाची सुरुवात त्यांनी प्रत्येक बूथपासून केली. कोणत्याही निवडणुकीतील मतदारांची त्यांच्या निवासस्थानाप्रमाणे सुमारे हजार मतदारांची एक यादी करून त्याप्रमाणे मतदानाची व्यवस्था केलेली असते. या यादीला हजारी यादी आणि त्या यादीच्या मतदान केंद्राला बूथ (Polling Booth) असे राजकीय परिभाषेतले शब्द आहेत. मोदींनी या बूथप्रमाणे नियोजन केले आणि प्रत्येक बूथमध्ये प्रचार होईल आणि मतदान करून घेतले जाईल याचे व्यवस्थापन केले. परिणाम स्वरूप अहमदाबाद महानगर पालिकेत भाजपा प्रचंड मतांनी विजयी झाला. अहमदाबाद मनपामध्ये पहिल्यांदाच भाजपा विजयी झाला. भाजपाला एक समर्थ राजकीय पक्ष म्हणून ओळख मिळाली. यानंतरच्या महत्त्वाच्या निवडणुका १९९० साली गुजरात विधानसभेच्या होणार होत्या. त्या निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वी संपूर्ण गुजरात प्रांतभर भारतीय जनता पक्षानेच संघटनात्मक जाळे (Network) तयार करणे व गुजरात राज्यातल्या ठराविक भागातच अस्तित्वात असलेल्या भारतीय जनता पक्षाला खऱ्या अर्थाने राज्यव्यापी बनवणे असे ध्येय त्यांनी निश्चित केले.

मोदींच्या कार्यपद्धतीचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आपले ध्येय ठरवताना ते दूरदृष्टीने ठरवतात. खरंतर १९९० साली होणाऱ्या विधानसभा निवडणुका भाजपा स्वबळावर लढवू शकेल अशी परिस्थिती नव्हती. शिवाय नवनिर्माण आंदोलनातून जन्माला आलेला व आणीबाणीनंतर इंदिरा गांधींना हरवून सत्तेवर आलेला जनता दल हा पक्ष राज्यात अजूनही बऱ्यापैकी अस्तित्व राखून होता. परंतु जनता दल हा फक्त नेत्यांचा पक्ष

होता. त्या पक्षाला गावोगावी शाखा व संघटनात्मक रचना नव्हती. राजकीय परिभाषेत अशी रचना असलेल्या पक्षाला Cadre Based party असे म्हणतात. राज्याच्या राजकारणात भारतीय जनता पक्षाला कायमस्वरूपी अस्तित्व तयार करायचे असेल तर पक्षाला अशी कायमस्वरूपी मजबूत संघटनात्मक रचना निर्माण करण्याची Cadre Base तयार करण्याची आवश्यकता नरेंद्र मोदींनी ओळखली. त्यामुळे १९९० सालच्या विधानसभा निवडणुकांसाठी त्यांनी स्वत:च्या कामाचे ध्येय, लक्ष ठेवले, राज्यभरात पक्ष संघटनेचा विस्तार करणे. वास्तविक कोणत्याही निवडणुकीत राजकीय पक्ष आपले ध्येय ती निवडणूक जिंकणे असेच सांगत असतो. भाजपाच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा १९९० सालच्या निवडणुकीत देखील तसाच समज होता. परंतु संघटन सचिव म्हणून नरेंद्र मोदींचे हे खास ध्येय होते.

राजकीय कार्यकर्ता म्हणून काम करत असतानाच्या संपूर्ण कार्यकाळात मोदींची राजकीय व्यूहरचना ही कायमच कौतुकाचा विषय ठरली आहे. भारतीय जनता पक्षाच्या कामाला सुरुवात करण्यापूर्वी त्यांना कुशल संघटक (Master Organiser) म्हणून गुजरातच्या संघ परिवारात ओळखले जायचे. खरंतर त्यामुळेच त्यांना भाजपाच्या नेत्यानी संघरचनेमधून भाजपात आणले होते. भारतीय जनता पक्षाच्या कामाची जबाबदारी स्वीकारल्यापासून मोदींनी आपल्या या कौशल्याला व्यूहरचनेची (Strategy) जोड देऊन व्यूहरचनाकार (Strategist) ची भूमिका करण्यास सुरुवात केली. राज्यातील काँग्रेस पक्षाच्या कार्यपद्धतीवर जनता नाराज आहे आणि जनता समर्थ पर्यायाच्या शोधात आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे १९९० सालची निवडणूक भाजपाने स्वतंत्रपणे न लढता जनता पक्षाबरोबर युती करून लढण्याचे ठरले. काँग्रेस पक्षाला समर्थ पर्याय मतदारांसमोर ठेवण्यात आला. या रणनीतीचा अपेक्षित परिणाम दिसून आला. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत अनेक वर्षे सत्तेवर असलेल्या काँग्रेसचा दारुण पराभव झाला. या निवडणुकीत चिमणभाई पटेल यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षाला ७० जागा आणि आणि २९.३७ टक्के मते आणि भारतीय जनता पक्षाला ६७ जागा आणि २६.६९ टक्के मते मिळाली. पक्षाच्या मतदारांमध्ये एकदम १२ टक्क्यांची भरघोस वाढ झाली या निवडणुकीनंतर भाजपाने चिमणभाई पटेलांच्या जनता पक्षाबरोबर संयुक्त सरकार स्थापन केले. या

सरकारमध्ये कोणतेही मंत्रिपद न घेता नरेंद्र मोदींनी आपले संघटनात्मक कार्य चालू ठेवले. एव्हाना त्यांच्या संघटन कौशल्याची चर्चा भाजपाच्या राष्ट्रीय नेत्यांमध्ये होऊ लागली होती.

सन १९९० मध्ये भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष व राष्ट्रीय नेते श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी गुजरातमधील सोरटी सोमनाथ ते उत्तरप्रदेशातील अयोध्येपर्यंत रामजन्मभूमी मुक्ती आंदोलनाच्या प्रचारासाठी रथयात्रा काढावी असे ठरले. या रथयात्रेचं संपूर्ण नियोजन करून त्या रथयात्रेत प्रत्यक्ष सहभागी होऊन ती यशस्वी करण्यासाठी एका संघटन कुशल व पात्र (capable) कार्यकर्त्याची गरज होती. भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये यावर चर्चा होऊन नरेंद्र मोदींची या कामासाठी निवड करण्यात आली. २५ सप्टेंबर १९९० रोजी गुजरातमधील सोमनाथ येथून रथयात्रा सुरू करण्यात आली. नरेंद्र मोदी व्यवस्था प्रमुख म्हणून यात्रेच्या प्रारंभापासूनच अडवाणींच्या बरोबर रथावर स्वार होते. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, ओरिसा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली, बिहार व शेवट उत्तरप्रदेश मधील अयोध्या असा रथयात्रेचा हजारो किलोमीटरचा प्रवास ठरला. दिवसा छोट्या-मोठ्या शहरांमध्ये सभा, स्वागत आणि भेटीगाठी व प्रवास आणि रात्री पूर्ण रात्रभर पुढील शहराकडे प्रवास असा दमवून टाकणारा रथयात्रेचा प्रवास होता. श्री. अडवाणी यांना फक्त सभेकरिता उठवले जाई. बाकीचा वेळ त्या रथामध्येच त्यांची आरामाची व्यवस्था केलेली होती. व्यवस्थाप्रमुख म्हणून नरेंद्र मोदींना मात्र बराच वेळ कार्यरत राहावे लागत असे. यात्रेची सुरुवात झाली ते नवरात्रीचे दिवस होते. नरेंद्र मोदी त्यांच्या लहानपणापासून नवरात्राचे नऊ दिवस कडक उपवास करतात. नऊ दिवस ते कोणतेही अन्न खात नाहीत. फक्त लिंबू पाण्यावर नऊ दिवस राहतात. त्यामुळे रथयात्रेतले पहिले नऊ दिवस नरेंद्र मोदींनी कडक उपवास केला. रथयात्रेदरम्यान श्री. अडवाणी यांच्या एक दिवस ही गोष्ट लक्षात आली. त्यांनी काळजीने नरेंद्र मोदींना ''तू उपवास करून रात्रंदिवस काम करतोस तुला हे कसे जमेल?'' असे विचारले. नरेंद्र मोदींनी त्यांना हसत उत्तर दिले, ''माझ्या जीवनात या सगळ्या गोष्टी सवयीच्या झालेल्या आहेत. तुम्ही काळजी करू नका.''

नरेंद्र मोदींच्या आयुष्यात सातत्याला फार महत्त्व आहे व हे सातत्य

त्यांच्या यशामागचे महत्त्वाचे कारण देखील आहे. कितीही व्यस्त कार्यक्रम असला तरी नवरात्रात नऊ दिवस कडक उपवास करणे ही गोष्ट त्यांनी लहानपणापासून आजपर्यंत पाळली आहे. पंतप्रधान झाल्यावर अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना देखील नवरात्रीचे उपवास करून प्रचंड धावपळीत सर्व कार्यक्रम पार पाडणाऱ्या नरेंद्र मोदींचे जगभरात कौतुक झाले आहे. ईश्वरनिष्ठा, प्रार्थना, योगसाधना आणि प्राणायाम या हिंदू संस्कृती मधल्या त्यांना अक्षय ऊर्जा देणाऱ्या गोष्टी आहेत.

सोमनाथला सुरू झालेली लालकृष्ण अडवाणींची रथयात्रा योजलेला प्रवास करत पुढे सरकत होती. या यात्रेला अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळत गेला. त्यामुळे भाजपा विरोधी पक्षांमध्ये मोठी अस्वस्थता पसरली. बिहारमध्ये तेव्हा लालूप्रसाद यादव हे मुख्यमंत्री होते. त्यांचा पक्ष राष्ट्रीय जनता दल हा सत्तेवर होता. त्यांनी रथयात्रेवर बंदी आणली आणि लालकृष्ण अडवाणींसहित सर्वांना बिहारमधील समस्तीपूर येथे अडवून तुरुंगात टाकण्यात आले. मोदींनाही अटक झाली व कालांतराने त्यांची सुटका झाली.

या यात्रेच्या यशस्वी व्यवस्थापनामुळे नरेंद्र मोदींचे नाव सर्वदूर चर्चेत आले. यानंतर भाजपाचे दुसरे राष्ट्रीय नेते व त्या वेळचे राष्ट्रीय अध्यक्ष मुरलीमनोहर जोशी यांनी काश्मिरातील फुटीरतावादी प्रवृत्तींना विरोध करण्यासाठी कन्याकुमारी ते काश्मीर अशी 'एकता यात्रा' काढण्याचा निर्णय घेतला. ११ डिसेंबर १९९१ रोजी कन्याकुमारी येथून निघून केरळ, तामिळनाडू, आंध्र, ओरिसा, महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली, हरियाणा, पंजाब अशा अनेक राज्यांतून प्रवास करून २६ जानेवारी १९९२ रोजी श्रीनगर येथे पोहोचून तेथे जाहीर सभा घेऊन या यात्रेचा समारोप करण्याचे ठरले. या यात्रेची व्यवस्था पाहणे हे मोठे जिकिरीचे काम होते. पूर्वीच्या यात्रेप्रमाणेच मुरलीमनोहर जोशी यांच्या आरामाची व्यवस्था रथामध्येच करण्यात आली होती. रथाच्या प्रवासादरम्यान गावोगावी सभा होत असत. सभा नसतील त्या वेळी रथ प्रवास करीत असे आणि मुरलीमनोहर जोशी आराम करीत असत. मात्र नियोजनाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला पुढील व्यवस्था पाहण्यासाठी सतत जागे राहावे लागत असे. मोदींचा पूर्वीच्या रथयात्रेच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाचा अनुभव ताजा असल्याने या एकता यात्रेच्या संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली. मोदींनी

नेहमीप्रमाणेच आपल्या खास व्यवस्थापन शैलीने ही एकता यात्रा यशस्वी करून दाखवली.

एकता यात्रेला काश्मीरच्या फुटीरतावाद्यांनी जाहीर धमकी दिली होती. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे हे अधोरेखित करण्यासाठी या एकत्र यात्रेचा समारोप श्रीनगरमधील लाल चौकात भारताचा राष्ट्रध्वज फडकावून करण्यात येईल असे भाजपाने जाहीर केले होते. काश्मीरमध्ये त्याकाळात फुटीरतावाद्यांचे आंदोलन जोरात होते. त्यांनी भाजपाच्या या योजनेला जाहीर विरोध करून तुम्ही लाल चौकात भारताचा राष्ट्रध्वज लावूनच दाखवा, आम्ही तुम्हाला गोळ्या घालून ठार मारू अशी धमकी दिली.

नरेंद्र मोदी हे खरे देशप्रेमी आणि अत्यंत निर्भीड आहेत. त्यांनी देखील अतिरेक्यांना जाहीर आव्हान दिले, ''पोलीस आणि लष्कर यांची मदत न घेता आम्ही २६ जानेवारी १९९२ रोजी सकाळी १० वाजता लाल चौकात राष्ट्रध्वज लावण्यासाठी येत आहोत. हिंमत असेल तर सामोरे या.'' अतिरेक्यांनी दिलेल्या ठार मारण्याच्या धमक्या आणि भाजपा नेत्यानी आणि व्यवस्था प्रमुख नरेंद्र मोदींनी अतिरेक्यांना दिलेले प्रती आव्हान यामुळे एकता यात्रेचा शेवट ठरल्याप्रमाणे लाल चौकात तिरंगा फडकावून होणार का? याबाबत सर्व देशभरात उलटसुलट चर्चा सुरू होत्या. यात्रेचे संयोजक या नात्याने नरेंद्र मोदी केंद्र व राज्यसरकारचे प्रतिनिधी, सुरक्षा यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी समन्वय साधत होते. परिस्थिती फार स्फोटक होती आणि क्षणाक्षणाला बदलत होती.

एकता यात्रा जेव्हा उधमपूरला पोहोचली तेव्हा पुढील रस्त्यावर दरडी कोसळल्याची बातमी आली. नरेंद्र मोदींमधला व्यूहरचनाकार जागा झाला. रस्त्यावर दरडी कोसळून पुढील रस्ता बंद झाल्याने एकता यात्रा उधमपूर येथे स्थगित करण्यात आल्याची बातमी प्रसिद्ध झाली. मुरलीमनोहर जोशी यात्रा स्थगित करून दिल्लीला परत गेले ही बातमी प्रसिद्ध करण्यात आली. लोकांना कळू न देता प्रत्यक्षात मुरलीमनोहर जोशी व नरेंद्र मोदी विमानाने दिल्लाहून श्रीनगरला गेले. त्यांनी २६ जानेवारी १९९२ ला लाल चौकात भारताचा राष्ट्रध्वज फडकावला आणि त्याची बातमी अचानकपणे सर्व जगभरात झळकली. अतिरेक्यांचे आव्हान धुडकावून लावण्यात एकता

यात्रा व भाजपा पूर्णत: यशस्वी झाला. या यशामागचे खरे सूत्रधार व यात्रेचे यशस्वी संयोजक म्हणून नरेंद्र मोदींचे नाव पुन्हा एकदा चर्चेत आले.

एकता यात्रा पूर्ण करून आल्यावर ३० जानेवारी १९९२ ला अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदींचा भव्य सत्कार करण्यात आला. या नंतरचा काळ मात्र नरेंद्र मोदींना राजकारणातील अदृश्य अशा पडद्यामागच्या काळ्या बाजूचे दर्शन देणारा ठरला. नरेंद्र मोदींच्या आजवरच्या प्रवासात नवीन आव्हाने स्वीकारणे आणि वरिष्ठांच्या अपेक्षांपेक्षा किती तरी अधिक चांगल्या प्रकारे ती पूर्ण करणे एवढेच त्यांना माहिती होते. मात्र आपल्या उत्कृष्ट कामाने देखील राजकारणात इतरांची मने दुखावली जातात आणि आपल्याला आपल्याच पक्षात शत्रू तयार होतात याचा वस्तुपाठ त्यांना या काळात मिळाला.

गुजरात भारतीय जनता पक्षामध्ये नरेंद्र मोदी १९८७ साली दाखल झाले. त्यांच्यानंतर १९८८ साली संघाचे दुसरे प्रचारक संजय जोशी यांना गुजरात भाजपामध्ये काम करण्यास पाठवण्यात आले. नरेंद्र मोदी हे गुजरात भाजपाचे जनरल सेक्रेटरी म्हणून काम करत होते तर संजय जोशी संघटन मंत्री म्हणून काम करत होते. १९९० सालच्या निवडणुकीपर्यंत या दोघांनी एकत्र काम केले आणि पक्षसंघटनेची संपूर्ण गुजरातभर बांधणी केली. १९९० सालच्या निवडणुकीनंतर भाजपाने चिमणभाई पटेलांच्या बरोबर संयुक्त सरकार बनवले आणि एका अर्थाने भारतीय जनता पक्ष हा सत्ताधारी बनला. एकेकाळी ज्या पक्षाला कोणी कार्यकर्ते मिळत नव्हते त्या पक्षाकडे कार्यकर्ते आणि नेत्यांची रीघ लागली. पक्षकार्यकर्ते आणि नेते यांच्यावर नियंत्रण ठेवणे आणि त्यांना शिस्त लावणे अवघड होऊ लागले होते.

१९९० आणि १९९१ या दोन वर्षांत नरेंद्र मोदींवर रामजन्मभूमी मुक्ती आंदोलनातील लालकृष्ण अडवाणींची रथयात्रा आणि मुरलीमनोहर जोशी यांची एकता यात्रा याची संपूर्ण व्यवस्थापन करण्याची जबाबदारी भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय नेत्यांनी दिली होती. स्वाभाविकपणे गुजरातेमधील पक्षाच्या कामात त्यांचा सहभाग कमी झाला होता. दरम्यानच्या काळात पक्षात अनेक नवीन कार्यकर्ते आणि नेते कार्यरत झाले होते.

संजय जोशी हे या काळात गुजरात भाजपामध्ये सतत कार्यरत होते.

संजय जोशी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर समर्थक आणि संघ विचारसरणी नुसार वागणारे संघ प्रचारक आहेत. त्यामुळे अत्यंत साधी राहणी, पडद्याआडून काम करण्याची सवय आणि प्रत्येक वेळी भाजपाने संघाच्या आदेशानुसारच काम करावे असा टोकाचा आग्रह ही त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्यावर संघाने दिलेली जबाबदारी ही गुजरातमधील भाजपा योग्य रीतीने कार्यरत राहील हे पाहण्याची होती. त्यांनी पुढे होऊन भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व करणे अपेक्षित नव्हते. शिवाय संघाच्या नेहमीच्या कार्यपद्धतीनुसार संजय जोशी यांचे काम व्यक्तीसापेक्ष होते. संघामध्ये एखादी व्यक्ती किंवा घर संघ परिवाराशी जोडणे हे महत्त्वाचे मानले जाते. एकदा ती व्यक्ती, ते घराणे संघ परिवारात जोडले गेले की त्या व्यक्तीचे किंवा त्या घराण्याचे विशिष्ट महत्त्व संघ परिवारात तयार होते आणि प्रत्येक निर्णयात त्या व्यक्तीला वा परिवाराला महत्त्व देण्याचा किंवा शक्यतो त्यांना नाराज न करण्याचा प्रयत्न संघ कार्यकर्त्यांकडून केला जातो.

नरेंद्र मोदी देखील संघाचे प्रचारक म्हणून भाजपामध्ये दाखल झाले. परंतु त्यांचा मूळ स्वभावच पुढे होऊन काम करण्याचा (Leading from the front) असा आहे. भारतीय जनता पक्षाची त्या वेळी त्यांना दिलेली जबाबदारी देखील जनरल सेक्रेटरी म्हणजेच ज्यामध्ये नेतृत्व करणे अपेक्षित आहे अशीच होती. दोन रथयात्रांच्या यशस्वी व्यवस्थापनामुळे नरेंद्र मोदींच्या नावाची चर्चा संपूर्ण देशभरात झाली होती. शिवाय नरेंद्र मोदींच्या कामाची पद्धत ही निकाल सापेक्ष (Result Oriented) आहे. कोणत्याही हाती घेतलेल्या कामामध्ये किंवा जबाबदारीमध्ये अपेक्षित यश प्राप्त करणे हेच ध्येय ठेवून ते काम करतात. त्या कामासाठी आवश्यक व उपयोगी व्यक्तींना ते जवळ घेतात तर त्या कामात अडथळा ठरणाऱ्या व्यक्तींना दूर सारतात. त्यांचा कोणताही निर्णय ध्येय समोर ठेवून होतो. व्यक्ती समोर ठेवून नाही. यामुळे गुजरात भाजपामधील अनेक नेते त्यांच्यावर नाराज होते.

या सर्व गोष्टींच्या परिणामस्वरूप नरेंद्र मोदींना गुजरात भाजपामध्ये अनेक शत्रू निर्माण झाले होते. त्याचा परिणाम म्हणून १९९२ पासून काही काळ त्यांच्याकडे भाजपाची कोणतीही जबाबदारी नव्हती. नंतर त्यांच्यावर पंजाब, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश या राज्यांचे संघटन प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली. हरियाणा राज्यातील पंचकुला हे त्यांच्या कामाचे

केंद्रस्थान व निवासस्थान ठरवण्यात आले होते. गुजरात राज्यातील भारतीय जनता पक्षाचे नेते व संघाकडून भाजपामध्ये पाठवलेले संजय जोशी यांच्या दबावामुळे भाजपाच्या राष्ट्रीय नेत्यांनी नरेंद्र मोदींना वनवासात पाठवले अशी चर्चा पुढे बरेच दिवस गुजरात भाजपामध्ये सुरू होती.

आपल्या देशातील प्रत्येक राजकीय पक्षामध्ये पक्षनिष्ठेपेक्षा व्यक्तिनिष्ठेला जास्त महत्त्व असते. पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे अनेक अनुयायी तयार होतात आणि त्या नेत्यांचा स्वत:चा एक गट तयार होतो. हे मध्यम आणि कनिष्ठ स्तरावरील अनुयायी पक्षाच्या आदेशापेक्षा आपल्या नेत्याच्या आदेशाला जास्त महत्त्व देतात. स्वाभाविकपणे त्या नेत्याच्या आदेशावर नाचणारा कार्यकर्त्यांचा मोठा गट तयार होतो. ज्या नेत्याचा गट जास्त मोठा व ताकदवार तेवढे त्या नेत्याची सौदेबाजीची ताकद (Bargaining Power) वाढते व त्याने त्याचे पक्षातील वजन आणि पक्ष निर्णयामधील हिस्सा (Share in decision power) वाढतो. गटातील कार्यकर्त्यांच्या व्यक्तिनिष्ठेबद्दल (Personal Loyalty) तो नेता वेगवेगळ्या स्तरावरील तिकीट वाटपाच्या वेळी आपल्या अनुयायांची नावे पुढे करतो आणि त्यांच्या व्यक्तिनिष्ठेचा मोबदला चुकता करत असतो. अशी परस्पर हितसंबंधांना जपणारी अयोग्य रचना प्रत्येक राजकीय पक्षामध्ये कमीजास्त प्रमाणात आढळते. भारतीय जनता पक्ष स्वत:ची प्रसिद्धी जरी इतरांपेक्षा वेगळा पक्ष (a party with difference) अशी करत असला तरी भाजपामध्ये असे अनेक गट अस्तित्वात आहेत.

गुजरात भाजपामध्ये १९९० च्या दशकामध्ये केशुभाई पटेल हे पाटीदार-पटेल समाजाचे वजनदार नेते होते. शिवाय शंकरसिंह वाघेला हे अन्य समाजाचे नेते देखील गुजरात भाजपामध्ये आपले वजन राखून होते. केशुभाई पटेल हे जनसंघाच्या काळापासून पक्षात असल्याने संघाच्या व्यक्तीसापेक्ष कार्यपद्धतीनुसार संघ अधिकाऱ्यांच्या मनात त्यांच्याविषयी जुना विश्वासू कार्यकर्ता व नेता म्हणून विशेष आदर होता. त्यामुळे केशुभाई पटेल यांच्यामागे भाजपाचे त्या वेळचे संघटन मंत्री संजय जोशी तसेच भाजपामधील जुने कार्यकर्ते हरेन पंड्या, नलीन भट्ट, काशीराम राणा, महेंद्र त्रिवेदी असे कार्यकर्ते ठामपणे उभे राहिले.

याउलट नरेंद्र मोदींच्या व्यक्ती निरपेक्ष आणि विषयकेंद्रित (Object

Oriented) कार्यपद्धतीमध्ये असा गट तयार करण्याचा विषयही त्यांच्या मनात कधी आला नाही. शिवाय संघाचा प्रचारक म्हणून देखील त्यांच्या मर्यादा त्यांनी सतत पाळल्या होत्या. त्यामुळे त्यांनी त्यांच्यावर व्यक्तिगत निष्ठा ठेवणाऱ्यांचा गट कधीच निर्माण केला नव्हता. नरेंद्र मोदींच्या नेतृत्व गुणांची व संघटन कौशल्याची झलक गुजरात भाजपाच्या सर्व नेत्यांना वारंवार पाहायला मिळाली होती. शिवाय राजकारणात महत्त्वाच्या ठरणाऱ्या कूटनीतीमध्ये देखील नरेंद्र मोदी तज्ज्ञ होते. त्यामुळे गुजरात भाजपामधील सर्व प्रस्थापित नेते या ४२ वर्षांच्या तरुणाकडे आपला तगडा प्रतिस्पर्धी म्हणूनही पाहात होते. ते मोदींना घाबरत होते.

या सर्व गोष्टींचा परिणाम स्वरूप नरेंद्र मोदींना गुजरात भाजपामधील अनेक प्रस्थापितांचा विरोध सुरू झाला. "नरेंद्र मोदींना आता राष्ट्रीय स्तरावरच जबाबदारी द्या. गुजरात प्रांतात त्यांना पुन्हा आणू नका." असे म्हणणाऱ्यांचा मोठा दबावगट तयार झाला. त्याचा परिणाम म्हणून सन १९९२ मध्ये काही काळ नरेंद्र मोदींकडे गुजरात भाजपाची कोणतीही जबाबदारी नव्हती. केंद्रातील भाजपा नेत्यांनी राज्यातील नेत्यांच्या दबावाला बळी पडून नरेंद्र मोदींना गुजरात राज्याबाहेर काम देण्याचा निर्णय घेतला. सन १९९३ मध्ये नरेंद्र मोदींवर पंजाब, हरियाणा व हिमाचलप्रदेश या तीन राज्यांचे भाजपाचे संघटन मंत्री म्हणून जबाबदारी सोपवली गेली. त्यांच्या कामाचे केंद्र हरियाणामधील पंचकुला हे ठरवण्यात आले. नरेंद्र मोदी आज्ञाधारक स्वयंसेवक असल्याने पंचकुला येथे स्थलांतरित झाले.

नरेंद्र मोदी आपल्या आयुष्यातील प्रत्येक प्रतिकूल प्रसंगात अत्यंत संयमाने वागले आहेत. ज्या गुजरातच्या भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी पक्षाच्या वाढीसाठी नरेंद्र मोदी आम्हाला हवे असा आग्रह धरला होता आणि नंतर नरेंद्र मोदींनी दिवसरात्र काम करून राज्यात भाजपाला यश मिळवून दिलं असं मोदींचं जाहीर कौतुक देखील केलं होतं, त्याच पक्षाच्या नेत्यांनी मोदींना राज्याबाहेर पाठवा असा टोकाचा आग्रह धरला होता. नरेंद्र मोदींचा आत्मविश्वास प्रचंड होता, त्यांनी शांतपणाने हा अपमान सहन केला. एखाद्या आज्ञाधारक सैनिकाप्रमाणे त्यांनी हरियाणा, पंजाब व हिमाचल प्रदेशात भारतीय जनता पक्षाच्या कामाला वाहून घेतले.

या तीन राज्यांची संघटन मंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यावर त्यांनी

या तीन राज्यांमध्ये सर्वदूर प्रवास केला. आपल्या खास व्यवस्थापन शैलीमध्ये त्यांनी या तीन राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका व विधानसभा आणि लोकसभा मतदार संघांची संपूर्ण माहिती गोळा केली.

नरेंद्र मोदींना तंत्रज्ञान कौशल्याबद्दल (Techno savvy) विशेष ओळखले जाते. पंचकुला येथे राहाताना एक दिवस ते बाहेरगावी गेले असताना त्यांच्या खोलीत चोरी झाली. त्याकाळातही त्यांच्याकडे टेलिव्हिजन सेट, मोबाइल फोन, कॉम्प्युटर होता आणि त्यातला टेलिव्हिजन सेट चोरांनी चोरून नेला होता. या विजनवासातल्या दिवसांचा उपयोग मोदींनी देशभरातल्या, जगभरातल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थितीची माहिती संकलित करण्यासाठी आणि त्या माहितीचे वाचन, मनन आणि चिंतन करून आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी करून घेतला. चंदीगडचे माजी खासदार सत्यपाल जैन यांच्या शब्दात सांगायचे तर, मला आठवते की, त्या काळातही (सन १९९३-९५) मोदी कॉम्प्युटर आणि मोबाइल वापरायचे. त्यांना संगणकाचे पूर्ण ज्ञान होते. त्यांची स्मरणशक्ती अतिशय तीक्ष्ण होती. ते सतत वाचन व अभ्यासात गर्क असायचे. ते अत्यंत कमी खायचे आणि रात्री फार कमी वेळा जेवायचे. बऱ्याच वेळा ते रात्री गाजराचा रस फक्त प्यायचे. त्यांना चालायची फार आवड होती आणि रात्री बऱ्याच वेळा तळ्यापर्यंत चालत जायचे.

पंचकुलामधील वर्षांमध्ये नरेंद्र मोदींनी स्वत:चे कठोर आत्मपरीक्षण केले. आपल्या व्यक्तिमत्त्वातल्या एक यशस्वी राजकारणी होण्यासाठी असलेल्या उणिवा त्यांनी निश्चित केल्या आणि त्या उणिवा दूर करण्यासाठी स्वत:मध्ये आवश्यक ते बदल देखील केले. गुजरातमधल्या किंवा देशभरातल्या राजकारणातल्या घडामोडींशी त्यांचा प्रत्यक्षात संबंध जरी नसला तरी त्या प्रत्येक घडामोडीची सविस्तर माहिती ते घेत असत. एखाद्या राजकीय घडामोडीची माहिती घेतल्यावर त्या परिस्थितीतील योग्य किंवा विजय मिळवून देणारी रणनीती (winning strategy) काय असली पाहिजे याचे निरीक्षण देखील ते नोंदवून ठेवत असत. आजकाल व्यवस्थापन शास्त्राच्या (management science) अभ्यासक्रमात मॅनेजर्सना जशा केसस्टडी दिल्या जातात तशा प्रकारच्या प्रत्यक्ष राजकीय घडामोडींच्या केसस्टडीजचा मोदी अभ्यास करीत असत.

गुजरात भाजपापासून दूर असण्याच्या काळात नरेंद्र मोदींनी ओव्हरसीज फ्रेंड्स ऑफ बीजेपी (OF BJP) या संघटनेच्या निमंत्रणावरून भाजपाच्या प्रचारासाठी १९९३, १९९७ व २००० साली अमेरिकेचा प्रवास देखील केला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रेरणेने डॉ. मुकुंद जोशी, सुरेश जानी व अन्य अनिवासी भारतीयांनी स्थापन केलेल्या भारतावर प्रेम करणाऱ्या या संघटनेच्या अमेरिकेत २२ शाखा आहेत. १९९३च्या आपल्या डॉ. मुरलीमनोहर जोशींबरोबर दिलेल्या अमेरिका भेटीत मोदींनी अधिकृत कार्यक्रमांबरोबरच भरपूर प्रवासही केला. अमेरिकेतील अनेक प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. अमेरिकेतल्या जगप्रसिद्ध स्टॅच्यू ऑफ लिबर्टी (statue of Liberty) पाहिल्यावर त्यांची स्वाभाविक प्रतिक्रिया होती. 'आपल्या देशात का अशी भव्य स्मारके उभारली जात नाहीत?' या प्रवासातच नरेंद्र मोदींनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे निवासस्थान असलेल्या 'व्हाईट हाऊस'चे दर्शन घेतले. सर्व प्रवाशांना व्हाईट हाऊसचे दर्शन कंपाऊंडच्या बाहेरूनच घ्यावे लागते, त्याप्रमाणे मोदींनी देखील ते बाहेरूनच घेतले. व्हाईट हाऊसच्या कंपाऊंड बाहेरून व्हाईट हाऊसकडे बघताना त्यांच्या मनात काय विचार आले असतील? एका जिद्दी माणसाच्या दृष्टिकोनातून तुम्हीच विचार करा.

या सर्व अन्य गोष्टींबरोबरच या काळात ते तीन राज्यातील संघटन मंत्री म्हणून असलेली जबाबदारी देखील चोखपणे पार पाडीत होते. त्या काळात चंदीगड नगरपालिकेत भाजपाचे अस्तित्व अगदी नगण्य होते. मोदी संघटन मंत्री असताना त्यांनी भारतीय जनता पक्षाला आपल्या विशिष्ट शैलीने निवडणुकीत उतरवले आणि स्वत: निवडणुकीची व्यूहरचना केली. त्याचा अपेक्षित परिणाम होऊन २० पैकी १७ जागा जिंकून भाजपाने चंदीगड नगरपरिषदेत सत्ता मिळवली.

इकडे गुजरातमध्ये १९९५ साली विधानसभा निवडणुका होणार होत्या. सन १९९० पासून चिमणभाई पटेलांच्या संयुक्त सरकारमध्ये भाजपा सामील होताच दरम्यानच्या काळात १९९४ साली चिमणभाईंचे निधन झाले. चिमणभाईंच्या नंतर जनता पक्षाकडे तेवढा प्रभावी व पक्षाला एकत्र ठेवू शकणारा नेता उरला नव्हता. त्यामुळे १९९५ सालच्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्ष आपला प्रभाव पाडू शकणार नाही हे स्पष्ट दिसत होते. त्यामुळे भाजपाच्या राज्य व केंद्रातील नेतृत्वाने १९९५ साली

भाजपा विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार हा निर्णय घेतला होता. नरेंद्र मोदी देखील याच मताचे होते आणि या निर्णयात त्यांचा सहभाग होता. निवडणूक पूर्व नियोजनात आणि निवडणूक जाहीर झाल्यावर उमेदवार निवडीमध्ये मोदींचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. निवडणूक पूर्व नियोजनात नरेंद्र मोदींनी आपल्या विशिष्ट नियोजन पद्धतीमधला बूथ मॅनेजमेंटचा मुद्दा लावून धरला. या मुद्द्यावर कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी नरेंद्र मोदींना बोलावण्यात आले. मोदींनी २८००० मतदान केंद्रातील दीड लाख कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले. बूथ हा निवडणुकीच्या लढाईतला महत्त्वाचा किल्ला आहे आणि प्रत्येक किल्ला जिंकल्याशिवाय राज्य जिंकता येत नाही असा संदेश मोदींनी सर्व कार्यकर्त्यांना दिला.

याचबरोबर प्रत्यक्ष उमेदवार निवडीतली नरेंद्र मोदींची भूमिका देखील महत्त्वाची ठरली. भाजपाला येत्या निवडणुकीत चांगली संधी आहे याचा अंदाज आल्याने पक्षाकडे तिकीट मागणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली होती. शिवाय राज्य आल्यावर आपल्यालाच मुख्यमंत्री पद मिळावे यासाठी काही ज्येष्ठ नेत्यांनी आपल्या समर्थकांची नावे लावून धरली होती. शंकरसिंह वाघेला हे मुख्यमंत्री पदाचे प्रबळ दावेदारांपैकी एक होते. नरेंद्र मोदींची व्यक्ती ओळखण्याची क्षमता विलक्षण असल्याने वाघेला हे संघ विचारसरणीच्या प्रेमामुळे पक्षात आले नसून केवळ सत्तेच्या हव्यासाने भाजपामध्ये आले आहेत हे नरेंद्र मोदींनी केव्हाच ओळखले होते. १९९१ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी मोदींनी शंकरसिंह वाघेलांना छोटासा काटशह देखील दिला होता.

अयोध्या रथयात्रेच्या प्रचंड यशामुळे त्या वेळी लालकृष्ण अडवाणी प्रकाशझोतात आले होते. १९९१च्या लोकसभा निवडणुकीत अडवाणी निवडून येऊ नयेत यासाठी विरोधी पक्ष एकत्र आले होते. त्यामुळे अडवाणी एका सुरक्षित मतदार संघाच्या शोधात होते. गुजरातमधला गांधीनगर लोकसभा मतदार संघ हा त्या काळी भाजपाचा गड मानला जात असे. शंकरसिंह वाघेला तेथून खासदार म्हणून १९८९ मध्ये निवडून आले होते आणि १९९१ साली पुन्हा उभे राहणार होते. निवडणुका तोंडावर आल्या असताना नरेंद्र मोदींनी अचानकपणे एक राजकीय डाव टाकला. त्यांनी लालकृष्ण अडवाणींना तुम्ही गांधीनगर वरून लोकसभा निवडणूक लढवा असा

प्रस्ताव दिला. काळजीग्रस्त अडवाणींनी तो लगेच मान्य केला. अत्यंत नाईलाजाने वाघेलांना गांधीनगरची जागा अडवाणींसाठी सोडावी लागली; त्या निवडणुकीत मोदींनी अडवाणींना प्रचंड बहुमताने निवडून आणले. गोध्रा मतदारसंघात ऐनवेळी उभ्या राहिलेल्या शंकरसिंह वाघेलांना निसटता विजय मिळाला होता. एकाच दगडात मोदींनी दोन पक्षी मारले होते.

१९९५च्या निवडणुकीच्या तिकीट वाटपात नरेंद्र मोदींनी आपल्या व्यूहरचना शैलीचा मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे वापर केला. एकतर त्यांना संपूर्ण राज्याची खडान्‌खडा माहिती होती शिवाय व्यक्तिपरीक्षेचं, समोरच्या व्यक्तीच्या विचारप्रवाहांच्या आकलनाचं तंत्र त्यांनी संघप्रचारक असल्यापासून उत्तम प्रकारे विकसित केलं होतं. या निवडणुकीत भाजपाला बहुमत मिळेल याची खात्री त्यांना होती पण बहुमत मिळाल्यावर स्थिर सरकार देण्यात भाजपा यशस्वी होईल का याची त्यांना काळजी होती. त्यामुळे उमेदवार निवडताना संघ आणि भाजपा यांच्याशी जास्तीत जास्त एकनिष्ठ उमेदवाराला तिकीट देण्याची व्यवस्था त्यांनी केली.

विधानसभा निवडणुकीचे निकाल भाजपाच्या अपेक्षेपेक्षा अधिक चांगले लागले. विधानसभेच्या १८२ जागांपैकी १२१ जागांवर पक्षाला विजय मिळाला. या विजयाचे श्रेय घेण्यात आणि मुख्यमंत्रीपदावर हक्क सांगण्यात शंकरसिंह वाघेला आघाडीवर होते. सुरुवातीला मुख्यमंत्री निवडण्याच्या बैठकीपासूनच त्यांनी अडवणुकीचे धोरण स्वीकारले. पक्षनेतृत्वाने व बहुसंख्य आमदारांनी केशूभाई पटेल यांचे नाव सुचवले होते. नरेंद्र मोदींनी त्यात मोठा पुढाकार घेतला होता. मात्र वाघेलांनी आपले समर्थक आमदार विधानसभेत विश्वासदर्शक ठरावाच्या विरुद्ध मतदान करतील अशी धमकी दिल्याने पक्ष नेतृत्वाने समझोता करून छबिलदास मेहता यांना मुख्यमंत्रीपदी नेमले. हा समझोता घडून आणताना त्यामागे नरेंद्र मोदींची रणनीती होती. वाघेलांना मुख्यमंत्रिपदापासून जेवढे जास्त दिवस दूर ठेवता येईल तेवढे ठेवल्यास त्यांच्या गटातील आमदारांची संख्या कमी कमी होत जाईल, आणि त्यांची ताकद कमी झाल्यावर पक्ष नेतृत्वाला हवे तसे निर्णय घेता येतील अशी मोदींची रणनीती होती.

मात्र सत्तेचा हव्यास माणसातील संयम, पक्षनिष्ठा, सारासार विचार क्षमता, विवेक यांना पराभूत करतो असे म्हणतात, त्याचा प्रत्यय गुजरातमध्ये

आला. ज्या केशूभाई पटेल यांना सबळ करून मुख्यमंत्री बनवण्यासाठी नरेंद्र मोदी अथक प्रयत्न करीत होते त्यांनीच वाघेलांशी गुप्त समझोता केला. शंकरसिंह वाघेलांचा नरेंद्र मोदींवर प्रचंड राग होता कारण वाघेलांची सत्ता भांडून व हिसकावून घेण्याची प्रत्येक खेळी मोदींनी निष्प्रभ केली होती. हा राग ओळखून केशूभाईंनी एक विचित्र खेळी केली. त्यांनी वाघेलांना पर्याय दिला की, ''आपण दोघे मिळून गुजरातच्या सद्यस्थितीचा ठपका नरेंद्र मोदींवर ठेवू आणि त्यांना गुजरातच्या राजकारणातून कायमचे बाहेर फेकू व नंतर गुजरातचे मुख्यमंत्री पद आपण दोघांनी निम्मी वर्षं वाटून घेऊन उपभोगू.'' भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वापुढे हा पर्याय ठेवण्यात आला. 'नरेंद्र मोदींना गुजरातच्या राजकारणातून हद्दपार केल्यास वाघेला हे केशूभाई पटेल यांना मुख्यमंत्री बनवण्यास संमती व पाठिंबा देणार आहे.' केंद्रीय नेतृत्वापुढे अन्य काही पर्याय उपलब्ध नसल्याने नरेंद्र मोदींना विश्वासात न घेताच हा पर्याय स्वीकारण्यात आला. फक्त २५ दिवस मुख्यमंत्री असलेल्या छबिलदास मेहता यांना हटवून १४ मार्च १९९५ ला केशूभाई पटेल यांना मुख्यमंत्री करण्यात आले. पटेल आणि वाघेला यांनी टाकलेल्या अटीनुसार केंद्रीय नेतृत्वाने नरेंद्र मोदींना बोलावून हा निर्णय सांगितला व 'यापुढे मी गुजरातच्या राजकारणात कधीच लक्ष घालणार नाही' अशी शपथ देखील घ्यायला लावली. नरेंद्र मोदी यांनी अत्यंत शांत व संयमी वृत्तीने ही शपथ घेतली आणि आज्ञाधारक सैनिकाप्रमाणे पुढे ती शपथ पाळली देखील.

नंतरच्या काळात देखील गुजरातमधील राजकीय अस्थिरता कायम राहिली. सतत मुख्यमंत्री बदलून पक्षांतर्गत गटांच्या दबावापुढे भाजपाचे केंद्रीय नेतृत्व झुकत राहिले. परंतु या सर्व निर्णयप्रक्रियेमधून नरेंद्र मोदींना वगळण्यात आले होते आणि नरेंद्र मोदींनी देखील स्वत: या प्रक्रियेत जाण्याचा प्रयत्न केला नाही. मोदींच्या स्वभावानुसार गुजरातमध्ये घडत असलेल्या प्रत्येक बारीकसारीक घटनेची सविस्तर माहिती मात्र ते घेत असत. वाघेलांच्या पक्षविरोधी कारवाया सुरूच राहिल्या. १९९८ साली ते पक्षातून बाहेर देखील पडले.

नरेंद्र मोदी आपल्यावर दिलेल्या नव्या जबाबदारीमध्ये देखील आपल्या संपूर्ण क्षमतेने कामात उतरले होते. त्यांच्यावर १९९५ साली भाजपाचा

राष्ट्रीय सचिव म्हणून पाच राज्यांची जबाबदारी देण्यात आली. पंजाब, हरियाणा आणि हिमाचल प्रदेशाच्या संघटक पदाच्या जबाबदारी बरोबरच चंदीगड व जम्मू काश्मीर राज्याची जबाबदारी नव्याने देण्यात आली. या प्रत्येक राज्यात त्यांनी आपल्या संघटन कौशल्याची आणि उत्कृष्ट व्यूहरचना कौशल्याचा वापर करण्यास सुरुवात केली.

त्यांनी नवा कार्यभार स्वीकारला तेव्हा हरियाणामध्ये काँग्रेसचे राज्य होते. १९९१ सालच्या निवडणुकीत भाजपाला अवघ्या दोन जागा मिळाल्या होत्या. १९९६ च्या मध्यामध्ये हरियाणा विधानसभेच्या निवडणुका होणार होत्या. मोदींनी पूर्ण राज्याचा दौरा केल्यावर त्यांच्या लक्षात आलं की, भाजपा स्वबळावर निवडणूक लढवू शकत नाही. भाजपाने १९९१ साली ८९ जागा लढवून हा प्रयोग केला होता आणि फक्त दोन जागा त्यांना जिंकता आल्या होत्या. मोदींनी १९९६ च्या निवडणुकीत बन्सीलाल यांच्या हरियाणा विकास पार्टीशी गठबंधन करण्याचा निर्णय घ्यावा असे सुचवले. केंद्रीय नेतृत्वाने ते मान्य केले. या निर्णयामुळे १९९६ सालच्या विधानसभा निवडणुकीत या गठबंधनाला ८० पैकी ४८ जागी विजय मिळाला आणि सत्ता देखील मिळाली. या निवडणुकीत भाजपाने २५ जागांवर निवडणूक लढवली. आणि ११ जागांवर विजय मिळवला. निवडणुकीपूर्वी मोदींच्या सूचनेला भाजपाच्या काही केंद्रीय नेत्यांनी नैतिक व तात्त्विक मुद्द्यांवर विरोध करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र निकालानंतर त्यांचा आवाज बंद झाला.

जम्मू-काश्मीर हे राज्य भाजपाच्या दृष्टीने अत्यंत प्रतिकूल राज्य मानलं जात असे. मोदींकडे जेव्हा जबाबदारी दिली गेली तेव्हा राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होती. १९९६ साली राज्यात निवडणुका जाहीर झाल्या. राज्यातील परिस्थितीचे नीट आकलन करून मोदींनी जम्मू भागात लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. विधानसभेचा निकाल जाहीर झाला तेव्हा सर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला. जरी राज्यात सर्वांच्या अपेक्षेप्रमाणे फारुख अब्दुल्ला यांचे सरकार निवडून आले असले तरी दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून प्रथमच भारतीय जनता पक्ष निवडून आला होता. भाजपाला काँग्रेस व जनता दलापेक्षा जास्त जागा मिळाल्या होत्या.

हिमाचल प्रदेश हे नरेंद्र मोदींच्या जबाबदारीतले महत्त्वाचे राज्य होते.

भाजपाला अनुकूल असलेल्या राज्यांमध्ये हिमाचल प्रदेशचा समावेश केला जात असे. सन १९९० सालच्या विधानसभा निवडणुकांमध्ये या राज्यात भाजपाला सत्ता मिळाली होती. सन १९९२ साली बाबरी मशीद पाडल्यानंतरच्या घटनांमुळे या राज्यातले सरकार कोसळले. त्यानंतर १९९३ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला अत्यंत कमी जागी यश आले होते. मोदींनी जेव्हा जबाबदारी स्वीकारली तेव्हा या राज्यात भाजपाचे अस्तित्व नगण्य होते. दरम्यान सत्ताधारी काँग्रेसमध्ये फूट पडून पूर्वीचे दूरसंचार मंत्री सुखराम यांनी हिमाचल विकास काँग्रेस नावाचा स्वतंत्र पक्ष काढला होता. १९९८ साली विधानसभा निवडणूक जाहीर झाली तेव्हा राज्यातील काँग्रेस पक्षाबद्दल मतदार नाराज होतेच शिवाय सुखराम यांचा पक्ष काँग्रेसच्या विरोधात उभा राहणार होता. सुखराम यांच्या पक्षाबरोबर भाजपाने संयुक्तपणे निवडणूक लढवली असती तर त्यांच्या विरुद्ध सिद्ध झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचा नकारात्मक परिणाम भाजपाच्या मतांवर झाला असता. त्यामुळे या राज्यात निवडणूक रणनीती ठरवताना मोदींनी सुखरामच्या पक्षाशी उघडपणे हातमिळवणी करणे टाळले परंतु सुखरामशी संपर्क सुरू ठेवला. निवडणुकीचा निकाल थोडासा विचित्र लागला. भाजपा आणि काँग्रेस दोन्ही पक्षांना प्रत्येकी ३१ जागा मिळाल्या आणि सुखराम यांच्या पक्षाला ५ जागा मिळाल्या. एक अपक्ष उमेदवार निवडून आला.

निवडणूक निकालानंतर नरेंद्र मोदींनी त्वरित हालचाल करून सुखराम यांना विश्वासात घेतले. भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेत्यांची समजूत काढून त्यांचे लाडके नेते शांता कुमार यांच्या ऐवजी प्रेम कुमार धुमल या स्वच्छ चारित्र्याच्या आणि सर्वसमावेशक स्वभावाच्या नेत्याला मुख्यमंत्री बनवले. प्रेम कुमार धुमल यांच्या चांगल्या कारकिर्दीच्या परिणामस्वरूप सन २००७ साली जनतेने त्यांना पुन्हा २-३ बहुमताने मुख्यमंत्री बनवले.

१९९८ सालच्या लोकसभा निवडणुकीत चंदीगड येथे भाजपाचे उमेदवार निवडीचा प्रश्न होता. पवनकुमार बन्सल तिथले काँग्रेसचे प्रस्थापित खासदार होते. नरेंद्र मोदींनी पूर्ण मतदार संघाचा व उपलब्ध उमेदवारांचा अभ्यास करून सत्यपाल जैन यांना उमेदवारी दिली. त्यांनी पवन कुमार बन्सल यांना पराभूत करून विजय मिळवला.

या काळात नरेंद्र मोदींच्या संघटन कौशल्याचा आणि अचूक निर्णय

क्षमतेचा सर्वात मोठा पुरावा पंजाब राज्यातील निवडणुकांमध्ये मिळाला. १९९७ पूर्वी पंजाबमध्ये निवडणुका जाहीर झाल्या. पंजाब विधानसभेत त्या पूर्वी भाजपाला फारसे यश मिळालेले नव्हते. पंजाबमधील तत्कालीन राजकीय परिस्थितीचा अभ्यास करून मोदींनी केंद्रीय नेतृत्वापुढे आपण अकाली दलाशी गठबंधन करून संयुक्तपणे विधानसभा निवडणूक लढावी असा सल्ला दिला. अकाली दल भाजपाला फारशा जागा (मतदार संघ) द्यायला तयार नव्हता. फार प्रयत्नांनी मोदींनी ते गठबंधन घडवून आणले. त्या निवडणुकीत या गठबंधनाला प्रचंड मोठा विजय मिळाला. एकूण ११८ जागांपैकी गठबंधनाला ९३ जागा मिळाल्या. भाजपाने २२ जागा लढवल्या आणि त्यातल्या १८ जागांवर विजय मिळवला. मोदींच्या उत्कृष्ट व्यूहरचनेचे पुन्हा एकदा सर्वदूर कौतुक झाले.

१९९८ साली नरेंद्र मोदींना भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय मुख्य सचिव (संघटन) National General Seretary (Organisation) पद बहाल करण्यात आले. त्यांचे मुख्यालय नवी दिल्ली येथील पक्षकार्यालय झाले. भारतीय जनता पक्षाच्या पक्ष रचनेमध्ये हे संघटनात्मक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पद आहे. संपूर्ण देशभरातील पक्ष संघटनेमधील समन्वय साधण्याचे काम या पदावर बसलेल्या व्यक्तीवर असते. यापूर्वी या पदावर कुशाभाऊ ठाकरे, सुंदर सिंह भंडारी या सारख्या मातब्बर नेत्यांनी काम केले आहे. वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी नरेंद्र मोदींना ते देण्यात आले. नरेंद्र मोदींनी या पदावर काम करताना पक्षातील महत्त्वाच्या व्यक्तींशी आपले संबंध वाढवण्यास सुरुवात केली. पुढील राजकीय कारकिर्दीत या संबंधांना महत्त्व प्राप्त होणार होते. पक्षाचे त्या वेळचे अटलजींनंतरचे क्रमांक दोनचे नेते लालकृष्ण अडवाणी यांच्याशी रामजन्मभूमीमुक्ती आंदोलनातील रथयात्रेच्या निमित्ताने चांगले घनिष्ठ संबंध होतेच. १९९० सालच्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी अडवाणी खात्रीशीर मतदार संघाच्या शोधात होते. नरेंद्र मोदींनी धूर्तपणे त्यांना गांधीनगर या गुजरात भाजपाच्या अनुकूल मतदार संघातून निवडून आणले होते. यामुळे अडवाणी हे मोदींवर खूश होतेच. आपल्या दिल्लीतील वास्तव्यात नरेंद्र मोदींनी लालकृष्ण अडवाणींचा अधिक विश्वास संपादन केला. त्याचबरोबर पक्षनेतृत्वाच्या दुसऱ्या पिढीशी त्यांनी मैत्री वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी अरुण जेटली यांच्याशी

त्यांची घनिष्ट मैत्री झाली.

सन १९९९ सालच्या लोकसभा निवडणुकांच्या नियोजनात देखील मोदींचा महत्त्वाचा सहभाग होता. या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला आजवरच्या पक्षाच्या इतिहासातील सर्वांत जास्त १८२ जागी विजय मिळाला. यामुळे केंद्रात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (National Democratic Alliance) चे सरकार सत्तेवर आले. यामध्ये अनेक छोटेमोठे पक्ष सामील होते.

भारतीय जनता पक्ष हा हळूहळू काँग्रेसला असलेला खरा पर्याय म्हणून देशभरात प्रस्थापित होत होता. त्या काळी या पक्षाची प्रतिमा हा उच्चवर्णीयांचा (शेटजी आणि भटजी) पक्ष आहे अशी होती. पक्षनेतृत्वापुढे ही प्रतिमा पुसून टाकून हा सर्वसामान्यांचा पक्ष आहे सर्वसमावेशक पक्ष आहे अशी प्रतिमा तयार करण्याचे मोठे आव्हान होते. शिवाय दलित व ओबीसी वर्गातील मतदारांमध्ये देखील पक्षाबद्दल आपुलकी निर्माण करणे आवश्यक होते. यासाठी अटलबिहारी वाजपेयींनी आंध्रप्रदेशातील बंगारु लक्ष्मण या दलित नेत्याच्या हाती पक्षाचे अध्यक्ष पद देऊन एक मोठे पाऊल उचलले देखील परंतु विरोधी पक्षांनी प्रसारमाध्यमांना हाताशी धरून बंगारु लक्ष्मण यांना एका खोट्या लाच प्रकरणात अडकवले आणि त्यांना राजीनामा द्यायला भाग पाडले.

त्या काळात भारतीय जनता पक्षामध्ये ओबीसी (Other Backward Class) या वर्गातले चार होतकरू नेते चर्चेत होते. कल्याणसिंग, गोविंदाचार्य, उमाभारती आणि नरेंद्र मोदी. त्यापैकी गोविंदाचार्य हे राष्ट्रीय स्तरावर मोदींच्या आधीपासून कार्यरत होते, परंतु नरेंद्र मोदी वगळता अन्य तिघे फारशी प्रगती करू शकले नाहीत.

भारतीय जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आला होता. या पक्षाकडून जनतेच्या मोठ्या अपेक्षा होत्या आणि पक्षदेखील यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत होता. नेमक्या याच वेळी नरेंद्र मोदी हे पक्षाच्या केंद्रीय कार्यालयात कार्यरत होते. त्यामुळे पक्षाच्या या कायापालटाचे (Metamorphosis) ते प्रत्यक्षदर्शी साक्षीदार बनले. आपल्या सवयीनुसार मोदी या कायापालटाच्या प्रक्रियेचे सूक्ष्म निरीक्षण करून आपली निरीक्षणे नोंदवून ठेवत होते. लोकांच्या अपेक्षा आणि सरकारचे प्रत्यक्ष काम यातील तफावत काय असते याचा

कार्यानुभव त्या काळात त्यांनी मिळवला आणि पुढील काळात तो त्यांना उपयोगी ठरला.

या संपूर्ण पाच-सहा वर्षांच्या (सन १९९५ ते २००१) काळात गुजरातमध्ये सतत राजकीय अस्थिरता नांदत होती. केशूभाई पटेल विरुद्ध शंकरसिंह वाघेला या वादाने गंभीर स्वरूप धारण करून शंकरसिंह वाघेला १९९६ मध्ये भाजपा मधून आपल्या समर्थक आमदारांसहित बाहेर पडले आणि त्यांनी राष्ट्रीय जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. त्यांनी काँग्रेस पक्षाबरोबर गठबंधन करून २३ ऑक्टोबर १९९६ ते २७ ऑक्टोबर १९९७ या अल्प काळासाठी मुख्यमंत्री पद मिळवले.

त्यांच्या पक्षाला काँग्रेस पक्षाने बाहेरून पाठिंबा दिला होता. मात्र ऑक्टोबर १९९७ ला त्यांचे काँग्रेस पक्षाशी देखील मतभेद झाले आणि त्यांना राजीनामा द्यावा लागला. सत्तेच्या हव्यासाने त्यांनी त्याही परिस्थितीत काँग्रेसची मनधरणी करून दिलीप पारीख यांना मुख्यमंत्री म्हणून पुढे करून सत्ता कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्न देखील फार यशस्वी झाला नाही आणि ४ मार्च १९९८ ला त्यांचे सरकार कोसळले आणि गुजरातमध्ये मध्यावधी निवडणुका घेण्यात आल्या. शंकरसिंह वाघेला हे पक्षनिष्ठ नाहीत असा नरेंद्र मोदींनी दिलेला इशारा शब्दशः खरा ठरला.

या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा नरेंद्र मोदी भाजपाच्या राष्ट्रीय संघटन सचिव म्हणून कार्यरत होते. त्या निवडणुकीतील रणनीती ठरवण्यात आणि उमेदवार निश्चित करण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांनी राज्यातील जनतेच्या मनात वाघेलांच्या स्वार्थीपणाबद्दल आणि त्यांनी भाजपाशी केलेल्या गद्दारीबद्दलचा राग लक्षात घेऊन सोयीचे उमेदवार निवडण्यास मदत केली.

परिणामस्वरूप १९९८च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला १८२ पैकी ११७ जागांवर विजय मिळवता आला. या नवीन भाजपा सरकारचे नेतृत्व स्वाभाविकपणे केशुभाई पटेलांकडे देण्यात आले. केशुभाई पटेल हे समाजमान्यता लाभलेले लोकप्रिय नेते होते. परंतु यशस्वी मुख्यमंत्री म्हणून काम करण्यासाठी त्यांच्याकडे अभ्यासू वृत्ती, प्रशासन कौशल्य, दूरदृष्टी आणि प्रशासनावरची पकड या गुणांचा अभाव होता. त्यामुळे त्यांच्या कारभारावर राज्यातील जनता प्रथमपासूनच फारशी समाधानी नव्हती.

त्यातच २६ जानेवारी २००१ रोजी गुजरातच्या कच्छ जिल्ह्यात महाभयानक भूकंप झाला. या भूकंपाची तीव्रता एवढी जास्त होती की, त्यामुळे सुमारे २०,००० लोक मृत्युमुखी पडले, सुमारे १ लाख ६७ हजार लोक जखमी झाले आणि ४०,००० घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. या महासंकटात सरकारने नियोजनपूर्वक व मोठ्या प्रमाणात मदतकार्य आणि पुनर्वसन कार्य सुरू करण्याची आवश्यकता होती. केशुभाईंनी आपल्या परीने मदतकार्य सुरू केले खरे परंतु त्यात एकसूत्रीपणा नव्हता. केशुभाईंची तब्येतही तेव्हा फार चांगली नव्हती. त्याचा फायदा घेऊन मदत कार्यात भ्रष्टाचार सुरू झाला. या भ्रष्टाचाराच्या बातम्या माध्यमे सविस्तरपणे देऊ लागली. त्यामुळे आधीच भूकंपाने हादरलेल्या गुजराती जनतेच्या मनात भाजपा सरकार विरोधात प्रचंड नाराजी तयार झाली. त्यानंतर झालेल्या विधानसभेच्या बाय इलेक्शनमध्ये आणि सन २००० साली झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपाचा दारुण पराभव झाला. या पराभवानंतर भाजपाचे केंद्रीय नेतृत्व खडबडून जागे झाले. गुजरातमधील पक्ष वाचवण्यासाठी हालचाल केलीच पाहिजे याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली.

गुजरातमध्ये पक्षाला अनुकूल वातावरण असूनही फक्त समर्थ, कार्यक्षम, दूरदृष्टी असलेले नेतृत्व मुख्यमंत्रीपदासाठी उपलब्ध नसल्याने गुजरात राज्य भाजपाच्या हातून निसटून जाते की काय अशी भीती भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाला वाटू लागली. पक्षाकडे उपलब्ध असलेला एकमेव नेता केशुभाई पटेल होते. त्यांना अनेक वेळा संधी देऊनही त्यांना स्वत:चे नेतृत्व गुण सिद्ध करता आले नव्हते. शिवाय राज्यात आलेल्या भूकंपाच्या संकटामुळे त्यांची अकार्यक्षमता सिद्ध झाली होती. त्यातही त्यांच्या ढासळत्या शरीर प्रकृतीमुळे त्यांना बदलणे अपरिहार्य आहे यावर केंद्रीय नेतृत्वात एकमत झाले. प्रश्न होता तो पर्यायी व्यक्तीचा.

या विषयावर केंद्रीय नेतृत्वाच्या अनेक बैठकी झाल्या. अनेक नावांचा विचार व्हावा अशी परिस्थिती नव्हतीच. विशेषत: गुजरात राज्य ज्या गंभीर परिस्थितीतून जात होते त्या परिस्थितीशी सामना करू शकेल अशी व्यक्तीच गुजरात भाजपामध्ये त्या काळी नव्हती. प्रत्येक बैठकीत गुजरातमध्ये आणि पक्षाच्या आदेशामुळे गुजरातमधून बाहेर पाठवल्यावर दिलेली प्रत्येक जबाबदारी

समर्थपणे पार पाडणारे नरेंद्र मोदी यांचे नाव समर्थ पर्याय म्हणून पुढे येत होते. नरेंद्र मोदींना गुजरातमध्ये उपमुख्यमंत्री पद देऊन केशुभाई पटेलांना दुखवू नये असा पर्याय देखील विचारात होता. परंतु नरेंद्र मोदी त्याला तयार होणार नाहीत हे अनेकांनी मान्य केले. शेवटी नरेंद्र मोदींना मुख्यमंत्री करावे यावर केंद्रीय नेतृत्वाचे एकमत झाले.

नंतर प्रश्न पडला हा निर्णय नरेंद्र मोदींच्या गळी कुणी उतरवायचा? कारण याच केंद्रीय नेतृत्वाने १९९५ साली "तू पुन्हा गुजरातच्या राजकारणात लक्ष घालू नये" असा आदेश त्यांना दिला होता. शेवटी खात्रीशीर मार्ग म्हणून पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आली. नरेंद्र मोदी त्या वेळी दिल्लीत नव्हते. ३० सप्टेंबर २००१ रोजी काँग्रेस नेते माधवराव सिंधीया यांच्या विमानाला अपघात झाला. त्या वेळी त्यांच्या विमानात असलेले आज तक चॅनलचे गोपाल बिश्त व रंजन झा यांचे देखील निधन झाले होते. आज तकचे कॅमेरामन गोपाल बिश्त हे नरेंद्र मोदींचे मित्र असल्याने मोदी त्यांच्या अंत्ययात्रेसाठी उत्तरप्रदेश मध्ये गेले होते. त्यांच्याशी फोनवर संपर्क करून अटलजी वाजपेयींनी त्यांना दिल्लीत बोलावून घेतले. दिल्लीत आल्यावर अटलजींनी व उपस्थित केंद्रीय नेत्यांसमोर मोदींना "तुमच्यावर मी गुजरातच्या मुख्यमंत्री पदाची जबाबदारी देत आहे. हा पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने सर्व संमतीने घेतलेला निर्णय आहे. तुम्ही लगेचच अहमदाबादला जाऊन जबाबदारी स्वीकारा. माझ्या तुम्हाला अनेक शुभेच्छा." असा स्पष्ट आदेशच दिला. प्रथम मोदींनी "माझा बरेच वर्षांपासून गुजरातशी संबंध राहिलेला नाही. मला प्रशासनाचा पूर्वानुभव नाही" असे काही मुद्दे त्यांच्यासमोर मांडले. परंतु अटलजींच्या आग्रहापुढे त्यांना झुकावे लागले. अटलजींना नमस्कार करून आणि विनम्रतेने त्यांच्या आदेशाचा स्वीकार करून मोदी पंतप्रधान निवासातून बाहेर पडले. तो दिवस होता २ ऑक्टोबर, २००१.

मित्रांनो, वडनगर या छोट्याशा रेल्वे स्टेशनवर चहा विकणारा एक अतिशय सामान्य घरातला आणि इतर मागासवर्गीय घाँची (तेली) समाजातला मुलगा आपली ध्येयनिष्ठा आणि कठोर परिश्रमाच्या आधारावर वयाच्या ५१व्या वर्षी गुजरातचा मुख्यमंत्री बनला.

संघकार्यालयात झाडलोट आणि कपडे धुण्याच्या कामापासून संघ

सेवा सुरू केलेला एक निष्ठावान, समर्पित संघ स्वयंसेवक आपल्या कर्तृत्वाने एका राज्याचा मुख्यमंत्री बनला. प्रचंड कष्टाने ध्येय प्राप्त करण्याचे मोदी हे एक उत्कृष्ट उदाहरण आहेत.

या पूर्वीच्या प्रकरणात आपण पाहिले की, आपल्या व्यक्तिमत्त्वात सतत गुणात्मक प्रगती करण्याचा नरेंद्र मोदींचा सतत प्रयत्न चालू असतो. भाजपा संघटन मंत्री म्हणून काम करत असतानाच्या १४ वर्षांच्या काळात (सन १९८७ ते २००१) देखील मोदींनी अशी गुणात्मक वाढ निश्चितच केली. शिवाय आपल्या आयुष्यात प्रगतीचा पुढचा टप्पा यावा यासाठी त्यांनी आपल्या अंगातील विविध कौशल्यांचा, गुणांचा पुरावा अनेक प्रसंगांतून, अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडताना सर्वांसमोर सादर केला. त्यामुळेच यशाच्या शिखरावर ते पोहोचले. भाजपाच्या कार्यात असताना मोदींनी ज्या क्षमता मिळवल्या आणि सर्वांसमोर सिद्ध करून दाखवल्या त्याचा गोषवारा पुढे देत आहे. उज्ज्वल यशप्राप्तीसाठी आपण सर्वांनी त्या क्षमता, ते उत्कृष्ट गुण मिळवलेच पाहिजेत.

**रा. स्व. संघ व भाजपावरील निर्विवाद निष्ठा (Undisputed loyalty to RSS & Bhartiya Janata Party) :** ज्या गुजरातमधील भारतीय जनता पक्षाचं राज्यातील अस्तित्व वाढावं यासाठी नरेंद्र मोदींनी अथक प्रयत्न केले व योजनापूर्वक काम करून पक्षाला यश मिळवून दिलं. त्या पक्षातील सत्तासंघर्षामुळे नरेंद्र मोदींना अपमानीत व्हावं लागलं. सत्तेसाठी झगडणाऱ्या स्वार्थी नेत्यांच्या आग्रहावरून नि:स्वार्थीपणे काम करणाऱ्या प्रचारकाला राज्याबाहेर पाठवण्यात आलं. या प्रसंगातही नरेंद्र मोदींनी आपली प्रचारकाची शिस्त सोडली नाही. संघावरील निष्ठा आणि पक्षावरील निष्ठा ढळू दिली नाही. संघाविरुद्ध किंवा पक्षाविरुद्ध कोठेही बडबड केली नाही. उलट पक्षाने सांगितल्यानंतर गुजरात राज्यातील भाजपामध्ये कधीही लक्ष घातलं नाही. आपला अपमान संघनिष्ठेपायी व भाजपावरील प्रेमापोटी चूपचाप सहन केला. या त्यांच्या कट्टर निष्ठेमुळे पुढे त्यांना यशाच्या शिखरावर पोहोचता आलं.

**सर्वगुणसंपन्नतेचा ध्यास (Passion for Excellence) :** भाजपा प्रचारक म्हणून काम करत असताना पंचकुलामध्ये पाठवण्यात आल्यावर उपलब्ध झालेल्या फावल्या वेळाचा फायदा घेऊन मोदींनी स्वत:चे कठोर

आत्मपरीक्षण केले. एक राजकीय कार्यकर्ता, नेता म्हणून आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये काय त्रुटी आहेत याची यादी तयार केली आणि प्रयत्नपूर्वक त्या त्रुटीही दूर केल्या. त्या काळात कॉम्प्युटर नवीन होते तरीही त्यांनी प्रयत्नपूर्वक कॉम्प्युटर शिकून घेतला. पंचकुलामधल्या त्यांच्या निवासस्थानात कॉम्प्युटर, टेलिव्हिजन, मोबाइल अशी सर्व अद्यावत उपकरणे १९९५ साली देखील होती. भाजपाच्या अन्य कोणत्याही प्रचारकाकडे त्या काळात अशी उपकरणे नव्हती. आपल्या राजकीय ज्ञानात त्यांनी भरपूर भर टाकली. जगभराच्या राजकारणातील प्रवाह आणि अंतर्प्रवाहांची माहिती घेतली. एकंदरीत नरेंद्र मोदींनी या काळात (आणि आयुष्यभर) आपले व्यक्तिमत्त्व सर्वगुणसंपन्न असावे यासाठी विशेष प्रयत्न केले. ज्याचा त्यांना त्यांच्या ध्येयप्राप्तीसाठी प्रचंड उपयोग झाला.

**उत्कृष्ट वक्ता आणि संवादक (Excellent orator and Communicator) :** भाजपा प्रचारक म्हणून काम करताना नरेंद्र मोदींनी आपल्या वक्तृत्वशैलीमध्ये प्रयत्नपूर्वक विशेष सुधारणा केल्या. त्यांना लहानपणापासूनच नाटकात अभिनयाची आवड होती. संघप्रचारक म्हणून काम करताना देखील ते उत्कृष्ट वक्ते म्हणून प्रसिद्ध होतेच. मात्र आपल्या परिचित आणि आपल्या विचारधारेतल्या श्रोत्यांना त्यांना माहिती असलेल्या विषयावर संबोधित करणे आणि अपरिचित आणि विचारसरणीच्या बाहेरच्या मतदारांना संबोधित करणे यामध्ये प्रचंड विरोधाभास आहे. मोदींनी हे ओळखून भाजपा प्रचारक असतानाच्या काळात आपल्या वक्तृत्व शैलीमध्ये आमूलाग्र बदल केले. भाजपा प्रचारक असताना त्यांना भाषण देण्याच्या अनेक संधी मिळाल्या त्याचा पुरेपूर फायदा घेऊन 'प्रभावी राजकीय वक्ता' हे कौशल्य आत्मसात केलं. राजकीय व्यक्तीला दुसरा महत्त्वाचा गुण लागतो तो माध्यमांशी संवाद साधण्याचा. माध्यमांशी संवाद म्हणजे एक शिकारी आणि एक सावज यांच्यातला खेळ असतो. तुम्हाला भडकवणारे प्रश्न विचारून तुमच्याकडून खळबळजनक प्रतिक्रिया मिळवण्याच्या प्रयत्नात समोरची व्यक्ती असते. त्यामुळे माध्यमांशी संवाद साधण्यासाठी विशेष तयारी लागते. भाजपा प्रचारक म्हणून काम करत असताना, विशेष करून राष्ट्रीय संघटन सचिव झाल्यावर मोदींनी आवर्जून प्रेस कॉन्फरन्स, टीव्हीवरील चर्चा यामध्ये भाग घेऊन माध्यमांशी संवाद साधण्याची कला अवगत

केली. त्याचा त्यांना पुढील करिअरमध्ये प्रचंड फायदा झाला.

**उत्कृष्ट व्यूहरचनाकार (Master Strategist) :** राजकारणातला प्रत्येक निर्णय हा अपेक्षित यशाच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. आपले नियोजित ध्येय गाठण्यासाठी योजना (Plan) बनवणे आणि त्यानुसार धोरण आखणे महत्त्वाचे असते. यासाठी सद्यपरिस्थितीचे आकलन करणे, आपल्या निर्णयाच्या परिणामांचा अंदाज घेणे आणि निर्णयामुळे होऊ शकणाऱ्या क्रिया व प्रतिक्रियांचा (action and reactions) अंदाज घेणे या व अशा अनेक क्षमतांचा एकत्रित वापर करू शकणारा माणूसच व्यूहरचनाकार (Strategist) म्हणून ओळखला जातो. भाजपा प्रचारक असताना मोदींनी अनेक प्रसंगांतून व्यूहरचनेतील आपली क्षमता सिद्ध करून दिली. १९९६ मध्ये हरियाणा विधानसभा निवडणुकीत बन्सीलाल यांच्या हरियाणा विकास पार्टीशी भाजपाने गठबंधन करावे अशी स्ट्रॅटेजी मोदींनी सुचवली. बन्सीलाल हे नैतिकदृष्ट्या बदनाम व्यक्तिमत्त्व होतं. त्यामुळे नैतिकतेच्या मुद्यावर अनेक केंद्रीय भाजपा नेत्यांनी या व्यूहरचनेला विरोध केला. परंतु राज्यातील सद्यस्थितीची उत्कृष्ट समज नरेंद्र मोदींना असल्याने त्यांची व्यूहरचना यशस्वी ठरली. लगेचच पुढच्या वर्षी १९९७ साली पंजाबमध्ये निवडणुका लागल्या. काँग्रेस विरोधी वातावरण होते. मोदींनी अकाली दलाशी गठबंधन करण्याचा प्रस्ताव मांडला. अकाली दलाचे नेते फारसे उत्सुक नव्हते. परंतु काँग्रेस विरोधी मतांचे विभाजन झाले तर काँग्रेसच परत निवडून येईल हे मोदींनी ओळखले आणि कमी जागांवर समाधान मानून अकाली दलाशी गठबंधन घडवून आणले. परिणामस्वरूप अकाली दल-भाजपा गठबंधनाला अभूतपूर्व यश मिळाले. या व अशा प्रसंगांमधून मोदींनी आपण उत्कृष्ट व्यूहरचनाकार (Master Strategist) असल्याचे सिद्ध केले होते. त्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाच्या वळणावर (Turning Point) त्यांना या गोष्टीचा प्रचंड उपयोग झाला.

**ध्येय केंद्रित कार्यपद्धती (Object Oriented way of workings) :** संघप्रचारक म्हणून १५ वर्षे काम करूनही नरेंद्र मोदींनी आपली कार्यपद्धती विचलित होऊ दिली नाही. संघात स्थानिक पातळीवर व्यक्ती, घराणी, समाजातील त्या व्यक्तीचे वजन, त्या व्यक्तीची संघ विचारांशी असलेली अनुकूलता हे पाहून अशा व्यक्तींना सोयीचे ठरणाऱ्या व्यक्तिकेंद्रित निर्णयांची

पद्धत आहे. संघाचे स्थानिक पातळीवर अनेक निर्णय हे व्यक्ती केंद्रितच असतात. मात्र नरेंद्र मोदींचं हे वैशिष्ट्य आहे की ते नेहमीच ध्येय केंद्रित कार्यपद्धती वापरतात. जगातील कोणत्याही यशस्वी व्यक्तीच्या आयुष्यात आपण डोकावून पाहिले तर सर्व यशस्वी व्यक्तींनी ध्येयकेंद्रित निर्णय घेतले म्हणूनच ते यशस्वी झाले. एकदा ध्येय हे केंद्रस्थानी ठेवले की जो विरोध करेल त्याला बाजूला सारून आणि जो साथ देईल त्याला बरोबर घेऊन मार्गक्रमण सुरू करायचं आणि ध्येय साध्य करूनच थांबायचं हा एकमेव पर्याय असतो. नरेंद्र मोदी हे कठोर हृदयाचे आहेत, ज्यांनी त्यांना पूर्वी मदत केली त्यांना देखील मोदी बाजूला सारतात, अशी टीका टीकाकार मोकळेपणी करत असतात परंतु आपल्या ध्येय केंद्रित कार्यपद्धतीमुळेच नरेंद्र मोदी आज यशाच्या शिखरावर पोहोचले हे सत्य आहे.

**चाणाक्ष राजकारणी (Shrewd Politician) :** आपल्या भारतीय जनता पक्षातील १४ वर्षांच्या प्रचारक म्हणून कार्यकाळात नरेंद्र मोदींनी स्वत:चे रूपांतर आधीच्या ध्येयवेड्या सरळमार्गी संघ प्रचारकातून एका चाणाक्ष राजकारण्यामध्ये करून घेतले म्हणा किंवा त्यांना असे रूपांतर करणे परिस्थितीनुसार भाग पडले म्हणा. परंतु या १४ वर्षांनंतरचे नरेंद्र मोदी हे निश्चितच एक चाणाक्ष राजकारणी बनले होते आणि स्वत:चे तसे रूपांतर केल्यामुळेच ते राजकारणात टिकले. मित्रांनो, समस्त राजकारण्यांचे वर्णन 'मुँह मे शक्कर बगलमें छुरी' असे एका हिंदी कवीने केले आहे. कमीजास्त प्रमाणात हे वर्णन प्रत्येक राजकारणी व्यक्तीला लागू पडते. आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या, आपल्याला भेटणाऱ्या, आपल्याला विरोध करणाऱ्या आणि आपल्याला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाच्या मनात काय दडलेलं आहे हे ओळखण्याचा चाणाक्षपणा असल्याशिवाय राजकारणात टिकता येत नाही. नरेंद्र मोदींनी हा राजकीय चाणाक्षपणा आत्मसात केला म्हणूनच ते यशाच्या शिखरावर पोहोचू शकले.

मित्रांनो, नरेंद्र मोदींच्या आधी कोणाही संघप्रचारकाला भाजपामध्ये सत्तास्थान दिलेले नव्हते. नरेंद्र मोदी हा अपवाद पहिल्यांदाच करण्यात आला. स्वाभाविकच बहुसंख्य चरित्रकारांनी नरेंद्र मोदी हे मुख्यमंत्री होणे हा नियतीचा खेळ आहे असा सूर लावला आहे तर टीकाकारांनी दिल्लीत आल्यापासूनच नरेंद्र मोदी मुख्यमंत्रीपद मिळावे यासाठी प्रयत्न करीत होते

असा स्पष्ट आरोपही केला आहे. मात्र आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे, ते मुख्यमंत्री बनले त्या वेळच्या घटनाक्रमावर.

गुजरातमध्ये २००१ साली झालेला भयानक भूकंप, त्या पार्श्वभूमीवर अत्यंत कार्यक्षम नेतृत्वाची तयार झालेली गरज आणि त्याचवेळी केशुभाई पटेलांची शारीरिक प्रकृती ढासळल्याने तयार झालेली नेतृत्वाची पोकळी. यावेळी असामान्य कार्यक्षमता, उत्तम राजकीय समज आणि अविचल संघ निष्ठा असलेल्या नरेंद्र मोदींचे नाव स्वाभाविकपणे पुढे आले. यावेळी नरेंद्र मोदी हे एकमेव सर्वोत्तम आणि विश्वसनीय पर्याय (Only reliable alternative) म्हणून उपलब्ध होते आणि त्यामुळेच ते यशाच्या शिखरावर जाऊ शकले.

आपल्या आयुष्यात सतत सर्वगुणसंपन्न बनण्याचा प्रयत्न करून, आपल्या ध्येयावर अविचल निष्ठा ठेवून प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास आपण सर्व आपल्या आयुष्यात सर्वोच्च यशापर्यंत जाऊ शकाल.

✦✦

# सर्वोत्तम मुख्यमंत्री

**अ**टलबिहारी वाजपेयी आणि केंद्रीय नेत्यांच्या आदेशानंतर मोदी अहमदाबादला दाखल झाले. त्यांच्यासोबत भाजपामधील ज्येष्ठ नेते व पक्षाचे भूतपूर्व अध्यक्ष कुशाभाऊ ठाकरे व मदनलाल खुराना यांना पाठवण्यात आले होते. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यापूर्वी नरेंद्र मोदींनी त्यावेळचे विद्यमान मुख्यमंत्री केशुभाई पटेलांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली आणि त्यांचा आशीर्वाद मागितला. पूर्वी पडद्याआडून काम करण्याची सवय असलेले नरेंद्र मोदी आता एक प्रसिद्धीच्या झोतात असलेली सार्वजनिक व्यक्ती (Public figure) बनले होते. त्यांच्या प्रत्येक कृतीचे विश्लेषण होणार होते आणि त्यातून काही अन्वयार्थ लावले जाणार होते. नरेंद्र मोदी एक चाणाक्ष राजकारणी असल्याने त्यांनी ही वस्तुस्थिती ओळखली आणि ते या नव्या भूमिकेला सहजपणे सामोरे गेले. आपल्या व्यक्तिमत्त्वात आवश्यक असलेले बदल त्यांनी लगेचच घडवून आणले.

मुख्यमंत्री झाल्यावर नरेंद्र मोदींनी सर्वप्रथम आपल्या मातेचा हिराबाचा आशीर्वाद घेतला आणि मगच आपल्या कामाला सुरुवात केली. आपल्या कर्तृत्वसंपन्न मुलाला मायेने जवळ घेऊन आशिर्वाद देताना त्या मातेचे हृदय गलबलून गेले आणि तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू बाहेर पडले. अत्यंत सामान्य परिस्थितीतील कुटुंबातल्या त्या मातेने त्यावेळी आपल्या मुलाला दिलेला संदेश भारतीय संस्कृतीतल्या मातृशक्तीची ताकद अधोरेखित करून जातो. ''गोरगरिबांसाठी काम कर आणि कधीही कुणाकडून लाच घेऊ नको. आपला स्वाभिमान जतन कर.''

मुख्यमंत्री झाल्यावर मुख्यमंत्री निवासात राहायला जावे लागणार होते. त्यासाठी धनत्रयोदशीचा मुहूर्त ठरला. सरकारी अधिकारी नरेंद्र मोदींकडे या घरात कोणकोण राहायला येणार याची यादी मागू लागले. नरेंद्र मोदी त्यांना

गमतीने म्हणाले, यादी फारच लांबलचक आहे. ''नरेंद्र दामोदरदास मोदी.'' मोदींचे दोन सख्खे भाऊ त्यांच्या मातेसहित अहमदाबादला राहतात अशी माहिती सरकारी अधिकाऱ्यांनी मिळवली होती. साहेबांनी आपली गंमत केली असेल म्हणून पुन्हा अधिकाऱ्याने विचारले, ''आपल्या माताजी आणि भावाच्या कुटुंबाला तरी इथे आणायचं असेल ना?'' नरेंद्र मोदींनी त्यांना सांगितले, ''हा सरकारच्या मालकीचा बंगला आहे. मी राज्यातील जनतेची सेवा करायची जबाबदारी स्वीकारली, ती पूर्ण करता यावी यासाठी या बंगल्याची सुविधा मला मिळते आहे. आपापल्या संसारात गुंतलेल्या माझ्या भावांचा आणि माझ्या आईचा येथे राहायला येण्याचा प्रश्नच कुठे येतो?'' पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांच्या कुटुंबियांची आणि त्यांच्या असंख्य नातेवाइकांची सेवा-चाकरी करण्याची सवय झालेला तो अधिकारी अक्षरश: अवाक् झाला.

मग प्रश्न आला नवीन साहेब राहायला येण्यापूर्वी करायच्या कलशपूजनाचा. धनत्रयोदशीचा मुहूर्त तर ठरला; पण येणाऱ्या पाहुण्यांची आणि कलशपूजन कोण करणार याची माहिती अधिकाऱ्यांनी मागितली. नवीन मुख्यमंत्री 'सिंगल' आहेत हे माहिती होते; पण मग प्रथेप्रमाणे कलशपूजनाला कोणत्या दांपत्याला बसवले जाणार? इथेही त्या सरकारी अधिकाऱ्यांना दुसरा धक्का बसला. नरेंद्र मोदींनी आपल्या कार्यकर्त्यांकडून कलशपूजनासाठी आमंत्रित केलं होतं 'रबीना नरेशकुमार यादव' या दलित समाजातील दलित वस्तीत राहणाऱ्या छोट्या मुलीला आणि तिच्या संपूर्ण कुटुंबियांना, असा सामाजिक आशयाचा गृहप्रवेश करून नरेंद्र मोदींनी आपल्या विचारांची उंची आणि कामाची दिशा मुख्यमंत्री झाल्या झाल्या दाखवून दिली.

नरेंद्र मोदी यांच्यावर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली तेव्हा त्यांच्यासमोर अनेक प्रश्न आ वासून उभे होते. नरेंद्र मोदींनी आपल्या खास शैलीत त्या सर्व प्रश्नांचा अभ्यास करून त्याची सविस्तर यादी आणि वर्गवारी तयार केली. नरेंद्र मोदी हे त्यावेळी निवडून आलेले लोकप्रतिनिधी नव्हते, त्यामुळे मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत त्यांना विधानसभेवर निवडून येणे आवश्यक होते. २००३ साली राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका होणार होत्या, त्या दृष्टीने सरकारची ढासळलेली प्रतिमा सुधारायची होती. २६ जानेवारी २००१ ला गुजरातच्या कच्छ भागात झालेल्या भूकंपाने १९ जिल्ह्यांतल्या ७००० खेड्यांत प्रचंड नुकसान

झालेले होते. त्यांच्या पुनर्वसन कार्याचे सुसूत्रीकरण करून त्या कामांचा घसरलेला दर्जा सुधारायचा होता आणि सर्वांत मोठा प्रश्न होता अचानकपणे मोदींना मुख्यमंत्री केल्यामुळे मनातून प्रचंड नाराज असलेल्या राज्यातील भाजपा नेत्यांचा. मोदींना राज्यातून हद्दपार करून राज्यातील भाजपाच्या सरकारमध्ये आपले स्थान ज्यांनी बळकट करून घेतले होते असे अनेक भाजपा नेते मोदींच्या विरोधात पुन्हा एकत्र आले होते. अत्यंत आव्हानात्मक परिस्थिती राज्यात असल्याने त्या सर्व आव्हानांच्या आडून मोदींना हतप्रभ करून पुढील निवडणुकीच्या आतच राज्यातून पळवून लावायचे आणि आपले राज्यातले स्थान पुन्हा बळकट करायचे यासाठी या भाजपा नेत्यांनी आपली शक्ती पणाला लावायला सुरुवात केली.

मोदींचे मुख्यमंत्रीपद टिकण्यासाठी पहिली महत्त्वाची गरज होती, सहा महिन्यांच्या आत त्यांनी विधानसभेवर निवडून येण्याची. मोदींच्या विरोधकांनी इथूनच अडवणुकीला सुरुवात केली. मोदी ज्या मतदारसंघात मतदार होते त्या इलीसब्रीज मतदारसंघात मोदी विरोधक हरेन पंड्या हे आमदार होते. पक्षश्रेष्ठींनी आदेश देऊनही आपल्या आमदारकीचा राजीनामा देण्यास त्यांनी नकार दिला. तो मतदारसंघ भाजपाचा बालेकिल्ला होता आणि नरेंद्र मोदी त्या मतदारसंघातून निश्चितच निवडून येऊ शकत होते. मोदी विरोधकांनी गुप्त खलबते करून मोदींसाठी एक अवघड मतदारसंघ शोधून काढला आणि तिथले आमदार वजूभाई वाला यांनी मोदींना न विचारताच ''मी मोदींसाठी राजीनामा देत आहे'' असे जाहीर करून टाकले. तो मतदारसंघ होता राजकोट. वर्षानुवर्षे काँग्रेसचा बालेकिल्ला असलेला मतदारसंघ. मोदी विरोधकांना मनोमन खात्री होती की मोदी या मतदारसंघातून नक्कीच पराभूत होतील आणि मोदींचा परस्पर काटा काढण्यात ते यशस्वी होतील. मोदींच्या विरोधात उभे राहिलेले काँग्रेसचे उमेदवार अश्विन मेहता हे स्थानिक उमेदवार होते. मोदी बाहेरचे उमेदवार असल्याचा भरपूर प्रचार करण्यात आला.

नवनवीन आव्हानांचा सामना करणे हा मोदींच्या आयुष्यात दिनक्रमाचा भागच असल्यासारखे वाटते. या आव्हानालाही सामोरे जायला मोदी सज्ज झाले. आपल्या पूर्वीच्या संघ व भाजपा प्रचारक म्हणून असलेल्या संपर्कांचा उपयोग करून त्यांनी पर्यायी प्रचार यंत्रणा उभी केली. स्थानिक आमदाराच्या कार्यकर्त्यांनी नाराजी दाखवून प्रचारात सहभाग घेतला नाही. तरीही मोदींनी

अतिशय उत्तम प्रकारे प्रचार यंत्रणा राबवली आणि ते त्या निवडणुकीत १४७२८ मतांच्या मताधिक्याने निवडून आले. मात्र या पोटनिवडणुकीच्या दिवशीच झालेल्या सयाजीगंज आणि महुआ पोटनिवडणुकांमध्ये भाजपाचे उमेदवार पराभूत झाले होते. नरेंद्र मोदी निवडून आले तो दिवस होता २४ फेब्रुवारी २००२.

निवडणुकीतील विजयाचा जल्लोष करायलाही मोदींना वेळ उपलब्ध नव्हता कारण २७ फेब्रुवारी २००१ रोजी राज्याचा अर्थसंकल्प त्यांना सादर करायचा होता. नवीन रचनेत अपेक्षित निर्णय पटकन घेता यावेत यासाठी अर्थमंत्रीपद त्यांनी स्वत:कडे ठेवले होते. नरेंद्र मोदी राज्य विधानसभेत अर्थसंकल्प सादर करत असतानाच खऱ्या अर्थाने मोदींची अग्निपरीक्षा म्हणता येईल असा एक प्रसंग गुजरातमध्ये घडत होता.

अयोध्येच्या राममंदिर पुर्ननिर्माणासाठी त्यावेळी देशभरातून अयोध्येला कार सेवक जात असत. गुजरातमधूनही अयोध्येला कार सेवक जात असत. २७ फेब्रुवारीला अयोध्येहून कार सेवा करून रेल्वेने गुजरातमध्ये परत येत असलेल्या कार सेवकांवर निर्घृण हल्ला करण्यात आला आणि ५८ महिला, बालके व पुरुषांना रेल्वेच्या डब्यात जिवंत जाळण्यात आले. अत्यंत नीच, बीभत्स आणि क्रूर अशा त्या घटनेची बातमी जशीजशी गुजरातभर पसरत गेली तसातसा प्रतिक्रियेचा वणवा भडकला आणि बघता बघता संपूर्ण गुजरात भर जातीय दंगलीचा भयानक आगडोंब उसळला.

मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार सांभाळून जेमतेम पाच महिने झाले होते. मुख्यमंत्रीपदावर राहण्याची कायदेशीर पूर्तता (विधानसभेवर आमदार म्हणून निवडून येणे) करून फक्त तीनच दिवस झाले होते. राज्यभरातील पोलीस खात्याशी अजून ओळखही व्हायची होती अशा काळात नरेंद्र मोदींसमोर पुन्हा एक भयानक मोठे आव्हान उभे राहिले. अर्थात या आयुष्यातल्या सर्वात मोठ्या आणि नाजूक आव्हानालाही नरेंद्र मोदी तेवढ्याच धैर्याने आणि शांतपणाने सामोरे गेले.

गोध्रा प्रकरणातली दंगल हा नरेंद्र मोदींच्या आयुष्यातील सर्वात मोठा चर्चिला गेलेला विषय आहे. खरं तर मोदींचं नाव राष्ट्रीय स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याला गोध्रा हत्याकांडानंतरची दंगल ही प्रामुख्याने कारणीभूत आहे.

तसा गुजरातमध्ये हिंदू-मुस्लिमांचा दंगा हा काही पहिल्यांदाच झाला असे नाही. १९६७, १९६९, १९८५ व १९९२ ह्या वर्षांमध्ये गुजरातमध्ये प्रचंड मोठ्या हिंदू-मुस्लिम दंगली झाल्या. १९६९च्या अल् अकसा मशीद प्रकरणामुळे अहमदाबाद येथे उसळलेल्या दंगलीत २००० लोकांचा मृत्यू, ४००० च्या वर लोक जखमी आणि ५०,००० च्या वर लोक बेघर झाले होते. मात्र २००१ साली विरोधी राजकीय पक्ष आणि भारतात त्याकाळी वेगाने विस्तारत चाललेली प्रसारमाध्यमे यांनी गोध्रा हत्याकांडानंतरच्या दंगलीला अवास्तव महत्त्व देत एकांगी प्रचार मोहीम चालवली होती.

मित्रांनो, गोध्रा हत्याकांड आणि त्यानंतर उसळलेली दंगल याला जबाबदार कोण? किंवा नरेंद्र मोदींनी दंगल आटोक्यात आणण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेतली की नाही? या विषयांवर चर्चा करणे हा या पुस्तकाचा उद्देश नाही. त्यामुळे मी त्या विषयामध्ये जाणार नाही. मात्र एका ध्येयप्रेरित व्यक्तीच्या जीवनप्रवासाचा अभ्यास करताना अशा कठीण प्रसंगात ती व्यक्ती कशी वागली याचे वस्तुनिष्ठ वर्णन आपल्यासमोर ठेवत आहे.

* २७ फेब्रुवारी सकाळी आठ वाजता गोध्रा स्टेशनवर फैजाबादवरून आलेल्या साबरमती एक्स्प्रेसच्या काही डब्यांना आग लावण्याचा प्रयत्न झाला. यातील एका डब्याची दारे बाहेरून बंद करून त्या डब्यावर पेट्रोल ओतून तो पूर्णपणे जाळण्यात आला. त्यातील ५८ हिंदू यात्रेकरू ज्यामध्ये ४० महिला व लहान मुले आणि १८ पुरुष यांचा जळून मृत्यू झाला. ही बातमी नरेंद्र मोदींपर्यंत दुपारी पोहोचली. पूर्ण तपशील पोहोचेपर्यंत दुपारचे चार वाजले होते. त्यावेळी ही साधी घटना नसून पूर्वनियोजित निर्घृण हत्याकांड आहे हे स्पष्ट झाले. तसेच या घटनेची माहिती जशी सगळीकडे पसरेल तसतशी याबाबतची हिंसक प्रतिक्रिया होऊ शकते हे लक्षात आले. नरेंद्र मोदींनी दुपारी ४.३० वाजता पहिला अधिकृत शासकीय संदेश जारी केला व राज्यभर कायदा व सुव्यवस्थेबाबत तातडीच्या सूचना देण्यात आल्या.

* सायंकाळपर्यंत भाजपा व विश्व हिंदू परिषदेने गुजरात बंदचे आवाहन केले. त्याला तोंड देण्यासाठी २७ तारखेलाच अर्धसैनिक दलाच्या १० कंपन्या व रॅपिड ॲक्शन फोर्सच्या ४ कंपन्या तातडीने मागवण्यात आल्या.

* २७ तारखेलाच गुजरातकडे त्याकाळी उपलब्ध असलेले ६०००

पोलिसांचे दल तणावग्रस्त भागात लगोलग तैनात करण्यात आले. सर्व सुट्टीवरील पोलिसांना कामावर तातडीने हजर व्हायला सांगण्यात आले. २७ तारखेला रात्री ११.०० वा. नरेंद्र मोदींनी सर्व पोलीस अधिकारी व सुरक्षादलांचे अधिकारी यांची मुख्यमंत्री निवासात प्रदीर्घ भेट बैठक घेतली. त्यामध्ये परिस्थितीचा आढावा घेण्यात आला व तातडीच्या उपाययोजना ठरवण्यात आल्या. त्याच रात्री प्रतिबंधात्मक उपाय म्हणून २१७ समाजकंटकांना (१३७ हिंदू ८० मुसलमान) ताब्यात घेण्यात आले. मिटिंगमध्ये ठरल्यानुसार लष्कराला मदतीचे आवाहन लगेचच करण्यात आले.

* जवळपासच्या राज्यांकडे महाराष्ट्र, मध्य प्रदेश व राजस्थान यांच्याकडे अतिरिक्त पोलीस कुमक पाठवण्याची विनंती करण्यात आली.

* २८ तारखेला सकाळी १० वाजता संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस स्वत: गांधीनगरला आले. त्यांच्याकडे लष्कराची मदत मागण्यात आली. एकूण १३ तुकड्या पाठवण्यात आल्या. पहिली तुकडी २८ फेब्रुवारीला रात्री पोहोचली.

* २८ तारखेला नरेंद्र मोदींनी गुजरातच्या जनतेला शांतता व संयम राखण्याचे आवाहन रेडिओ व टीव्हीवरून केले. त्यांच्या आवाहनाची व्हिडिओ क्लीप यूट्यूबवर आजही उपलब्ध आहे, हे आवाहन सतत दाखवण्यात येत होते.

* सैन्याच्या तुकड्यांसाठी वाहने, मोबाईल इ. सर्व अद्ययावत सामग्री दिली गेली. सैन्याला मॅजिस्ट्रेटच्या आदेशाशिवाय गोळीबार करता येत नाही, म्हणून ३२ मॅजिस्ट्रेटची तातडीने नियुक्ती करण्यात आली.

* १ मार्चला दंगल आटोक्यात आणण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांनी दिसताक्षणी गोळी घालण्याचे (Shoot at sight) आदेश दिले. १६ जण पोलिसांच्या गोळीबारात मारले गेले. त्यात १२ हिंदू व ४ मुसलमान होते. नरेंद्र मोदींनी अत्यंत कठोर शब्दातील दुसरे आवाहन जारी केले.

* २ मार्चला एकूण ५७३ व्यक्तींना प्रतिबंधात्मक अटक व ७११ व्यक्तींना गुन्हे करताना अटक करण्यात याली. त्यामध्ये ९५९ हिंदू व ३२५ मुसलमान होते. ३ व ४ मार्चला अटकेचे सत्र जोरात राबवण्यात आले.

* संपूर्ण दंगलीच्या काळात राज्यात ६००० पोलीस, ६५ CRPF व २९ CPMF कंपन्या आणि २६ लष्कराच्या तुकड्या असे कायदारक्षकांचे

बळ कार्यरत होते.

* संपूर्ण दंगलीच्या काळात या सुरक्षारक्षकांनी एकूण १०३५५९ राउंड्स एवढा गोळीबार केला आणि यातील ८० टक्के राउंड्स पहिल्या तीन दिवसांतच वापरण्यात आल्या होत्या.

* संपूर्ण दंगल काळात ७७१२९ लोकांना अटक करून ठेवण्यात आले होते त्यापैकी ६६२६८ हिंदू व १०८६१ मुसलमान दंगेखोर होते.

* एवढ्या सर्वव्यापी प्रचंड प्रयत्नांमुळे ही दंगल तीन दिवसांतच आटोक्यात आली. या दंगलीच्या काळात अनेक दिवस मोदी अहोरात्र काम करत होते. राज्यातल्या कानाकोपऱ्यातल्या घटनांवर सतत लक्ष ठेवून होते. आपल्या वरील जबाबदारी पार पाडण्यासाठी केलेल्या कष्टांचे, घेतलेल्या परिश्रमांचे एक उत्कृष्ट उदाहरणच या निमित्ताने नरेंद्र मोदींनी घालून दिले.

वस्तुस्थिती वर वर्णन केल्याप्रमाणे होती. मात्र त्याकडे सोयीस्करपणे कानाडोळा करून काही प्रसारमाध्यमे काँग्रेस पक्ष, अन्य विरोधी पक्ष, तथाकथित पुरोगामी वर्ग एवढेच नव्हे तर खुद्द भाजपामधले काही विशिष्ट नेते यांनी नरेंद्र मोदींवर टीकेची झोड उठवली. केंद्रामध्ये त्यावेळी भाजपाप्रणित एन.डी.ए. (National Democratic Alliance) चे सरकार होते. त्यातील काही घटक पक्ष देखील मोदींवर टीका करू लागले. या आघाडीतल्या द्रमुक आणि तेलगू देसम पार्टीने संसदेत मोदींवर टीका केली. भाजपामधील टीकाकारांना गप्प करण्यासाठी नरेंद्र मोदींनी पक्षनेतृत्वाकडे राजीनामा सादर केला. एप्रिल २००२ मध्ये गोवा येथे झालेल्या भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत हा राजीनामा नामंजूर करण्यात आला. पक्षाकडून अपेक्षित संदेश मिळाल्यावर विरोधकांच्या टीकेला ठोस उत्तर देण्यासाठी नरेंद्र मोदींनी एक विलक्षण राजकीय खेळी केली. गुजरात विधानसभेची मुदत एवीतेवी २०१३ मध्ये संपणारच होती. तोपर्यंत चालढकल करून विरोधक आणि पक्षातील विरोधकांची टीका सहन करण्यापेक्षा मोदींनी या सर्व टीकाकारांना मतदारांकडून सडेतोड उत्तर देण्याचे ठरवले. १९ जुलै २००२ रोजी मोदींनी आपल्या मंत्रीमंडळाची तातडीची बैठक बोलावली आणि त्यात निर्णय करून राज्यपालांकडे आपला राजीनामा सादर केला आणि राज्यात नव्याने निवडणुका घेण्याची शिफारस केली. मूठभर प्रसारमाध्यमे आणि काँग्रेसचे कोणतीही समाजमान्यता नसलेले वाचाळ नेते यांना मतदारांकडून

थेट उत्तर देण्याचे ठरवले. निवडणुका जाहीर झाल्यावर नियमानुसार नरेंद्र मोदींना काळजीवाहू मुख्यमंत्री घोषित करण्यात आले.

ही २००२ ची गुजरात विधानसभेची निवडणूक नरेंद्र मोदींनी स्वत:च्या नेतृत्वाखाली स्वत:च्या खास शैलीत, स्वत:च्या नियोजनाप्रमाणे लढवली. गोध्रा हत्याकांड व नंतर झालेल्या दंगलीबद्दल प्रसारमाध्यमांतून काँग्रेस पक्षाकडून, व अन्य विरोधी पक्षांकडून देशभर सतत टीका होत होती. नरेंद्र मोदींनी या टिकेला कधीच उत्तर दिले नाही. मात्र सर्व टिकेची व्यवस्थित नोंद ठेवली होती. बऱ्याच वेळा टिकाकारांच्या टिकेमध्ये काहीच तथ्य नसायचे. टिका करायची म्हणून टिका केली जात होती. ऐकीव माहितीवर चुकीच्या संदर्भासहित टीका केली जायची. निवडणूक जाहीर झाल्यावर या सर्व टीकेचा संदर्भ देऊन ''संपूर्ण देशभरात गुजरातला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रयत्न काँग्रेस पक्ष आणि त्यांची बांधिलकी मानणारी प्रसारमाध्यमे जाणीवपूर्वक करत आहेत,'' असे जाहीर करून मोदींनी सर्व गुजराती बांधवांच्या गुजरातबद्दलच्या अभिमानाला साद घातली. सर्व टीकाकारांच्या नकारात्मक टीकेबाबतचा जो राग गुजरातच्या नागरिकांच्या मनात होता त्याला मोदींनी आपल्या भाषणातून पुन्हा जागृत केलं आणि या टीकेला उत्तर देण्याचा मार्ग म्हणजे मला मत देणे हाच आहे, हे सर्व मतदारांच्या मनात बिंबवलं.

या निवडणुकीच्या प्रचारासाठी आपण 'गुजरात गौरव यात्रा' काढणार असल्याचं त्यानी जाहीर केलं. या यात्रेची सुरुवात त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिनी 'करमसाड' या सरदार पटेलांच्या गावापासून दि. ३१ ऑक्टोबर, २००२ रोजी केली. आपल्या प्रत्येक भाषणात काँग्रेसच्या खोट्या टिकेचा उल्लेख करून ही निवडणूक म्हणजे गुजरातच्या गौरवाची लढाई असल्याचा दावा ते करत असत. गोध्रा हत्याकांडाची प्रतिक्रिया म्हणून झालेल्या दंगलीबद्दल अश्रू ढाळणाऱ्या काँग्रेसने मूळ गोध्रा हत्याकांडात जिवंत जाळण्यात आलेल्या हिंदूंच्या हत्येबाबत कधीही शोक का व्यक्त केला नाही, असा प्रश्न आपल्या प्रचारसभेत ते आवर्जून विचारत असत.

या निवडणुकीत नरेंद्र मोदींमधल्या चाणाक्ष राजकारणी, उत्कृष्ट व्यूह रचनाकार, उत्कृष्ट वक्ता या गुणांबरोबरच त्यांच्या दूरदृष्टीचाही परिचय झाला. राज्यातल्या भाजपाच्या इतर नेत्यांच्या लक्षात यायच्या आधीच

त्यांनी ही निवडणूक स्वत:भोवती बांधून टाकली. ठराविक प्रसिद्धी माध्यमं, काँग्रेस पक्ष, इतर विरोधी पक्ष आणि तथाकथित पुरोगामी मंडळी व तीस्ता सेटलवाड, महेश भट यांसारख्या भोंदू स्वयंसेवी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी गोध्रा हत्याकांडानंतर झालेल्या दंगलीला नरेंद्र मोदींना व्यक्तिगतरित्या जबाबदार धरलं होतं. या मंडळींची सर्व टीका नरेंद्र मोदींना उद्देशून होत असे. खुनी माणूस, हत्यारा, राक्षस वगैरे सर्व दूषणे फक्त नरेंद्र मोदींना उद्देशूनच वापरली जात असत. या नकारात्मक प्रसिद्धीमुळे आपोआपच गुजरात भाजपा म्हणजे नरेंद्र मोदी अशी प्रतिमा या टीकाकारांनी करून ठेवली होती. आपल्या दूरदृष्टीने याचा फायदा नरेंद्र मोदींनी बरोबर उचलला आणि सर्व निवडणूक नरेंद्र मोदींची निवडणूक करून टाकली. 'गुजरातच्या गौरवासाठी नरेंद्र मोदींना निवडून द्या' असा संदेश गुजरातमधल्या मतदारांपर्यंत पोहोचवण्यात आला.

मोदींची उत्कृष्ट व्यूहरचना, त्यांनी केलेला सर्व १८२ मतदारसंघातला झंझावाती प्रचारदौरा आणि संघ परिवारातल्या विश्व हिंदू परिषद, किसान संघ वगैरे सारख्या संस्थांची मदत यामुळे या निवडणुकीत भाजपाला १८२ लोकांच्या विधानसभेत १२७ जागी विजय मिळाला. या अभूतपूर्व यशाने नरेंद्र मोदींच्या कर्तृत्वावर आणि नेतृत्वावर पक्षश्रेष्ठींचा ठाम विश्वास बसला आणि पक्षाबाहेरच्या आणि पक्षातल्या मोदी विराधकांना एक जबरदस्त चपराक मिळाली. या प्रचंड जनाधारामधून काहीही बोध न घेता काँग्रेसचे काही नेते आणि त्यांनी पुढे केलेले तीस्ता सेटलवाड सारखे NGO चे काही कार्यकर्ते यांनी आपला मोदीविरोध पुढे चालूच ठेवला. परंतु त्यामागे त्यांचे काही स्वार्थी हेतू होते जे पुढे त्यांना स्वत:लाच त्रासदायक ठरले. मात्र २००२ च्या मोदींच्या विजयाने पक्षांतर्गत विरोधक काही काळासाठी नामोहरम झाले.

मित्रांनो, अच्युच्च ध्येयाकडे मार्गक्रमण करत असताना आपल्या अंगात एक प्रकारची संन्यस्तवृत्ती असावी लागते, अन्यथा सामान्य माणूस ध्येयमार्गावर मिळालेल्या एखाद्या यशामुळे हुरळून जातो आणि नकळत स्व-समाधानाने निष्क्रिय (Complacent) बनतो. नरेंद्र मोदींनी मात्र प्रत्येक घटनेबद्दल संपूर्ण आयुष्यभर संन्यस्त अलिप्तता बाळगली. त्यांच्या प्रत्येक नेत्रदीपक यशामध्ये किंवा प्रत्येक घोर निराशाजनक घटनेमध्ये त्यांची ही संन्यस्त

भावना दिसून येते. नरेंद्र मोदींच्या असामान्य यशप्राप्तीचे हे महत्त्वाचे कारण आपण सर्वांनी आवर्जून लक्षात घेतले पाहिजे.

२००२च्या निवडणुकीतील आपल्या अभूतपूर्व यशानंतर मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याचा कार्यक्रम मोदींनी भव्य स्वरूपात हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अहमदाबादच्या वल्लभभाई पटेल स्टेडियममध्ये २२ डिसेंबर २००२ रोजी साजरा केला. हा विजयोत्सव त्यांनी हजारो कार्यकर्त्यांसाठी साजरा केला. स्वत: नरेंद्र मोदींच्या मनात वेगळेच विचार सुरू होते. हा विजयोत्सव त्यांना त्यांच्यावरील वाढलेल्या जबाबदारीची जाणीव करून देत होता. १९९५ पासून गुजरातची जनता भाजपावर विश्वास दाखवत आली होती. २००२ सालच्या निवडणुकीत अत्यंत विखारी अशा विरोधकांच्या प्रचारानंतर देखील गुजराती जनतेने नरेंद्र मोदींच्यावर विश्वास दाखवला होता. याबदल्यात भाजपाने गुजराती जनतेला काय दिले? सन १९९५ ते १९९८ पर्यंत पक्षसंघटनेतल्या सत्ता संघर्षामुळे सतत बदलती सरकारं आणि १९९८ साली पुन्हा बहुमत दिल्यावर पक्षसंघटनेच्या दबावाखालचं अकार्यक्षम आणि भ्रष्टाचारी सरकार. आता गुजराती जनतेला नरेंद्र मोदी काय देणार? पुन्हा पक्ष संघटनेच्या दबावाखाली झुकलेलं अकार्यक्षम सरकार? सरकारचे निर्णय कोण घेणार? पक्ष संघटना, परिवार संघटना, संघ की नरेंद्र मोदी? अनेक प्रश्न त्यांच्यापुढे उभे होते.

मोदी पंधरा वर्षे प्रचारक होते. संघाच्या शिस्तीनुसार संघकार्यात प्रचारक ही व्यक्ती कुठेच अधोरेखित होत नाही, त्या व्यक्तीच्या गुणांचा पुरेपूर उपयोग करून घेतला जातो; पण अतिशय अल्प प्रमाणात त्यांचा उल्लेख केला जातो, या गोष्टींची त्यांना सवय होती. भारतीय जनता पक्षात आल्यावर कोणत्याही राजकीय पक्षात प्रत्येक कार्यकर्त्याला जी अस्तित्वाची लढाई लढावी लागते ती त्यांनी लढली होती. २००२ च्या विजयानंतर नरेंद्र मोदींपुढे दोन पर्याय उपलब्ध होते, पहिला पर्याय भारतातल्या राजकीय प्रथेनुसार संघभावनेला (Team Spirit) महत्त्व देत असल्याचा आभास निर्माण करणारे; परंतु प्रत्यक्षात वेगवेगळ्या दबाव गटांना तोंड देत चालवले जाणारे कमी कार्यक्षमतेचे आणि संथगतीने काम करणारे सरकार चालवणे किंवा पक्ष संघटना-परिवार संघटना आणि त्यातले प्रभावी दबाब गट यांना बाजूला सारून निर्णयस्वातंत्र्य आपल्या हातात ठेवून कार्यक्षम आणि वेगाने

प्रगती करणारे सरकार चालवणे.

माझ्या निरीक्षणानुसार नरेंद्र मोदी हे स्वभावत:च स्पष्टवक्ते, प्रामाणिक आणि नि:स्पृह असल्याने कोणताही वरवरचा देखावा करणे त्यांना कधीच पसंत नव्हते. शिवाय दिलेले काम निष्ठेने करायची सवय असल्याने आपल्या कामात पक्षांतर्गत व परिवार संघटनांतील दबाव गटांनी ढवळाढवळ करणे त्यांना मान्य नव्हते. शिवाय पहिल्यापासूनच त्यांच्या कामाची पद्धत ही ध्येयकेंद्रित व निकाल सापेक्ष (Goal Centric-Result Oriented) अशीच होती. ज्या पद्धतीमध्ये विनाकारण चालणाऱ्या चर्चा, निवेदने, मत प्रदर्शन अशा वेळकाढूपणाला अजिबात जागा नव्हती. नरेंद्र मोदींनी मतदारांना कार्यक्षम कारभार आणि आर्थिक प्रगती करून दाखवीन असे वचन दिले होते. त्यामुळे त्यांनी परंपरागत चालत आलेल्या सामूहिक निर्णयाच्या पद्धतीला टाळले. गुजरातच्या पूर्वीच्या भाजपा सरकारमध्ये अनेक दबावगट वर्षानुवर्षे प्रभावी होते. उदाहरणार्थ, विश्व हिंदू परिषदेचे नेते प्रवीण तोगाडिया यांचा राज्यातील भाजपामध्ये मोठा प्रभाव होता. यापूर्वीच्या सर्व सरकारांमध्ये त्यांच्या गटाचे प्रतिनिधी म्हणून गोरधन झडाफीया यांना मंत्रीपद दिले जायचे. नरेंद्र मोदींनी आपल्या मंत्रीमंडळातून झडाफीया यांना वगळून टाकले. पूर्वीच्या भाजपा सरकारला आपले सर्व महत्त्वाचे निर्णय संघ संबंधित यंत्रणेकडून पूर्वमान्यता घेऊनच करावे लागत असत. नरेंद्र मोदींनी हे बंधन पाळण्यास नकार दिला. मी राज्यात काही चांगले काम करून दाखवायचे असेल तर मला मोकळेपणाने काम करू द्या, असे त्यांनी संबंधितांना ठणकावून सांगितले.

मित्रांनो, या वर्णनावरून तुमच्या लक्षात आले असेल आपल्या सरकारच्या स्थापनेतच नरेंद्र मोदींनी आपल्या कारभाराची दिशा पक्षाला आणि इतर संबंधितांना स्पष्ट करून टाकली. हे नरेंद्र मोदींचे ध्येयकेंद्रित आणि फक्त ध्येयाच्या दिशेने जाणारे सरकार आहे हा संदेश त्यांनी सर्वांना दिला. यानंतर त्यांनी आपल्या विशिष्ट पद्धतीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

नरेंद्र मोदी कोणतेही काम आपल्या विशिष्ट पद्धतीने करतात कारण मोदी प्रत्येक कामातून आपली नवीन ओळख जगाला करून देत असतात. चौकटीबाहेर जाऊन केलेला विचार (Out of Box thinking) काळाची पावले ओळखून, वेळेच्या आधी (Ahead of times) योजलेले प्रकल्प,

सर्वांगीण आणि एकात्मिक नियोजन (Holistic and integrated planning) आणि सूक्ष्म तपशिलात जाऊन केलेले नियोजन आणि तेवढेच लक्ष देऊन केलेली अंमलबजावणी अशी आपली विशिष्ट ओळख नरेंद्र मोदींनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात सन २००२ ते २००७ या वर्षांमध्ये करून दिली. या त्यांच्या कार्यकाळात त्यांनी जाहीर केलेल्या आणि अंमलात आणलेल्या काही वैशिष्ट्यपूर्ण योजनांचा व प्रकल्पांचा गोषवारा पुढे देत आहे.

**कच्छ भागातील भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन :** सन २००१ साली मुख्यमंत्री झाल्यावर लगेचच या कामाला प्राथमिकता देऊन मोदींनी या कामात सुसूत्रता आणली. मोदींनी पुनर्वसनाचे काम कसे असावे याच्या जुन्या संकल्पना बदलून या कामात आमूलाग्र बदल (Paradigm Shift) केले. पूर्वी मदत पुरवणे एवढीच या कामाची व्याप्ती होती. मोदींनी त्यात प्रयत्नपूर्वक तीव्रता कमी करणे (Mitigation) आणि संकटांना सामोरे जाण्याची सिद्धता ठेवणे (Pre-disaster preparedness) या गोष्टींची भर टाकली. मोदींनी नवनिर्माण (Re Construction) यावर भर दिला. या आपल्या दूरदृष्टीने केलेल्या बदलांना चिरकालीन करण्यासाठी त्यांनी नोव्हेंबर २००२ मध्ये सर्वसमावेशक नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाची योजना (Comprehensive Gujarat State Disaster Management Policy) जाहीर केली आणि त्या योजनेला लगेचच मार्च २००३ मध्ये गुजरात राज्य नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायदा (Gujarat State Disaster Management Act (GSDMA) या नावाने कायद्यात रूपांतर करून आपली व्यवस्थापनाची कायमची रचना करून टाकली.

नरेंद्र मोदींच्या काळात झालेल्या कच्छ भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसन कार्याची जगभरात नोंद घेण्यात आली. अनेक पुरस्कार मिळाले. ऑक्टोबर २००३ ला या कार्याबद्दल यूएन सासकावा ॲवॉर्ड हा यूएनचा पुरस्कार त्यांना मिळाला. (UN Saskawa Award by United Nations Int. Strategy for Disaster Reduction). शिवाय त्सुनामीग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी श्रीलंका व इंडोनेशिया या देशांनी त्यांच्या गुजरात मॉडेलचा उपयोगही केला. भूकंपग्रस्तांच्या मदतीचे व पुनर्वसनाचे काम किती भव्य होते हे लक्षात येण्यासाठी केलेल्या कामांची काही निवडक आकडेवारी इथे देत आहे.

* एकूण ९,०८,७१० घरे दुरुस्त करण्यात आली नंतर १,९७,०९१ घरे नव्याने बांधण्यात (Re-Construction) आली.
* एकूण ४२,६७८ वर्गखोल्या (Class rooms) दुरुस्त करण्यात आल्या, तर १२४४२ वर्गखोल्या नव्याने बांधण्यात आल्या.
* एकूण ३३९१ सार्वजनिक इमारती दुरुस्त करणाऱ्या आल्या, तर १२४५ सार्वजनिक इमारती नव्याने बांधण्यात आल्या.
* एकूण ५२२३ किलोमीटर लांबीच्या वीजपुरवठा करणाऱ्या विद्युत तारा व टॉवर्सची दुरुस्ती करण्यात आली.
* एकूण २७५० किलोमीटर लांबीची पाणीपुरवठा पाइपलाइन नव्याने टाकण्यात आली. अनेक बोअरवेल नव्याने उभारण्यात आल्या.
* एकूण ६४० किलोमीटर लांबीचे राज्य महामार्ग व ३०६१ कि.मी. लांबीचे ग्रामीण रस्ते दुरुस्त व नव्याने तयार करण्यात आले.

अशा या १९ जिल्ह्यांतील ७००० गावांत झालेल्या भूकंपपीडित पुनर्वसन कार्याने एक उत्कृष्ट राज्यकर्ता म्हणून मोदींनी स्वत:ला सिद्ध करून दाखवले.

**व्हायब्रंट गुजरात उद्योग मेळा २००३-२००५ (Vibrant Gujarat Summit 2003-2005)** नरेंद्र मोदींचे नाव त्यांच्या ज्या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे संपूर्ण देशभर नव्हे जगभर झाले तो हाच त्यांचा आवडता प्रकल्प आहे. गुजरातमध्ये औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक आणली तर राज्याची आर्थिक सुबत्ता वाढेल. तरुणांना रोजगार मिळेल आणि छोट्या व्यावसायिकांना उद्योगांच्या नवीन संधी मिळतील, हे नरेंद्र मोदींच्या लक्षात आले. गुजरातला लाभलेला १६०० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा, स्वभावाने उद्योगशील असलेला स्थानिक गुजराती समाज आणि जगभरातील अनेक देशांत जाऊन, स्वत:च्या कष्टाने प्रस्थापित झालेला श्रीमंत गुजराती NRI समाज ही गुजरातची वैशिष्ट्ये मोदींनी हेरली होती. या वैशिष्ट्यांच्या आधारावर गुजरातची उगवते उद्यमशील राज्य (Emerging Industrial Destination) अशी जाहिरात करून राज्यात नवीन उद्योग आणायचे असा दूरदृष्टीचा (Visionery) निर्णय मोदींनी लगेचच घेतला.

अर्थात हा निर्णय अंमलात आणणे तेवढे सोपे नव्हते. ठराविक प्रसारमाध्यमे, काँग्रेसचे विघ्नसंतोषी नेते आणि पक्षातील हितशत्रू त्यांच्या

मागावर होतेच. मोदींच्या या नव्या योजनेची कुणकुण लागताच काँग्रेसने कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (CII) या उद्योजकांच्या संघटनेला हाताशी धरून २००२ सालच्या दंगलीचे निमित्त करून मोदींवर टीका करायला सुरुवात केली. २००२ साली झालेल्या CII संस्थेच्या दिल्लीच्या कॉन्फरन्समध्ये उद्योगधंद्यांच्या विकासावरील चर्चेला बगल देऊन गुजरातमध्ये मानवाधिकारांचे उल्लंघन होत आहे अशी भाषणे देण्यात आली. त्या कॉन्फरन्समध्ये सोनिया गांधींचे बीजभाषण ठेवले होते. त्यांनी उद्योगधंद्याचा विकास हा विषय सोडून गुजरात सरकारवर कडवट टीका केली. यानंर CII च्या पदाधिकाऱ्यांनाही भान राहिले नाही. त्यांनी कॉन्फरन्स ज्या विषयासाठी बोलावली होती तो विषय सोडून मोदींवर टीका करण्यात धन्यता मानली. प्रसिद्धी माध्यमांमध्ये देखील या बातम्यांना अनावश्यक वाटावी इतकी प्रसिद्धी देण्यात आली. नरेंद्र मोदींनी ही घटना लक्षात ठेवली होती. २००२ च्या कॉन्फरन्समध्ये भाषणे करणाऱ्यांना नुकत्याच आलेल्या निवडणूक निकालानंतर कदाचित उपरती झाली असेल असा अंदाज करून आणि २००३ मध्ये पहिले व्हायब्रंट गुजरात समीट (Vibrant Gujarat Summit) होणार असल्याने त्याची माहिती देण्यासाठी त्यांनी CII ला एक विशेष मिटिंग बोलावण्याची विनंती केली.

"Meeting with Narendra Modi, the new Chief Minister of Gujarat" या शीर्षकाची ही मिटिंग फेब्रुवारी २००३ मध्ये दिल्ली येथे CII च्या सभागृहात आयोजण्यात आली होती. नरेंद्र मोदी आपल्या नवीन योजनेची माहिती देण्यासाठी आणि सर्व उद्योजकांना गुजरातमध्ये उद्योग उभारावे याचे आवाहन करण्यासाठी उत्सुक होते. परंतु मिटिंगमध्ये त्यांच्याबरोबर व्यासपीठावर बसलेले ज्येष्ठ उद्योगपती जमशेद गोदरेज आणि राहुल बजाज यांच्या डोक्यात मात्र वेगळेच विचार सुरू होते. मोदी आपल्या पाया पडत आले आहेत असा स्वत:चा समज करून घेऊन त्या दोघांनी मोदींना उपदेश करायला सुरुवात केली. राहुल बजाज यांनी तर "आम्ही कोणत्याही विचारसरणीच्या लोकांबरोबर धंदा करायला तयार आहोत पण समाजाचे हित कशात आहे हे आम्हालाही कळते आणि आमच्या विचारांप्रमाणे समाजाचे हित पाहणाऱ्या लोकांबरोबरच आम्ही धंदा करू इच्छितो, तेव्हा तुमच्या मनात काय हेतू आहेत, तुमची काय धोरणे आहेत हे आधी स्पष्ट

करा, मगच आम्ही आम्हाला गुजरातमध्ये धंदा करायचा की नाही हे सांगू,'' असे स्पष्ट आव्हान मोदींना सर्वांसमोर त्यांनी दिले. आजपर्यंत फक्त लाचार राजकीय नेत्यांनाच बघायची सवय असलेल्या बजाज आणि उपस्थित उद्योजकांना आता नरेंद्र मोदी आपल्या कशा मिनतवाऱ्या करतील याची उत्सुकता लागली.

त्यांच्या नंतर बोलायला उठलेल्या मोदींनी आपले व्हायब्रंट गुजरातच्या योजनेचे कागद बाजूला ठेवले. आपल्या खासशैलीत त्यांनी या दोघांचा समाचार घेतला. ''दिल्लीच्या वातानुकूलित सभागृहात बसून सर्वधर्मसमभावाचा उपदेश करणाऱ्या तुम्हा सर्व माननीयांना माझं हात जोडून निमंत्रण आहे. गुजरातमध्ये या आणि मला ज्यांनी दोन तृतीयांश बहुमतांनी निवडून दिलेय त्या मतदारांना भेटून आपली मतं बनवा.'' बजाज आणि गोदरेज यांच्याकडे वळून त्यांनी विचारलं, ''काही प्रसारमाध्यमं आणि काही राजकीय पक्ष यांचा गुजरातला बदनाम करण्यात राजकीय स्वार्थ आहे. तुम्ही गुजरातला का बदनाम करताय? तुमचा स्वार्थ काय आहे?'' आपली नाराजी स्पष्ट करण्यासाठी भाषण संपल्यावर कोणालाही न भेटता मोदी सभागृहातून तडक बाहेर पडले. आपण लाचार नाही, स्वाभिमानी आहोत, हे त्यांनी सर्वांना दाखवून दिले.

गोदरेज आणि बजाज यांच्यासारख्या व्यक्तींपुढे दबणारं मोदींचं व्यक्तिमत्त्व कधीच नव्हतं. उद्योजकांशी भेटण्याचे आणि उद्योग विकासाला चालना देण्याचे अन्य अनेक मार्ग आपल्या उत्कृष्ट कल्पनाशक्तीने त्यांनी आधीच शोधून ठेवले होते आणि असे अनेक अकारण केलेले अपमान पचवून आपल्या ध्येयाकडे सतत मार्गक्रमण करत राहायची मोदींना सवय होती.

'व्हायब्रंट गुजरात समीट' ही पहिली औद्योगिक परिषद मोदींनी २८ ते ३० सप्टेंबर २००३ च्या दरम्यान आयोजित केली होती. CII च्या नेत्यांनी केलेल्यी चुकीच्या टिकेचे निवेदन मोदींनी गुजरातच्या सर्व उद्योजकांना केले. हे सर्व उद्योजक गुजरात चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या छताखाली एकत्र होतेच, शिवाय व्हायब्रंट गुजरात समीट यशस्वी करण्यासाठी काही मोदी समर्थकांनी एकत्र येऊन रिसर्जंट ग्रुप ऑफ गुजरात (RGG) या नावाने एक विशेष व्यासपीठदेखील तयार केले. करसनभाई पटेल (निरमा ग्रुप), गौतम अदानी (अदानी ग्रुप),

इंद्रवदन मोदी (कॅलीडा फार्माग्रुप), चिंतन पटेल (असीमा ग्रुप) हे त्यामध्ये आघाडीवर होते. या सर्वांनी व्हायब्रंट गुजरात समीट यशस्वी करण्यासाठी कंबर कसली. शिवाय CII ला पर्याय म्हणून काम करणारी भारतीय उद्योजकांची फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज (FICCI) ही संघटनादेखील मोठ्या उत्साहाने व्हायब्रंट गुजरात समीटमध्ये सहभागी झाली.

पहिल्या व्हायब्रंट गुजरात समीट २००३ चे संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन नरेंद्र मोदींनी आपल्या खास नियोजन शैलीने केले. बारीकसारीक तपशिलात जाऊन व तपशीलवार नियोजन आणि तेवढ्याच तपशिलात जाऊन उत्कृष्ट आयोजन केले. नरेंद्र मोदींनी सप्टेंबर २००३ मध्ये झालेल्या या परिषदेची व्यवस्था पंचतारांकित सुविधांसहित केली होती. नरेंद्र मोदी स्वत: संपूर्ण वेळ परिषदेत उपस्थित होते. परिषदेच्या प्रारंभीच्या सत्रांमध्ये गुजरातच्या नैसर्गिक वैशिष्ट्यांचा मुद्दा त्यांनी अतिशय प्रभावीपणे मांडला. १६०० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा, अनेक बंदरे त्यामुळे जगभर निर्यातीसाठी स्वस्त वाहतूक पर्यायाची उपलब्धता, वीज व पाण्याची उपलब्धता, उद्यमी मानसिकतेच्या गुजराती जनतेमुळे मिळणारा पूरक उद्योगांचा पाठिंबा या सर्व मुद्द्यांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. शिवाय येत्या पाच वर्षांत मी तुम्हाला पाहिजे तेवढा वीजपुरवठा, अंतर्गत रस्त्यांचे जाळे आणि बंदरांना रस्ते आणि रेल्वेमार्गांनी जोडणी करून देईन अशी खात्रीपण दिली.

मोदींच्या उत्कृष्ट संयोजनाने तसेच प्रभावी सादरीकरणाने आणि मोदीसमर्थकांच्या अथक प्रयत्नाने 'व्हायब्रंट गुजरात समीट २००३' प्रचंड यशस्वी झाली. ६६००० कोटी रुपयांचा ८० प्रस्तावांवर सह्या करण्यात आल्या. विशेष म्हणजे त्यात मूलभूत उद्योग (Infrastructure Industries) यामध्ये समावेश होणाऱ्या ९ ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे आणि ८ SEZ चे (विशेष आर्थिक क्षेत्र) प्रस्ताव होते. या आगळ्या उपक्रमाला देशभरात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड प्रसिद्धी मिळाली. विकासपुरूष म्हणून आपली ओळख करून देण्यातले पहिले दमदार पाऊल मोदींनी टाकले.

दरम्यानच्या काळात मोदी आपल्याकडे भीक मागायला आले नव्हते तर संधी घेऊन आले होते हे CII च्या पदाधिकाऱ्यांच्या लक्षात आले.

शिवाय गुजरातच्या १०० उद्योजकांनी लेखी पत्र आणि सोबत राजीनामे जोडून CII च्या परिषदेत नरेंद्र मोदींचा अपमान केल्याबद्दल आपला निषेध CII कडे व्यक्त केला होता. मोदींनी FICCI व रिसर्जंट ग्रुपच्या माध्यमातून व्हायब्रंट गुजरात समीटचा कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पुढे न्यायला सुरुवात केल्यावर आपली चूक CII पदाधिकाऱ्यांच्या लक्षात आली. त्यांनी ठराव करून एका लेखी पत्राद्वारे मोदींची माफी मागायची ठरवली. ''We, in the CII are very sorry for the hurt and pain you have felt...'' असे पहिले वाक्य असलेले लेखी पत्र घेऊन CII चे डायरेक्टर जनरल तरुण दास अहमदाबादला गेले आणि त्यांनी मोदींची भेट घेऊन ते पत्र सादर केले. मोदींची विरोधकांना नमवण्याची ताकद सर्वांपुढे सिद्ध झाली.

व्हायब्रंट गुजरात समीट हा नरेंद्र मोदींच्या अचाट कल्पनाशक्तीचा आविष्कार त्यांच्या शिरपेचातील मानाचा तुरा ठरला. दर दोन वर्षांनी होणाऱ्या या परिषदेच्या संयोजनात त्यांनी आपल्या कल्पकतेने सतत नवनवीन सुधारणा केल्या. २००५ सालच्या व्हायब्रंट गुजरात समीटचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समीटच्या आधी आपल्या मंत्र्यांची पाच पथके मोदींनी युरोप व अमेरिकेला पाठवली होती. परिणाम स्वरूप ब्रिटिश गॅस या मोठ्या तेलउत्पादक कंपनीचे अध्यक्ष निगेल शॉ समीटच्या प्रायोजकांमध्ये सामील झाले. मुकेश अंबानी, शशी रुईया, गौतम अडानी हे व अन्य भारतीय उद्योजक समीट आयोजनात सहभागी होतेच. या समीटमध्ये इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, अपारंपरिक ऊर्जा, आर्थिक सेवा, टुरिझम, जेम्स ॲण्ड ज्वेलरी, बायोटेक, टेक्स्टाईल ॲण्ड ॲपरल अशा नव्याने विकसित होणाऱ्या वैविध्यपूर्ण उद्योगांचा समावेश नेहमीच्या उद्योगांव्यतिरिक्त करण्यात आला होता. केंद्रातील काँग्रेस सरकारचे व्यापार व उद्योगमंत्री कमलनाथ हे समारोपाला उपस्थित होते.

या समीटमध्ये १०६१६० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या एकूण २२७ प्रस्तावांवर सह्या करण्यात आल्या. त्यातील ३५ प्रस्ताव बंदरविकासासाठी, ३२ प्रस्ताव इंजिनिअरिंग उद्योगात, तर २४ प्रस्ताव ऑइल आणि गॅस क्षेत्रात होते.

**किमान हस्तक्षेप : जास्तीत जास्त राज्य कारभार (Minimum Government-Maximum Governance)** हा नरेंद्र मोदींचा प्रसिद्ध मूलमंत्र आहे. सरकारने व्यवसायात पडण्याचे काहीच कारण नाही. सरकारचे काम हे व्यवसायपूरक वातावरण तयार करण्याचे आहे. ''I believe Government has no business to do business'' हे नरेंद्र मोदींचे प्रसिद्ध वाक्य या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण धोरणाची दिशा दाखवते. आपल्या या धोरणाला अनुसरून २००२ ते २००७ या कालखंडात नरेंद्र मोदींनी अनेक धोरणात्मक बदल गुजरातमध्ये घडवून आणले. पूर्वापारपासून चालत आलेल्या अनेक धोरणांमध्ये व कायद्यांमध्ये त्यांनी आमूलाग्र बदल केले. गुजरात सरकारचे खाण धोरण (Mining Policy), औद्योगिक धोरण (Industrial Policy), पर्यटन धोरण (Tourism Policy), विशेष आर्थिक क्षेत्रे व औद्योगिक वसाहतीबाबतचे धोरण (SEZ & Industrial park Policy) अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. या सर्व धोरणांना साह्यभूत ठरणारे कायदेदेखील त्यांनी मंजूर करून घेतले. याबरोबरीनेच जिल्हा परिषदांकडे असलेली सत्ता कमी करून मोदींनी ती तालुका पंचायतींकडे सुपूर्त केली. त्यामुळे ग्रामीण भागातील विकासकामांचा वेग वाढला. सत्तेचं विकेंद्रीकरण झाल्यामुळे निर्णय लवकर होऊ लागले. 'आपणो तालुको व्हायब्रंट तालुको' असे त्यांनी या कल्पनेचे नामकरण केले.

**मूलभूत उद्योग व सेवा याच्या विकासाचे प्रयत्न :** पाणी, वीज, रस्ते, रेल्वे, बंदरे अशा सर्व मूलभूत गरजांशी संबंधित उद्योग व सेवा क्षेत्रावर नरेंद्र मोदींनी विशेष लक्ष केंद्रित केले. २००२ ते २००७ या काळात नरेंद्र मोदींनी जागतिक दर्जाची १० बंदरे (Ports) विकसित करण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी गुजरात मारीटाईम बोर्ड ही सरकारी कंपनी सर्व बंदरे चालवत असे. मोदींनी BOOT (Build, Own, Operate and Transfer) ही गुंतवणुकीची संकल्पना वापरून अद्ययावत, सर्व ऋतुत चालणारी, सरळ बंदरात जहाज लागू शकणारी, खोल समुद्रातील (State of the Art, All Weather, Direct - berthing, Deep-sea Ports) एकदम १० बंदरे विकसित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. त्यातील पिपावाव, धोलेरा, हाजीरा आणि मारोळी ही खासगी उद्योजकांकडून तर बेडी, पोसीला, मुंद्रा आणि दहेज ही खासगी व सरकारी संयुक्त मालकीची म्हणून विकसित

करण्याचे ठरले.

नरेंद्र मोदींचा कोणताही निर्णय हा दूरदृष्टीचा आणि काळाची पावले ओळखून वेळेच्या आधी (Ahead of times) असतो. याचा परिचय गुजरातच्या विकासाच्या योजनांमध्ये वारंवार येतो. गुजरातच्या १६०० कि.मी. लांबीच्या समुद्रकिनाऱ्याचा पुरेपूर उपयोग त्यांनी गुजरातच्या आर्थिक विकासासाठी केला. LNG (लिक्वीफाईड नॅचरल गॅस) चा उपयोग २००३ च्या सुमारास भारतात फार मोठ्या प्रमाणावर सुरू नव्हता. नरेंद्र मोदींनी या इंधनाचा वेगवेगळ्या कारणांसाठी होणारा उपयोग ओळखून रॉयल डच/शेल ग्रुप ऑफ कंपनीज (Royal Dutch/Shell Group of Companies) या आंतरराष्ट्रीय प्रसिद्ध कंपनीबरोबर करार करून सुरत जवळील हजीरा येथे २००३ साली पहिले टर्मिनल उभारले आणि २००५ साली दुसऱ्या टर्मिनलचा शुभारंभ देखील केला. या त्यांच्या प्रयत्नांचा दीर्घकालीन परिणाम वेगवेगळ्या क्षेत्रांत दिसून आला. भारत शासनाच्या नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशन या विद्युत निर्मिती करणाऱ्या कंपनीने ऊर्जानिर्मितीसाठी LNG चा उपयोग सुरू केला. गॅस ऑथारिटी ऑफ इंडिया लिमिटेड या दुसऱ्या सरकारी कंपनीने वेगवेगळ्या उद्योगांना ज्यात खत कारखान्यांचाही समावेश आहे LNG पुरवण्यासाठी देशभरात पाइप लाइनचे जाळे तयार करायला सुरुवात केली. असे अनेक फायदे मोदींनी दूरदृष्टीने केलेल्या बंदरांच्या विकासामुळे आज पाहायला मिळतात.

मूलभूत उद्योग व सेवांच्या विकासासाठी २००२ ते २००७ या काळामध्ये पुढील १०-१५ वर्षांचा विचार करून त्यांनी आमूलाग्र सुधारणा करण्याचे एकात्मिक नियोजन (Integrated Planning) केले आणि त्याप्रमाणे सर्व क्षेत्रांत कामाला एकदमच सुरुवात केली. काही मोजकी उदाहरणे त्यांच्या एकात्मिक व विस्तृत नियोजनाची कल्पना येण्यासाठी देत आहे.

**वीजपुरवठा क्षेत्रात** त्यांनी ‘ज्योतीग्राम’ योजना ही अखंडीत वीजपुरवठा देणारी योजना जाहीर केली, त्याप्रमाणे वीजनिर्मितीसाठी LNG चा उपयोग करून वीजनिर्मितीची सोयही केली. वीजचोरीवर विशेष लक्ष दिले. राजकोटला वीजचोरी रोखण्यासाठी वेगळे पोलीस स्टेशन जून २००३ मध्ये स्थापन केले. घरगुती वीजपुरवठा आणि शेतीचा वीजपुरवठा हा वेगवेगळा करून दोन्हींची स्वतंत्र व्यवस्था केली. सौर ऊर्जा (Solar Energy), वायू ऊर्जा

(Wind Energy), जमिनीच्या अंतर्भागातील उष्णतेचा वापर करून ऊर्जा (Geo Thermal Power) अशा नावीन्यपूर्ण मार्गांचा वापर करून ऊर्जा निर्मितीमध्ये गुजरातला स्वयंपूर्ण केले. गुजरातमध्ये २४ तास वीजपुरवठा उपलब्ध केला.

**गुजरातमधील रस्त्यांचे** दीर्घकालीन नियोजन केले. २००३ मध्येच त्यांनी अहमदाबाद वडोदरा एक्सप्रेस वे पूर्ण केला. २००३ मध्येच मुंद्रा बंदराला मुख्य रेल्वेशी जोडणारी मुंद्रा–आदिपूर रेल्वेलिंक पूर्ण केली. अहमदाबादच्या सभोवती ४ लेनच्या रिंगरोडची योजना कार्यान्वित केली व मुदतीमध्ये ७६ किलोमीटरचा रिंग रोड तयार करून दाखवला. काही राष्ट्रीय महामार्ग फक्त दुपदरी होते. मोदींनी नॅशनल हायवे ऑथारिटीशी सहकार्य करून या महामार्गांवर येणाऱ्या शहरांत आणि मोठ्या गावांत फ्लाय ओव्हर आणि ओव्हर ब्रिजचे काम गुजरात सरकारकडून पूर्ण करून दिले. त्यामुळे अहमदाबाद-मेहसाणा वडोदरा-हलोल, अहमदाबाद-राजकोट अशा अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गांतील टप्प्यांचे चौपदरीकरण झपाट्याने पूर्ण झाले.

**पाणीपुरवठा क्षेत्रातील** नरेंद्र मोदींचे काम अतिशय अद्भूत स्वरूपाचे आहे. नर्मदा नदीवर बांधलेल्या मूळ २६० फुटांच्या सरदार सरोवर धरणाची उंची ५३५ फुटांपर्यंत वाढवण्याचा प्रकल्प मोदींच्या कल्पनाशक्तीचा आणि कार्यक्षमतेचा प्रचंड मोठा पुरावाच आहे. गुजरात हे पाण्याने वंचित राज्य होतं. कच्छ भागातील सर्वच गावांत शेती आणि पिण्याच्या पाण्याची प्रचंड टंचाई होती. यावरचा एकमेव उपाय होता, नर्मदा नदीचे जास्तीत जास्त पाणी अडवून या तृषार्त भागाला पाणी पुरवणे. नवगामच्या धरणाची उंची वाढवण्याचा प्रस्ताव मोदींनी सादर करताच विरोधी पक्षांनी त्याला विरोध करायला सुरुवात केली. काही गावे पाण्याखाली जातात आणि तेथील आदिवासी विस्थापित होतात यापासून ते पर्यावरणाची अक्षम्य हानी होते इथपर्यंत सर्व कारणे पुढे करून या प्रकल्पाला प्रचंड विरोध करण्यात आला. खरे कारण होते मोदींना या प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर मिळणारे अमाप श्रेय रोखण्याचे.

मेधा पाटकर, अरुंधती रॉय यांसारख्या अनेकांनी अन्य मोठ्या व्यक्ती व NGO ना बरोबर घेऊन नर्मदा बचाव आंदोलन सुरू केले व नर्मदा

जिल्ह्यात, देशभरातील शहरांत, प्रसार माध्यमांतून, हायकोर्ट व सुप्रीम कोर्टापर्यंत दावे दाखल करून हा प्रकल्प पूर्ण होऊ न देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. नरेंद्र मोदींनी तेवढ्याच चिवटपणे या प्रकल्पाचा पाठपुरावा केला. २००३ मध्ये धरणाची उंची ५ मीटरने वाढवायची परवानगी मिळताच लगेच काम सुरू केले. कच्छमधील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी नर्मदेचे पाणी पाइपलाइनने कच्छपर्यंत आणले. लगेचच २००४ मध्ये सरदार सरोवर धरणाची उंची ११० मीटरने वाढवण्याचा निर्णय घेतला. त्यातील अडचणींना तोंड देऊन तो निर्णय पुढे अंमलातही आणला.

पाणीपुरवठा क्षेत्रात मोदी फक्त सरदार सरोवर धरणाची उंची वाढवण्याचा प्रयत्न करून थांबले नाहीत. एकूणच गुजरात राज्यातील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी त्यांनी सर्वच पातळ्यांवर प्रयत्न केले. NGO च्या मदतीने संपूर्ण गुजरातभर चेकडॅम आणि शेततळी यांचे जाळे उभे केले. सन २००४ मध्ये राज्यात १०० दिवसांत १ लाख शेततळी खोदण्याचे अभियान चालवले. यामुळे भूगर्भातील जलसाठा वाढला. सरदार सरोवर पार्टीसीपेटरी वॉटर कॉन्झर्वेशन स्कीम व नर्मदा कॅनालमधील पाणी देण्यासाठी प्रत्येक गावात काढलेल्या जलपुरवठा सोसायट्या यांच्या सहाय्याने प्रत्येक पाण्याचा थेंब योग्य वापरात आणला जाईल याची काळजी घेतली. मोदींनी सरदार सरोवर धरणापासून काढलेल्या कालव्यांची एकूण लांबी ७४६२६ किलोमीटर आहे. १५ जिल्ह्यांतील ७३ तालुक्यांतील १९ लाख हेक्टर जमीन या पाण्याने भिजते. पूर्वीच्या रेताड वाळवंटी भागाला मोदींनी हिरवेगार करून टाकले. या पराक्रमाने गुजरात राज्य बीटी कॉटन म्हणजे कपाशीच्या उत्पादनात देशात प्रथम क्रमांकावर पोहोचले. २००२ ते २००७ या काळात गुजरातच्या शेती उत्पन्नाचा दर ९.६ टक्क्यांनी वाढला. पूर्वीच्या कच्छ आणि सौराष्ट्र भागाचा ओळखू न येण्याइतपत कायापालट नरेंद्र मोदींच्या प्रयत्नाने झाला. वाळवंटाचं नंदनवन करण्यात मोदी यशस्वी झाले.

**समाज मानस बदलण्यासाठीचे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम :** भौतिक प्रगतीबरोबरच सर्वसामान्य नागरिकांचे जीवन बदलण्यासाठी त्याची मानसिकता बदलण्याची देखील आवश्यकता असते. आर्थिक समृद्धी

आल्यावर समाजाची ती समृद्धी चांगल्या प्रकारे स्वीकारायची मानसिकता असणे देखील महत्त्वाचे ठरते. अन्यथा त्या समृद्धीमुळे मोठे सामाजिक प्रश्नदेखील तयार होतात. कृषिसंपन्न पंजाबचे उदाहरण या दृष्टीने बरेच बोलके आहे. गुजरातच्या अनेक वर्षे आधीपासून पंजाब हा कृषिसंपन्न आणि आर्थिकदृष्ट्या सधन प्रांत आहे. मात्र आज पंजाबमधील युवक व्यसनाधीनतेने ग्रासलेला असून ड्रग्ज किंवा नशिल्या पदार्थांचा वाढता वापर ही पंजाबची समस्या बनलेली आहे. मोदींनी समाजमानसाला बदलण्याचे महत्त्व ओळखून अनेक दूरगामी उपक्रम राबवले. त्यांतील काहींचा गोषवारा थोडक्यात देत आहे.

**कन्या केळवणी योजना** (बेटी बचाओ–बेटी पढाओ) : समाजमानसातील बदल घडवून आणण्यासाठी नरेंद्र मोदींच्या कल्पकतेतून साकारलेली एक उत्कृष्ट योजना असा या योजनेचा उल्लेख करता येईल. नरेंद्र मोदींनी २००१ साली गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारला तेव्हा गुजरातमध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण ४८% होते. ग्रामीण भागात हे फक्त ३८% होते. त्या काळात गुजरातमध्ये स्त्रियांचा जन्मदर देखील अत्यंत कमी होता. गुजराती समाजाची मानसिकता अशी होती की मुलींना शिकवून काही उपयोग नाही. स्त्रिया शिकल्या तर भावी पिढी अधिक संस्कारी होईल हे मोदींनी जाणले. त्यासाठी त्यांनी 'कन्या केळवणी' नावाची महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली. गुजरातमध्ये १००% महिला साक्षरतेचं ध्येय निश्चित केलं. भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनामुळे राज्याच्या बजेटवर ताण असतानाही ३ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद देखील लगेच केली.

परंतु शासकीय योजना जाहीर केल्याने सामाजिक बदल घडून येत नाही हे मोदींना माहिती होतेच. त्यांनी 'कन्या केळवणी' योजनेचे जन आंदोलनात रूपांतर केले. प्रत्येक शैक्षणिक वर्षाचे पहिले सात दिवस 'कन्या केळवणी' योजनेचा प्रचार स्वत: मुख्यमंत्री, सर्व मंत्री, सर्व आमदार आणि राज्यातील सर्व Class I अधिकारी करतील असे जाहीर केले. ग्रामीण भागासाठी पहिले ३ दिवस व शहरी भागासाठी नंतरचे ४ दिवस ठरवले. स्वत: मोदी तीन दिवस तीन खेड्यांत जाऊन राहात असत. त्यामुळे गुजरातमधल्या प्रत्येक खेड्यात शासन या योजनेसाठी पोहोचले. प्रत्येक घरात ही योजना समजावून सांगून मुलींना शाळेत

प्रवेश देऊनच हे प्रचारक परत येत.

सामाजिक अभियानाची दुसरी बाजू म्हणून मोदींनी या योजनेसाठी सामाजिक सहभागातून निधी मिळवण्यास सुरुवात केली. याची सुरुवात त्यांनी फारच वेगळ्या प्रकारे केली. मुख्यमंत्री म्हणून मोदी ज्या कार्यक्रमांना जात असत त्या ठिकाणी त्यांचा सत्कार करून त्यांना भेटवस्तू दिल्या जात असत. मोदींनी सर्व कार्यक्रमांत आधी निरोप द्यायला सुरुवात केली, माझा सत्कार कशाला करता, त्याऐवजी तेच पैसे या योजनेला देणगी म्हणून द्या. त्यामुळे या अभियानाला भरघोस देणग्या मिळू लागल्या, शिवाय या अभियानाचा प्रचार देखील होऊ लागला. यापुढे जाऊन मोदींनी आपल्याला मिळालेल्या किंमती भेटवस्तूंचा लिलाव जाहीर केला आणि त्यातून मिळालेली सर्व रक्कम 'कन्या केळवणी' अभियानाला दिली जाईल असे जाहीर केले. त्यामधूनही या अभियानाला भरपूर मदत मिळवून दिली. मोदींनी ११ कोटी रुपये अशा लिलावांमधूनच 'कन्या केळवणी' अभियानासाठी मिळवून दिले आहेत.

या निधीचा उपयोग मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठीच केला जातो. विद्यालक्ष्मी योजनेत पहिलीत प्रवेश घेतलेल्या मुलीच्या नावाने १००० रू.चा बाँड घेतला जातो. मुलीने सातवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले तर व्याजासहित बाँडची सर्व रक्कम मुलीला मिळते. पुन्हा आठवीत प्रवेश केल्यावर १००० रू.चा बाँड त्या मुलीच्या नावाने खरेदी केला जातो. जर मुलीने बारावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले तर तिला व्याजासहित बाँडची सर्व रक्कम दिली जाते. या योजनेला पूरक असलेल्या किशोरी शक्ती योजना, वर्किंग वूमन होस्टेल, सखी मंडळे अशा अनेक योजना मोदींनी सुरू केल्या.

शिक्षणावरच्या अर्थसंकल्पातील तरतुदीत मुलींच्या शाळांमध्ये चांगली स्वच्छतागृहे बांधण्यासाठी मोदी सतत विशेष तरतूद करत असत. त्यामुळे या काळात ५०३५० सॅनिटेशन ब्लॉक्स (स्वच्छतागृहे) बांधण्यात आली. या सर्वव्यापी प्रयत्नांमुळे मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण ८२% पर्यंत वाढले. शिवाय २००० साली गुजरातमध्ये मुलींचे शाळेतून गळतीचे (शाळा सोडण्याचे) प्रमाण ४०% होते ते कमी होऊन २०१० साली २.२९% इतके कमी झाले. सर्वच मुली प्राथमिक शिक्षण झाल्यावर माध्यमिक व उच्च शिक्षणापर्यंत जाऊ लागल्या. युनेस्कोसारख्या संस्थेनेही मोदींच्या

या अभिनव प्रयोगाची दखल घेतली आहे.

नरेंद्र मोदींनी शिक्षण विकासाच्या विषयात प्रचंड काम केले आहे. सन २००१ मध्ये गुजरातमधील विश्वविद्यालयांची संख्या १५ होती, ती मोदींनी ५२ पर्यंत वाढवली. शिवाय त्यामध्ये गुजरात लॉ युनिव्हर्सिटी, इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ पब्लिक हेल्थ, पं.दीनदयाळ पेट्रोलियम युनिव्हर्सिटी, विरायतन इन्स्टिटय़ूट ऑफ फार्मसी, लकुलीश योग विद्यापीठ अशा विविध विद्याशाखा देखील उपलब्ध करून दिल्या.

**गरीब कल्याण मेळा :** नरेंद्र मोदींनी सुरू केलेला हा एक अभिनव उपक्रम आहे. शहरी भागात झोपडपट्टीमध्ये राहणारे नागरिक आणि ग्रामीण भागातील भूमीहीन, दारिद्र्यरेषेखाली असणारे नागरिक यांच्यासाठी हा कार्यक्रम राबवण्यात येतो. या लोकांसाठी राबवण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या आणि केंद्रशासनाच्या योजनांचा पूर्वीचा अनुभव फारसा चांगला नव्हता. त्या योजनांचा पूर्ण फायदा गरजूंपर्यंत पोहोचत नसे. मध्यस्थ लोक त्यातील बराचसा हिस्सा काढून घेऊन फार कमी रक्कम वा फायदा खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवत असत. या मध्यस्थांमध्ये शासकीय अधिकारी, पक्ष कार्यकर्ते, झोपडपट्टी दादा व गावचे सरपंच वगैरे सर्वांचा समावेश होतो.

या मध्यस्थांना टाळून खऱ्या गरजू-गरीबांपर्यंत सर्व मदत पोहोचावी या हेतूने मोदींनी हे मेळावे सुरू केले. या मेळाव्यांमध्ये भूमीहीनांना घरासाठी जमीन वाटप, घराचे बांधकाम करण्यास अर्थसहाय्य, उपजीविका देऊ शकतील अशा साहित्यासांठी अर्थसहाय्य, महिला बचत गटांना उद्योग-व्यवसाय सुरू करायला अर्थसहाय्य असे अर्थसहाय्य प्रत्यक्ष लाभार्थींना त्यांच्या हातात दिले जाते. गरीब कल्याण मेळ्यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), अन्य मागासवर्गीय (OBC), वनवासी व भटक्या विमुक्त जाती (VJNT) या संवर्गातील गरीबांना प्रामुख्याने मदत दिली जाते. अन्य दारिद्र्यरेषेखालील गरीबांचाही समावेश या मेळ्यात केला जातो. या मेळाव्यात लाभार्थी स्वत: फक्त उपस्थित राहू शकतो. कोणत्याही अन्य मध्यस्थाला या मेळाव्यात उपस्थित राहायला मनाई आहे. शासकीय अधिकारी, मंत्री प्रत्येक अर्जदाराची स्वत: माहिती घेऊन जागेवरच मदतीचे वाटप करतात. या मेळाव्याची आधीची पूर्वतयारी स्थानिक प्रशासनाचे अधिकारी करतात. आजपर्यंत एकूण ३४२ मेळ्यांमध्ये ३७ लाख ७०

हजारांहून अधिक लाभार्थींना ४८५८ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

**स्वागत ऑनलाईन :** भविष्यातील शक्यता लक्षात घेऊन काळाच्या आधी मोदींनी उचललेले पाऊल असे मोदींच्या पारदर्शक इ-गव्हर्नन्स प्रणाली सुरू करण्याच्या प्रयत्नांचे वर्णन करता येईल. सन २००२ मध्ये जमिनीच्या रेकॉर्डचे संगणकीकरण (Computerisation) करण्याचा पहिला प्रयत्न मोदींनी छोटा उदेपूर येथे केला होता. त्यानंतर दोनच वर्षांत म्हणजे २००४ मध्ये मोदींनी संपूर्ण राज्यभर ७/१२ उतारे कॉम्प्युटरवर उपलब्ध करून दिले. म्हणजे संपूर्ण राज्याची जमिनीची माहिती (Land Record) त्यांनी अवघ्या दोन वर्षांत संगणकीकृत केली. महाराष्ट्रात जमिनीची माहिती कॉम्प्युटरवर टाकून कॉम्प्युटरवर ७/१२ मिळायला २०१२ साल उजाडलं होतं आणि अजूनही पूर्ण निर्दोष असं लॅण्ड रेकॉर्ड महाराष्ट्रात उपलब्ध होत नाही, यावरून मोदींच्या झपाट्याचा अंदाज करता येईल. त्याच झपाट्यानं मोदींनी राज्यशासनाच्या सर्व व्यवहारांचं संगणकीकरण करून नवनवीन E-governance Initiatives, ई गव्हर्नन्सचे जास्त समाजाभिमुख आविष्कार आणायला सुरुवात केली. स्वागत ऑनलाईन हा त्यातलाच एक उपक्रम.

दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी दु. ३ ते ७.३० या वेळात मोदींनी इंटरनेटच्या माध्यमातून गुजरातच्या कानाकोपऱ्यांतून केल्या जाणाऱ्या तक्रारींचे निवारण करायला सुरुवात केली. दूरवरच्या कोणत्याही खेड्यातला नागरिक आदल्या दिवसापर्यंत ई-मेलवर आपली तक्रार नोंदवू शकतो. ती तक्रार ज्या विभागाबाबत असेल त्या विभागाला त्या तक्रारीवर आपले म्हणणे तयार करायला सांगितले जाते. गुरुवारी दुपारी बरोबर ३.०० वाजता मोदी व्हिडिओ कॉन्फरन्सिगद्वारे ओळीने प्रत्येक तक्रारदाराची तक्रार ऐकतात. तक्रारदार आपल्या गावाजवळच्या स्वागत ऑनलाईन केंद्रावर असतो. तेथूनच तो आपली तक्रार मांडतो. त्यावर मोदी संबंधित खात्याचे म्हणणे ऐकून घेतात आणि लगेचच तक्रारदाराच्या तक्रारीवर निर्णय देतात. तक्रार निवारणाचे जे आश्वासन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याने मोदींसमोर दिलेले असते त्याला पुढील आठवड्यात लेखी स्वरूपात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action Taken Report) मोदींसमोर सादर करावा लागतो.

दूरवरच्या नागरिकांना अतिशय कमी श्रमात व खर्चात तक्रार निवारण

करून देणाऱ्या या वेगळ्या उपक्रमाचे भरपूर कौतुक झाले. मोदींच्या एकूणच (E-Governance) ई-गव्हर्नन्सच्या उपक्रमांबाबत त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिकेदेखील मिळाली आहेत. या स्वागत (StateWide Attention on Grievances with Application of Technology) स्वागत ऑनलाईन उपक्रमाला UNPSA (United Nations Public Service Award) हे पारितोषिक मिळाले आहे. तसेच युनायटेड नेशन्सच्या इकॉनॉमिक आणि सोशल अफेअर्सच्या विभागाकडून 'शासकीय सेवेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आमि जबाबदारीमधील सुधार' (Improving Transparency, Accountability and Responsiveness in Public Service) आपल्या प्रत्येक वैशिष्ट्यपूर्ण योजनेत नरेंद्र मोदी त्या योजनेला मिळणाऱ्या प्रतिसादानुसार सतत सुधारणा करत असतात. स्वागत ऑनलाईन ही योजना नरेंद्र मोदींनी २००४ मध्ये सुरू करून सतत सात वर्षे यशस्वीपणे चालवली. प्रथम जिल्हास्तरावर चालणारी ही योजना त्यांनी पुढे तालुका स्तरावर नेली. दोन वर्षे तालुका स्तरावर ही योजना यशस्वी केल्यावर त्यांनी 'ग्राम स्वागत ऑनलाईन' या नावाने हीच योजना विशिष्ट गावपातळीवर देखील नेली. २०११ साली मुख्यमंत्री कार्यालय गुजरात सरकार यांना या उत्कृष्ट योजनेबद्दल भारत सरकारने (काँग्रेसच्या शासनकाळात) राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पारितोषिक (National E Governance Award) देऊन गौरवीत केलं.

याप्रमाणे सन २००२ ते २००७ या आपल्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात मोदींनी सुशासन (Good Governance) म्हणजे काय याचं एक पथदर्शी उदाहरण सर्वांसमोर घालून दिलं. गुजरातच्या जनतेनं आपल्या आयुष्यात सकारात्मक बदल घडताना प्रथमच अनुभवले. एक व्यक्ती जी मुख्यमंत्री म्हणून मिळणाऱ्या आपल्या पगाराची रक्कम देखील स्वत:साठी पूर्ण खर्च करू शकत नाही. अन्य राजकारण्यांप्रमाणे स्वत:साठी तर सोडाच पण आपल्या सामान्य आर्थिक परिस्थितीतल्या भावांसाठी सुद्धा सरकारच्या खजिन्यातून एक पैसादेखील खर्च करत नाही. बारा महिने चोवीस तास फक्त आणि फक्त गुजरातच्या जनतेचा विचार करते. रोज १६ तास काम करूनही पाच वर्षांत एकही सुट्टी घेत नाही. हे गुजरातच्या जनतेनं प्रत्यक्ष डोळ्यानं पाहिलं. या सर्व पार्श्वभूमीवर पहिल्या पाच वर्षांचा

कार्यकाळ संपवून नरेंद्र मोदी २००७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी सिद्ध झाले.

मात्र नरेंद्र मोदी जरी आपल्या अखंडित सेवायज्ञात मग्न असले तरी त्यांच्यातला हुशार राजकारणी (Shrewd Politician) जागा होता. आपला व्यक्तिगत स्वार्थ काही नाही, आपल्याला या राजकारणातून एक नवा पैसादेखील कमवायचा नाही हे निश्चित असलं तरी ही भूमिका सर्व पक्षनेत्यांना आणि कार्यकर्त्यांना मान्य होणार नाही हे त्यांना माहिती होतं. सत्तेतला हिस्सा आणि त्या हिश्शाची विक्री करून मिळणारा पैसा मिळत नसल्याने आपल्या पक्षातले अनेक आमदार नाराज असल्याचं त्यांना माहिती होतं. या आमदारांबरोबरच सत्तेत हिस्सा मागणाऱ्या परिवारातल्या इतर संघटनांचे प्रमुख आणि काही कार्यकर्ते अस्वस्थ आहेत हे देखील मोदींनी ओळखले होते.

शिवाय मोदींच्या कामाच्या पद्धतीमध्ये त्यांना प्रत्येक गोष्टीच्या, प्रत्येक अभियानाच्या, योजनेच्या, प्रकल्पांच्या यशाकडे लक्ष ठेवून काम करण्याची सवय होती. त्या पद्धतीमध्ये समित्या, चर्चा, मीटिंग, सल्लामसलती या वेळकाढू गोष्टींना अजिबात थारा नव्हता. मोदींना कोणत्याही प्रकारचा तांत्रिक सल्ला हवा असेल तर ते त्या विषयातल्या जागतिक कीर्तीच्या देशी/विदेशी सल्लागारांना त्यासाठी बोलावत असत. एकदा सर्व तांत्रिक तपशील निश्चित झाला की आपल्या संबंधित अधिकाऱ्यांना व मंत्र्यांना ते अंमलबजावणीचा तपशील ठरवायला सांगत असत. संबंधित खात्याचे मंत्री व अधिकाऱ्यांनी असा तपशील मंजूर केला की पुढील सर्व कामांसाठी त्या अधिकाऱ्यांवर मोदी सर्व अधिकार व जबाबदारी सोपवत असत. त्या कामात ते स्वत: हस्तक्षेप करत नसत आणि त्या विभागाचा मंत्री सोडून पक्षातल्या किंवा पक्षाबाहेरच्या कोणाही व्यक्तीला हस्तक्षेप करायला परवानगी नसे. सर्व टेंडर पूर्णपणे पारदर्शक आणि ऑनलाईन पद्धतीने, त्यामुळे त्यातही पक्षातील वा पक्षाबाहेरच्या कोणाचेही काही चालत नसे. गरीब कल्याण मेळ्यातही लाभार्थी सोडून पक्ष नेत्याला किंवा कार्यकर्त्यालाही प्रवेश नसे. एकंदरीत सर्व काम चोखपणे चाललं होतं. पण सरकारच्या प्रत्येक कामात आपला अधिकार गाजवण्याची सवय झालेल्या नेत्यांना आणि ठराविक कार्यकर्त्यांना मात्र कोठेच हस्तक्षेप करता येत नव्हता.

राज्यात केशूभाई पटेल मुख्यमंत्री असताना पाटीदार समाजाचे नेते राज्यभर आपली हुकूमत चालवत असत. नरेंद्र मोदी मुख्यमंत्री झाल्यावर त्या नेत्यांची दादागिरी फारच कमी झाली होती. त्यामुळे ते सर्व नेते अस्वस्थ होते.

अशा असंतुष्टांचा मोठा गट राज्यात २००२ ते २००७ या काळात सतत कार्यरत होता. २००४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत NDA ला व भाजपाला सर्व देशभरातच कमी जागा मिळाल्या त्याचप्रमाणे त्या गुजरातमध्येही कमी मिळाल्या. नरेंद्र मोदींच्याबद्दल तक्रार करायला तोपर्यंत काहीच मुद्दा नव्हता. त्यामुळे "२००४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कमी जागा मोदींच्यामुळे मिळाल्या, त्यांना हटवा." अशी मागणी करण्यासाठी गुजरात भाजपाचे ६२ आमदार (ज्यात पाटीदार समाजाच्या जास्तीतजास्त आमदारांचा भरणा होता) दिल्लीला जाऊन भाजपाच्या केंद्रीय नेत्यांना भेटले. या आमदारांचे पडद्याआडचे सूत्रधार केशूभाई पटेल होते हे उघडच होते. मात्र त्यावेळी भाजपाचे केंद्रीय नेते नुकत्याच झालेल्या सार्वजनिक निवडणुकीतील पराभवाच्या धक्क्यातून सावरलेले नव्हते. त्यामुळे त्यांनी या सर्व आमदारांची 'मोदी हटाओ'ची मागणी धुडकावून लावली होती.

२००७ सालच्या निवडणुका जाहीर झाल्यावर हा असंतुष्टांचा गट पुन्हा कार्यरत झाला. भारतीय किसान संघ या संघ-परिवारातल्या संघटनेचे नेते त्यांच्या मदतीला धावले. २००२ ते २००७ या काळात कृषिक्षेत्रात आणि जलसिंचन योजनांमध्ये नेत्रदिपक प्रगती करून मोदींनी या संघटनेचे महत्त्व कमी करून टाकले होते. शिवाय २००२ च्या निवडणुकीतील विजयानंतर सत्तेतील भागीदारी म्हणजेच मंत्र्यांची पदे त्यांच्या माणसांना द्यायला मोदींनी स्पष्ट शब्दात नकार दिला होता. त्यामुळे किसान संघाचे सर्व नेते मोदींवर प्रचंड नाराज होते. या सर्व विरोधकांनी मोठा आव आणून आम्ही आता मोदींना कायमचा धडा शिकवू वगैरे बडबड सुरू केली होती. विरोधी पक्ष तर मोदींच्या विरुद्ध खालच्या पातळीवर जाऊन टिका करीत होतेच.

मित्रांनो, काळाची पावले ओळखायची सवय जर तुम्ही स्वत:ला लावली तर तुमचा कोणताही शत्रू तुमच्यावर मात करू शकत नाही. नरेंद्र मोदींनी काळाची पावले ओळखायची सवय प्रयत्नपूर्वक लावून घेतली होती. त्यांचे

शत्रू प्रयत्नपूर्वक एक चाल रचत असत, त्यावेळी नरेंद्र मोदींनी त्यांच्या पुढच्या सर्व हालचालींचा विचार करून आपली व्यूहरचना आधीच तयार ठेवलेली असे. २००७ च्या निवडणुकांच्या वेळी हेच झाले. मोदी विरोधकांनी बरीच धावपळ करून सूरतमध्ये पाटीदार समाजाचा मोठा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याद्वारे नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाला आव्हान देण्याचं ठरलं आणि या मेळाव्याला त्यांच्या समाजाचे ज्येष्ठ नेते 'केशूबापा' म्हणजे केशूभाई पटेल स्वत: उपस्थित राहून हे काम करतील असे जाहीर करण्यात आले. हा असा प्रयत्न होणार याची पूर्वकल्पना मोदींना होतीच. त्यामुळे केशूभाईंना योग्य तो मेसेज आधीच पोहोचला होता. शेवटी मोदींनी ठरवले होते तसेच झाले. 'केशूबापा' मेळाव्याला गेलेच नाहीत.

२००७ सालची निवडणूक मोदींनी पुन्हा आपल्या विशिष्ट तंत्राने लढवली. गुजरातच्या जनतेशी त्यांनी प्रत्यक्ष संवाद साधला. गुजरातमधला वेगानं वाढणारा मध्यमवर्ग त्यांच्यावर बेहद्द खूष होता. भ्रष्टाचार बराचसा कमी झाला होता. मंत्रीस्तरावर तर जवळपास नव्हताच. नरेंद्र मोदी स्वत: व्यक्तिगत चारित्र्याचा आदर्श ठरले होते. गुजरात राज्य एक उद्योगप्रवण राज्य म्हणून प्रसिद्धीच्या झोतात होते. नागरी सुविधा आणि मूलभूत सेवा क्षेत्रात प्रचंड प्रगती झाली होती. जनता आपल्या लाडक्या नेत्यावर बेहद्द खूष होती. नेता त्यांच्याशी संवाद साधून होता.

'व्होटर कनेक्ट' या मोदींच्या खास तंत्राने मोदींनी ही निवडणूक जिंकली. उमेदवार निवडताना स्वच्छ चारित्र्याचे अभ्यासू चेहरे निवडले. जे चुकीचे वागले त्यांना सरळ सरळ बाजूला केले. परिवार संघटनांचा दबाव धुडकावून लावला. अनेक ठिकाणी संघयंत्रणा व परिवार संघटनांनी निष्क्रीय राहाणे पसंत केले. काही ठिकाणी उघडपणे विरोधही करून पाहिला. पण अंतिमत: १८२ सदस्यांच्या विधानसभेमध्ये भाजपाचे ११७ आमदार निवडून आले. मोदींनी आपली निर्णयक्षमता व जनमानसातला आपला प्रभाव पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवला.

या निवडणुकीत मोदींच्या विरुद्ध प्रचार करताना काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी मोदींना 'मौत का सौदागर' अशी उपमा दिली. सोनिया गांधी या निवडणुकीच्या राजकारणातल्या तज्ज्ञ मानल्या जात नाहीत. मोदींविरुद्ध हत्यारा, खुनी वगैरे दूषणे काँग्रेसचे नेते सतत वापरत होतेच.

त्यातच कोणीतरी नेत्याने भाषण लिहून दिले आणि सोनियाजींनी जसेच्या तसे वाचले. आपण ज्या शब्दाचा वापर करतो त्या शब्दाचा नेमका अर्थ व संभाव्य परिणाम त्यांना लक्षात आला नाही. चाणाक्ष मोदींनी ही आयती चालून आलेली संधी अजिबात वाया घालवली नाही. त्या पुढच्या प्रत्येक सभेत ते मतदारांना आवाहन करू लागले, ''आपण गुजराती समाज हे जगभरात 'सौदागर-व्यापारी' म्हणून ओळखले जातो. सोनियाजींना हे माहीत आहे, परंतु सर्व गुजराती जनतेचा अपमान करण्यासाठीच त्यांनी मला 'मौत का सौदागर' असे संबोधले आहे. मित्रांनो, तुम्हीच विचार करा. हा माझा नव्हे सर्व गुजरातचा अपमान आहे.''

काही निवडणूक तज्ज्ञ मौत का सौदागर या शब्दामुळे निवडणुकीचे वारे फिरले आणि जनतेने या शब्दाचा राग येऊन मोदींना निवडून दिले असा निष्कर्ष काढतात. केवळ एका शब्दामुळे निवडणुकीचा निकाल बदलला या विधानाला माझ्या मते काहीही अर्थ नाही. परंतु हा शब्दप्रयोग चुकीचा आहे हे निश्चितच खरे आहे आणि मोदींकडून त्यांच्या विरोधकांची प्रत्येक चूक एक उत्तम संधी म्हणून वापरली जाऊ शकते हे देखील तितकेच सत्य आहे.

सन २००७ ते २०१२ या काळात नरेंद्र मोदींनी गुजरातच्या विकासाची आपली घोडदौड चालूच ठेवली. आपल्या पूर्वीच्या सर्व योजना जास्त व्यापक आणि अधिक परिणामकारक करण्याचा धडाका मोदींनी सुरू केला. शिवाय जास्त आवाक्याच्या आणि विशाल आशयाच्या नव्या योजनादेखील सादर केल्या. २००७ ते २०१२ या काळातल्या मोदींच्या काही वैशिष्ट्यपूर्ण योजनांचा थोडक्यात गोषवारा येथे देत आहे.

**व्हायब्रंट गुजरात समीट २००७, २००९, २०११ – Vibrant Gujarat Summit 2007, 2009, 2011 :** सन २००७ च्या व्हायब्रंट गुजरात समीटसाठी FICCI या उद्योजकांच्या संघटनेने पुढाकार घेतला होता. या संघटनेने वेगवेगळ्या महत्त्वाच्या देशांमध्ये भारतातल्या मोठ्या उद्योजकांच्या नेतृत्वाखाली उद्योजक व सरकारी अधिकाऱ्यांचा समावेश असलेली शिष्टमंडळे पाठवली. दि. १२ व १३ जानेवारी २००७ रोजी व्हायब्रंट गुजरात समिट २००७ पार पडले. एकूण ४५ देशांतून ६०० उद्योजकांनी या परिषदेत भाग घेतला. रतन टाटा, कुमारमंगलम बिर्ला,

शशी रुईया, मुकेश अंबानींसहित सर्व प्रमुख भारतीय उद्योजक परिषदेला उपस्थित होते. या परिषदेत एकूण ४६५३०९ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे १८ उद्योग क्षेत्रांतील ४८४ प्रोजेक्टसाठीचे ३६३ करारनामे करण्यात आले. व्हायब्रंट गुजरात समीट २००७ ची दखल जगातील सर्व देशांतील अर्थविषयक प्रसारमाध्यमांनी घेतली.

सन २००९ च्या दि. १२ व १३ जानेवारीला पार पडलेल्या व्हायब्रंट गुजरात समीटमध्ये ३७ देशांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. जपान हा या समीटचा सहआयोजक बनला होता आणि त्या देशातील ७० प्रतिनिधींनी जपानचे भारतातील राजदूत हिडेकी डोमीची यांच्या नेतृत्वाखाली परिषदेत भाग घेतला. नरेंद्र मोदींनी या समीटमध्ये जाणीवपूर्वक मध्यम व लघुउद्योगांना (Small and Medium Enterprises-SME) सहभागी करून घेतले होते. या वर्षी १२,३४,८९८ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करारनामे करण्यात आले. त्यात SME साठी ९५४० कोटींचे १९२१ करारनामे होते. या परिषदेत गुजरातला एक आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ बनवण्याचे स्वप्न नरेंद्र मोदींनी जाहीर केले आणि आंतरराष्ट्रीय पतंगोत्सवाची (International Kite Festival) घोषणा केली. या आगळ्या कल्पनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

दि. १२ व १३ जानेवारी २०११ रोजी आयोजित व्हायब्रंट गुजरात समीटमध्ये १०१ देशांच्या १४०० प्रतिनिधींनी या परिषदेत सहभाग घेतला. या परिषदेलाही चढत्या क्रमाने प्रतिसाद मिळून २०,८३,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे ७९३६ करारनामे करण्यात आले. या व्हायब्रंट गुजरात समीटला मोदींच्या प्रयत्नाने आता आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला होता. या परिषदेत गुंतवणुकीबरोबरच आर्थिक व गुंतवणूक विषयांवर आदान-प्रदान होईल याची व्यवस्था मोदींनी केली.

**टाटा मोटर्सचा नॅनो कार प्रोजेक्ट साणंदला :** रतन टाटांनी जाहीर केलेल्या सर्वसामान्य माणसांच्या कारचे उत्पादन त्यांनी पश्चिम बंगालमध्ये करावे यासाठी पश्चिम बंगालच्या सरकारने त्यांना स्वत:हून गळ घातली होती. पश्चिम बंगालमध्ये उद्योगधंदे वाढावेत या सद्हेतूने टाटा तयार झाले. १८ मे २००६ रोजी त्यांना सिंगूर येथे फॅक्टरी उभारण्यास मान्यता दिल्याचे पत्र देण्यात आले. टाटांनी फॅक्टरी उभारण्याचे काम सुरू केल्यावर

ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसने त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. दोन वर्षे हा त्रास टाटांनी सहन केला. मात्र २४ ऑगस्ट २००८ रोजी तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी हिंसक आंदोलन करून काम बंद पाडले. गोळीबारात काही लोकांचा मृत्यूदेखील झाला. या सर्व घटनांमुळे वैतागून ३ ऑक्टोबर २००८ रोजी रतन टाटांनी कारखाना दुसरीकडे हलवणार असल्याचे जाहीर केले.

काळाची पावले ओळखणाऱ्या नरेंद्र मोदींनी सिंगूरमधल्या तृणमूलच्या आंदोलनाच्या बातम्या यायला सुरुवात झाल्यावर लगेचच हालचाल करून टाटा ग्रुपला आपल्या सहकाऱ्यांकडून संपर्क केला होता. टाटा मोटर्सच्या गरजा समजावून घेऊन त्यांना सोयीच्या होतील अशा पाच जागांची माहिती मोदींनी ३ ऑक्टोबरच्या कितीतरी आधीच टाटा मोटर्सला पाठवली होती. त्यांतल्या दोन जागा टाटा मोटर्सच्या अधिकाऱ्यांनी शॉर्ट लिस्ट केल्याचे देखील त्यांना कळवले होते.

रतन टाटांनी नॅनो फॅक्टरी सिंगूरमधून अन्यत्र हलवण्याचे जाहीर केल्यावर पाचव्या मिनिटाला त्याना नरेंद्र मोदींचा SMS मेसेज मिळाला 'Welcome to Gujarat' सिंगूरमधून नॅनो फॅक्टरी इतरत्र हलवणार ही घोषणा केल्याच्या बरोबर चवथ्या दिवशी रतन टाटांनी दुसरी घोषणा केली, ''टाटा मोटर्सची नॅनो कारची फॅक्टरी नरेंद्र मोदींच्या गुजरातमध्ये साणंद येथे सुरू करणार''. हा करिष्मा नरेंद्र मोदींनी आपल्या दूरदृष्टी आणि आत्मविश्वासाच्या बळावर घडवून आणला. चार इतर राज्यांनीही टाटा मोटर्सला जागा देण्याची तयारी दर्शवली होती. परंतु त्या राज्यांच्या नेतृत्वाकडे नरेंद्र मोदींच्यासारखा आत्मविश्वास नव्हता. त्यांची पूर्वतयारी काहीच नव्हती आणि त्यांच्या राज्यांत गुजरातमध्ये होत्या तशा त्वरित वापरण्यास तयार (Ready to use) अशा मूलभूत सुविधा (Infrastructure) नव्हत्या आणि सर्वांत महत्त्वाचे, त्यांच्या कोणत्याही नेत्याच्या मनात टाटांची फॅक्टरी आपल्याच राज्यात आली पाहिजे अशी प्रबळ इच्छा नव्हती. आपल्या दुसऱ्या घोषणेनंतर टाईम्स ऑफ इंडियाला मुलाखत देताना रतन टाटांनी वापरलेले शब्दच जास्त बोलके आहेत. रतन टाटा म्हणतात, ''The Chief Minister of Gujarat moved very fast. With all other states, despite their good intentions, there were many things yet to be settled. So

we decided to move forward with Gujarat and everything was put in proper place.”

खरे तर टाटा मोटर्सने जी जागा पसंत केली त्या साणंदच्या गुजरात सरकारच्या ताब्यात असलेल्या जागेला त्यावेळी रस्ता नव्हता. हायवे आणि टाटा मोटर्सने निवडलेली जागा यामध्ये जो पट्टा होता त्यामध्ये सर्वांत जास्त ३० एकर जागा रावुभा वाघेला या स्थानिक काँग्रेस नेत्याची होती. टाटा मोटर्सबरोबर जागेचा करारनामा करण्याची तारीख जाहीर करण्यात आली तेव्हा रावुभा वाघेलाबरोबर वाटाघाटी सुरू होत्या. परंतु नरेंद्र मोदींच्या स्वभावात अशा अडचणींना घाबरण्याची सवयच नाही. त्यांनी या वाटाघाटी करण्यासाठी आपल्या सरकारमधल्या एका हुशार अधिकाऱ्याला सर्व अधिकार देऊन पाठवले आणि त्यांच्या अंदाजानुसार टाटांबरोबरच्या करारावर सह्या करण्यासाठी जाहीर केलेल्या दिवसाच्या आधीच्या रात्री १२ वाजता रस्त्यासाठी घ्यायच्या जागेचा करार झाला.

टाटा मोटर्सबरोबर एवढ्या कमी काळात मोदींनी केलेल्या कराराच्या आणि त्यानंतर लगेचच टाटांच्या फॅक्टरीच्या कामाची सुरुवात झाल्याच्या बातम्या संपूर्ण जगभरात गाजल्या. भारतातल्या एका राज्यात स्थानिक राजकारणासाठी उद्योजकाला दोन वर्षे त्रास देण्यात येतो आणि त्याच भारतातल्या दुसऱ्या राज्यातला मुख्यमंत्री चार दिवसांतच त्या उद्योजकाबरोबर करार देखील करतो. उद्योग-जगतात मोदींच्या दूरदृष्टीची, निर्णयक्षमतेची एवढेच नव्हे तर राज्याच्या विकासासाठीच्या तळमळीची प्रचंड वाहवा झाली. आपली त्वरित निर्णय घेण्याची क्षमता मोदींनी सर्व भारतीयांना सिद्ध करून दाखवली. कोणताही अडथळा न येता ठरलेल्या मुदतीत साणंदमधील टाटा मोटर्सच्या फॅक्टरीचे बांधकाम पूर्ण झाले. जून २०१०मध्ये फॅक्टरीत उत्पादनदेखील सुरू झाले. यावेळी देखील संपूर्ण जगभरात बातम्या झळकल्या. ‘मोदी जे आश्वासन देतात ते पूर्ण देखील करतात’ हा संदेशदेखील जगाला गेला. यानंतर काही आठवड्यांतच फोर्ड आणि पिज्यो (Peugot) या इतर कार उत्पादकांनी स्वत:हून गुजरातमध्ये आपली उत्पादन केंद्रे आणण्याची परवानगी मागितली. त्यांची मागणीदेखील तत्परतेने पूर्ण करण्यात आली. साणंदच्या आजूबाजूच्या जमिनीचा दर पूर्वी ३ लाख रुपये एकर होता, तो २०१० साली ३० लाख रुपये एकर एवढा वाढला.

एका उजाड भागाचे समृद्ध आर्थिक क्षेत्रात रूपांतरण झाले. मोदींना 'विकासपुरुष' ही उपाधी जनमानसाने बहाल केली.

नरेंद्र मोदींनी दूरदृष्टीने आणि प्रयत्नपूर्वक मिळवलेल्या या यशामुळे त्यांनी योजल्याप्रमाणे त्यांना अनेक फायदे मिळाले. एक तर राज्यात प्रचंड औद्योगिक गुंतवणूक आल्याने आणि गुंतवणूकदारांना अतिशय सकारात्मक वागणूक मिळाल्याने त्यांनी प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात केली. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार तयार झाले. पूरक उद्योगांना व्यवसाय मिळाल्याने राज्यात आर्थिक सुबत्ता आली. राज्याला कराद्वारे वाढीव उत्पन्न मिळाले ज्याच्यामुळे जास्त विकास कामे राज्यात होऊ शकली. गुजरातचा विकास हा संपूर्ण देशभरात विकासाचे गुजरात मॉडेल (Gujarat Model of Development) म्हणून ओळखला जाऊ लागला. शिवाय गोध्रा हत्याकांडानंतरच्या दंगलीचे निमित्त करून गुजरातला आणि विशेष करून नरेंद्र मोदींना बदनाम करण्याचा काही प्रसारमाध्यमे, काँग्रेस पक्ष आणि तथाकथित डाव्या विचारसरणीच्या पुरोगामी विचारवंतांचा डाव मोदींनी प्रत्यक्ष विकासाच्या वास्तवाने उधळून लावला.

इंडिया टुडे या मासिकाने घेतलेल्या भारतातल्या सर्व राज्यांच्या सर्व्हेमध्ये आणि त्यातून दिल्या जाणाऱ्या बेस्ट स्टेट अ‍ॅवॉर्डमध्ये गुजरातने प्रथम २०१२ साली आणि २०१५ साली दुसऱ्यांदा प्रथम क्रमांक मिळवला. शिवाय गुंतवणुकीसाठी सुयोग्य वातावरण या श्रेणीत (Investment Environment Category) अनेक वर्षे प्रथम क्रमांक मिळवला.

नरेंद्र मोदींनी गुजरातचा कारभार सांभाळला त्या २००१-०२ या आर्थिक वर्षात गुजरातचे GDP (Gross Domestic Product) १,२३,५७३ कोटी रुपये होते, ते २०१४-१५ या आर्थिक वर्षात ७,६५,६३८ कोटींवर मोदींच्या प्रयत्नामुळे पोहोचले होते. याच काळात आंध्र प्रदेशाचे GDP १,५६,७११ कोटी रुपयांवरून ५,२०,०३० कोटीवर तर बिहारचे ५७,६५७ कोटींवरून ३,४३,००० कोटी रुपयांवर पोहोचले होते. गुजरात राज्य हे भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या फक्त ५.९६% क्षेत्रफळ व्यापते. गुजरातची लोकसंख्या भारताच्या लोकसंख्येच्या ४.९९% आहे (२०११ सालची). पण २०१४-१५ सालच्या आकड्यानुसार भारताच्या एकूण GDP पैकी ६.९१ टक्के GDP गुजरातमध्ये बनले होते. हेच आकडे

आपण आंध्रप्रदेशाबद्दल पाहिले तर आंध्रप्रदेश भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४.८७% एवढे क्षेत्रफळ व्यापते. तेथील लोकसंख्या भारताच्या लोकसंख्येच्या ४.०८% आहे. मात्र भारताच्या एकूण GDP पैकी ४.६९% GDP आंध्रमध्ये बनले होते. बिहारने भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.८६% एवढे क्षेत्र व्यापले आहे. तेथील लोकसंख्या एकूण भारताच्या लोकसंख्येच्या ८.५८% आहे. मात्र, बिहारचा GDP एकूण भारताच्या GDP च्या फक्त ३.०९% एवढाच आहे. एकंदरीत या आकडेवारीवरून गुजरातने केलेली प्रगती दिसून येते. नरेंद्र मोदींनी प्रचंड परिश्रमाने ही गोष्ट घडवून आणली.

उद्योगधंद्यांची अशी प्रचंड प्रगती करत असताना सामाजिक समतेकडेही नरेंद्र मोदींचं तेवढंच लक्ष होतं. मोदींनी मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द सुरू केली तेव्हा राज्याच्या उत्पन्नाचे आकडे फारसे मोठे नव्हते. शिवाय कच्छ भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनावर राज्याचा उपलब्ध पैसा मोठ्या प्रमाणावर खर्च होत होता. मोदींनी दूरदृष्टीने पहिल्या पाच वर्षांत उद्योगधंदे वाढवले. परिणामस्वरूप राज्याचे उत्पन्न वाढले आणि त्यामुळे समाजकल्याणकारी योजना सुरू करता येणे शक्य झाले.

भारतीय राजकारणात विशेष करून काँग्रेसच्या UPA सरकारने त्यांच्या २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या कालखंडात समाजकल्याणकारी योजना जाहीर करण्याचा धडाका लावला होता. या योजना जाहीर करताना या योजनांसाठी पैसा कोठून येणार याचा विचार त्या त्या वेळी करण्यात आला नव्हता. विशेषकरून २०१४ च्या निवडणुका जवळ आल्या तेव्हा तर काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी फूड सिक्युरिटी बिलसारख्या योजना जाहीर केल्या ज्या निधीच्या उपलब्धतेअभावी अंमलात येऊ शकत नाहीत हे सर्व जाणकारांना कळत होते. 'Populist measures' सामान्यांचा खोटा कळवळा दाखवणाऱ्या फसव्या योजना असे अनेक जाणकारांनी त्यांचे वर्णनदेखील त्या काळात केले होते कारण केवळ फूड सिक्युरिटी बिलमुळे एक लाख कोटी रुपयांची सबसीडी द्यावी लागली असती.

परंतु नरेंद्र मोदींनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या संपूर्ण कार्यकाळामध्ये अशा 'Populist' योजनांची घोषणा कधीच केली नाही. किंबहुना आपल्या शासनाकडे पुरेसे अर्थबळ येईपर्यंत त्यांनी संयम राखला आणि आवश्यक अर्थबळ आल्यावरच आपल्या समाजकल्याणकारी योजना जाहीर केल्या.

२००७ ते २०१२ या काळात नरेंद्र मोदींनी अशा अनेक अभिनव समाजकल्याणकारी योजना राबवल्या. त्यांतील काही योजनांचा गोषवारा येथे देत आहे.

**वनबंधू विकास योजना :** गुजरात राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ३८% लोकसंख्या वनवासी (Tribals) समाजाची आहे. या सर्व वनवासीबहूल भागात रस्ते, पाणी, वीज व आरोग्यसुविधा पुरवण्याची सुरूवात नरेंद्र मोदींनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कार्यकाळातच केली होती. परंतु या सर्व योजनांच्या खर्चाशिवाय वेगळी वनबंधू विकास योजना त्यांनी २००७ मध्ये तयार केली. नवसारी जिल्ह्यातल्या वनसदा येथे नोव्हेंबर २००३ मध्ये पहिला आदिवासी लोककल्याण मेळावा त्यांनी घेतला आणि आदिवासींचे प्रश्न समजावून घ्यायला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी राज्याच्या आदिवासीबहूल भागाचा दौरा चालूच ठेवला होता. नरेंद्र मोदींनी दरम्यानच्या काळात विविध NGO च्या माध्यमातून वनवासींच्या विकासासाठी एक तपशीलवार योजना बनवण्यास सुरुवात केली. २७ फेब्रुवारी २००७ रोजी त्यांनी 'वनबंधू कल्याण योजना' घोषित केली. या योजनेसाठी टप्प्याटप्प्याने एकूण १५,००० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला.

या वनवासी कल्याण योजनेची एकूण दहा उद्दिष्टे ठेवण्यात आली. त्यांमध्ये वनवासी बांधवांना उत्तम शिक्षणव्यवस्था, रोजगाराची हमी, आरोग्य सुविधा देण्याचे उद्दिष्ट आणि वनवासी क्षेत्राला स्वच्छ पेयजल, वनवासींना जंगलपट्ट्यात शेतीचे अधिकार, शेतीसाठी सिंचन योजना, चांगले रस्ते, २४ तास अखंडित वीजपुरवठा, वनबंधूंना चांगली घरे आणि वनवासी क्षेत्रातील छोट्या शहरांचा विकास अशी उद्दिष्टे ठेवण्यात आली होती. या योजनेत विकासाची प्रक्रिया शेवटच्या घटकापासून सुरू करून वर नेण्यात आली. यालाच 'Bottom up method' म्हणतात. गुजरातमध्ये ही योजना चांगली यशस्वी झाल्याने पुढे गुजरात मॉडेल म्हणून प्रसिद्ध झाली. आदिवासी पाड्यावरच्या प्रत्येक आदिवासी कुटुंबाला वार्षिक किमान ४०,००० रु. उत्पन्न मिळवता येईल असे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर आवश्यक उपकरणे पुरवण्यात येतात आणि पुढे सतत त्या कुटुंबाचे बारकाईने निरीक्षण करण्यात येते. विकासाची प्रक्रिया तेथून सुरू

होते, मग पुढे ग्राम, तालुका व जिल्हा पातळीवरच्या आदिवासी विकास मंडळांद्वारे पुढे चालू राहाते.

या योजनेअंतर्गत २०१४ पर्यंत ४७५५ वनवासी पाड्यांवर वीजपुरवठा करण्यात आला. २०४१ गावांना जोडणारे ३७९३ किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यात आले. ३४०० छोटे बांधारे बांधण्यात आले. १६९४४ घरे बांधून देण्यात आली. १८१२९ हातपंप बसवून देण्यात आले आणि १६३९६ गाई/म्हशी देण्यात आल्या. या शिवाय आदिवासींच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी संपूर्ण खर्च देणे, कन्या केळवणी योजना व अन्य योजनांअंतर्गत सुविधा देणे हे सुरू आहेच. शिक्षण विकास योजनेअंतर्गत आदिवासी भागात नवोदय किंवा एकलव्य विद्यालये सुरू करणे, वसतिगृहे बांधणे, स्किल डेव्हलपमेंटसाठी आय. टी. आय. व पॉलिटेक्नीक सुरू करणे या गोष्टीदेखील सुरू आहेतच.

**मागासवर्गीय बांधवांचा विकास :** मागासवर्गीयांच्या विकासासाठी केंद्रसरकार राबवीत असलेल्या सर्व योजना गुजरातमध्ये अतिशय चांगल्या प्रकारे चालवल्या जातील आणि त्या योजनांचा फायदा पूर्णपणे मागासवर्गीयांपर्यंत पोहोचेल याची काळजी नरेंद्र मोदी स्वत: जातीने घेत असत. त्याशिवाय त्यांनी स्वत:च्या वैशिष्ट्यपूर्ण योजनादेखील या वर्गातील नागरिकांसाठी राबवल्या. मागासवर्गीय कुटुंबाना राहायला पक्की घरे नसतात त्यामुळे मोदींनी गुजरातभर वेगवेगळ्या मागासवर्गीय संवर्गातील लोकांसाठी एकूण १९० गृहनिर्माण संस्था तयार केल्या आणि १११७२ घरे उपलब्ध करून दिली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भरघोस तरतूद नरेंद्र मोदी आपल्या दरवर्षीच्या बजेटमध्ये करत असत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन उच्चशिक्षण घेण्यासाठी मोदींनी डॉ. आंबेडकर परदेशी शिक्षण कर्ज योजना सुरू केली. या योजनेत ४% दराने १५ लाख रुपयांचे कर्ज उच्चशिक्षणासाठी दिले जाते.

**सागरखेडू योजना :** गुजरातला एकूण १६०० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. गुजरातच्या १३ जिल्ह्यांतील ३८ तालुक्यातील ३००० समुद्रकिनाऱ्यांवरील खेड्यांमध्ये गुजरातची ६० लाख जनता राहाते. या लोकांच्या विशिष्ट गरजा ओळखून त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी नरेंद्र मोदींनी २००७ साली अकराव्या पंचवार्षिक योजनेत

११००० कोटींची तरतूद करत असल्याचे जाहीर केले. या योजनेत सागरकिनाऱ्यावरच्या खेड्यांच्या संपूर्ण पर्यावरणाचा (Eco System) विचार करून सर्वव्यापी योजना ठरवल्या गेल्या आहेत. त्यामध्ये मच्छिमारांच्या व्यक्तिगत विकासाच्या (मच्छिमारीचे ट्रेनिंग, लाईफ जॅकेट, नावांसाठी सोलर लॅम्प, संकटात जीव वाचवण्यासाठीची उपकरणे इ.) व इतर पायाभूत सुविधांच्या विकासाची योजनादेखील आहे. एका सरकारी माहितीपत्रकात दिलेल्या माहितीनुसार या योजनेवर १५०० कोटी रुपये २०१४ पर्यंत खर्च झाले होते. अशा अनेक योजना मोदींनी या काळात राबवल्या.

सन २००७ ते २०१२ पर्यंतच्या आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात मोदींनी आपण भारतातला सर्वोत्तम राज्यकर्ता असल्याचं साऱ्या जगाला सिद्ध करून दाखवलं. अरविंद पानगरीया आणि जगदीश भगवती या दोन भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या (दोघेही अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्रोफेसर आणि जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ आहेत) शब्दात सांगायचे तर, "We are impressed by Modi's economics. The 'Gujarat Model' is a metaphor for development driven Primarily by Growth and Private Enterpreneurship. Growth is the single most important instrument of poverty reduction."

उद्योगातून सुबत्ता आणि सुबत्तेतून समाजकल्याण या मोदींच्या अर्थनीतीचे सगळीकडेच कौतुक झाले. एकीकडे साबरमती रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट प्रोजेक्ट, गुजरात इंटरनॅशनल फायनान्स टेक सीटी प्रोजेक्ट (Gift City), अहमदाबाद-गांधीनगर मेट्रोरेल प्रोजेक्ट यांसारखे भव्य इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट बांधण्याचे नियोजन करताना दुसरीकडे सामाजिक समरसता आणण्यासाठी राज्यातील सफाई कामगारांच्या मुलांना सोमनाथ संस्कृत विश्व विद्यालयात सरकारी खर्चाने लग्नमुंजीचे पौरोहित्य शिकवण्याची व्यवस्था करून नरेंद्र मोदींनी आपल्या सर्व समावेशक राज्यकर्त्याच्या भूमिकेचा पुरावा सर्वांना दिला.

२०१२ च्या विधानसभा निवडणुका जवळ आल्यावर पक्षातील मोदीविरोधक पुन्हा जागे होऊन एकत्रीत झाले. जवळपास ११ वर्षांच्या कारकिर्दीत नरेंद्र मोदींनी गुजरातची जी प्रचंड प्रगती केली होती त्यात नावे ठेवायला काहीच जागा नव्हती. शिवाय व्यक्तिगत चारित्र्य आणि नैतिकतेच्या बाबत मोदींचे रेकॉर्ड निष्कलंक होते. मोदींच्या काळात कोणताही आर्थिक

घोटाळा झाला नाही किंवा कोणतीही दंगलदेखील झाली नव्हती. खरं तर नावं ठेवायला किंवा मोदींना विरोध करायला कोणता मुद्दा वापरावा, असा प्रश्न राज्यातल्या मुख्य विरोधी पक्षाला-काँग्रेसला पडला होता. त्यामुळे भाजपामध्ये मोदींना विरोध करणाऱ्यांकडे काहीच तात्त्विक वा व्यावहारिक मुद्दा नव्हता. परंतु राजकारणात सत्तेचा हव्यास माणसाला आंधळा बनवतो ही वस्तुस्थिती आहे. निवडणुकीच्या आधी मोदींविरुद्ध मोठी आघाडी उघडण्यात आली. मोदींनी राज्यातल्या पटेल समाजाचा मोठा अपमान केला आहे, असा प्रचार करून केशूभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली 'गुजरात परिवर्तन पार्टी' स्थापन करण्यात आली. एकेक करत सर्व मोदीविरोधक या छत्राखाली जमा झाले. त्यात गोरधन झडाफीया, भूतपूर्व मुख्यमंत्री सुरेश मेहता, माजी केंद्रीय मंत्री काशीराम राणा हे सामील होते.

नरेंद्र मोदींनी ही निवडणूकदेखील आपल्या विशिष्ट शैलीत लढवली. मतदारांशी संपर्क Voter Connect या आघाडीवर मोदींनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर जास्त प्रभावीपणे केला. सोशल मीडियावर मोदी आधीपासूनच मोठ्या प्रमाणावर 'अ‍ॅक्टिव्ह' होते. त्याचा पुरेपूर उपयोग मोदींनी आपली बाजू मतदारांसमोर मांडण्यासाठी करून घेतला. शिवाय नेहमीच्या शैलीतले सूक्ष्म किंवा तपशीलवार व्यवस्थापन तंत्र (Micro Management Technic) होतेच. आपल्या विरोधात एकत्र झालेले आपल्या पक्षाचे नेते हे फुसके बार आहेत हे मोदींना माहिती होतेच त्यामुळे मोदींनी त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले.

निवडणुकीचा निकाल पूर्णपणे मोदींच्या बाजूने (१८२ पैकी ११५ जागा) लागला. मोदींची अपेक्षा जास्त जागांची होती. खरे तर निकाल मोदींच्या अपेक्षेप्रमाणे लागला असता कारण भाजपाचे उमेदवार १६ जागांवर २% पेक्षा कमी मताने हरले आणि काँग्रेसने जिंकलेल्या २७ जागांवर त्यांचे मताधिक्य ५% पेक्षा कमी होते. नरेंद्र मोदींवर सातत्याने हीन दर्जाची टीका करणारे गुजरात सरकारचे निलंबित केलेले अधिकारी संजीव भट यांच्या पत्नीला काँग्रेसने नरेंद्र मोदींच्या विरुद्ध उभे केले होते. भट यांच्या माध्यमातून मोदींवर अत्यंत खालच्या दर्जाची टीका काँग्रेसने करून पाहिली. त्यांना मणीनगरच्या मतदारांनी सडेतोड उत्तर दिले. नरेंद्र मोदी ८६३७३ मताधिक्याने निवडून आले. भट यांचे डिपॉझीट जप्त झाले. केशूभाई पटेल यांच्या

गुजरात परिवर्तन पार्टीने फक्त दोन जागांवर विजय मिळवला. केशूभाई पटेलांनी निवडणुकीच्या आधी भाजपाचा राजीनामा देऊन निवडणूक लढवली होती तरीही निवडणूक निकालानंतर नरेंद्र मोदींनी केशूभाईंच्या पाया पडून त्यांचा आशीर्वाद घेतला. केशूभाईंना हे इतकं अनपेक्षित होतं की त्यांना रडू आलं. थोड्याच दिवसांत आपली झालेली चूक कबूल करून केशूभाईंनी गुजरात परिवर्तन पार्टी २०१४ साली भाजपामध्ये विलीन केली.

२०१२ सालच्या निवडणुकीत नरेंद्र मोदींनी विजय मिळवल्यावर झालेल्या विजयसभेमध्ये मोदी बोलायला उभे राहिले तेव्हा सर्व कार्यकर्त्यांनी "मोदी पी.एम.", "मोदी पी.एम", "दिल्ली-दिल्ली" अशा घोषणा दिल्या. नरेंद्र मोदींनी त्यांचा हसून स्वीकारही केला. पुन्हा एकदा कार्यकर्त्यांच्यासाठी विजयाचा जल्लोष चालू होता. नरेंद्र मोदी विजयसभेत उपस्थित होते, त्यांच्या मनात आयुष्याच्या पुढच्या वळणावरचा रस्ता स्पष्टपणे दिसत होता.

मित्रांनो, काळाची पावले ओळखून, काळाच्या आधी (Ahead of times) विचार करण्याची सवय आपण जर लावून घेतली तर पुढचा मार्ग आणि भविष्यातल्या प्रगतीच्या दिशा (Future Road Map) आपल्या मनात नेहमीच स्पष्ट दिसतात. मात्र त्यासाठी आयुष्यातल्या अति सुखद आणि अति दु:खदायक प्रसंगांतही नरेंद्र मोदींसारखी तटस्थता आपल्यामध्ये आणावी लागेल.

संपूर्ण समर्पणाच्या भावनेने काम करताना अनेक वेळा कठीण निर्णय व धाडसाचे निर्णय घ्यावेच लागतात परंतु आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून प्रामाणिकपणे घेतलेला प्रत्येक निर्णय काळाच्या कसोटीवर निश्चितच योग्य ठरतो हे नरेंद्र मोदींनी जगाला दाखवून दिले. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत ते सतत प्रयोगशील आणि शिकत राहिले. यशाच्या एका महत्त्वाच्या शिखरावर पोहोचल्यावर सुद्धा पुढच्या प्रगतीचा विचार त्यांनी आपल्या मनात कायम ठेवला होता आणि योग्य संधीची वाट पाहाण्याचा संयमदेखील त्यांनी बाळगला होता, हे आपण सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे.

मित्रांनो, आपल्या आयुष्यात बरंच काही मिळाल्यासारखं वाटत असतानाही अजून बरंच काही करायचं आहे हा सकारात्मक विचार तुम्ही सर्वांनी तुमच्या मनाच्या एका कोपऱ्यात ठेवून योग्य संधीसाठी संयम बाळगाल तर तुम्ही देखील यशाच्या शिखरावर पोहोचू शकाल.

✦✦

# अंतिम ध्येयाकडे झेप

**स**न २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये नरेंद्र मोदींनी भाजपाच्या केंद्रीय स्तरावरील नियोजनात सहभाग घेतला होता. पक्षाने त्यांच्यावर महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांचे प्रमुख म्हणून जबाबदारी दिली होती. परंतु त्या निवडणुकीत दिल्लीतील नेत्यांनीच महत्त्वाचे निर्णय घेतले होते. निवडणूक जिंकण्यासाठी महत्त्वाची असलेली निवडणुकीची काळजीपूर्वक केलेली धोरणात्मक योजना (Strategic Plan) या निवडणुकीतील भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार लालकृष्ण अडवाणी यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्या केंद्रीय निवडणूक प्रचार समितीने तयार केली होती. या निवडणुकीतील एकूण प्रचार पद्धत आणि निवडणुकीत राबवले गेलेले केंद्रीय धोरण याबाबत नरेंद्र मोदी फारसे समाधानी नव्हते. परंतु त्यावेळी त्यांच्यातल्या चाणाक्ष राजकारण्याच्या समजेने (Shrewd Political Sense) ते गप्प राहिले. आपल्या निर्णयांची दिल्लीबाहेरच्या व्यक्तीने केलेली समीक्षा स्वत:ला उत्तम अनुभवी राजकारणी समजणाऱ्या दिल्लीतल्या ज्येष्ठ राजकारणी नेत्यांना सहन होत नाही हे त्यांना चांगले माहीत होते.

२००४ आणि २००९ या दोन्ही सार्वत्रिक निवडणुका भारतीय जनता पक्ष दिल्लीतील केंद्रीय नेतृत्वाच्या चुकीच्या निवडणूक धोरणांमुळे हरला असे अनेक निवडणूक विश्लेषकांचे मत आहे. २००४ मध्ये भाजपाला अनपेक्षित हार पत्करावी लागली. त्याचे कारण विश्लेषक, भाजपा नेत्यांचा फाजील आत्मविश्वास आणि प्रत्यक्ष मतदारांशी पक्षाच्या नेत्यांचा तुटलेला संपर्क असे मांडतात. निवडणुकीच्या आधी निवडणुकीतील पक्षाच्या प्रचारातील मुख्य संदेश 'India Shining' असा ठरवला गेला होता. मतदारांना हा मुख्य संदेश न आवडल्याने किंवा बहुसंख्य मतदारांच्या दैनंदिन आयुष्याशी या संदेशाचा काहीही अन्वयार्थ (Relevance) किंवा संबंध नसल्यामुळे

मतदारांनी चांगल्या पद्धतीने राज्यकारभार करणाऱ्या भाजपाला २००४ साली नाकारले असे अनेक विश्लेषकांनी लिहून ठेवले आहे.

याउलट २००९ मध्ये भाजपाचा निवडणुकीतील मुख्य संदेश हा काहीसा नकारात्मक होता, असे विश्लेषकांचे म्हणणे आहे. अनेक विश्लेषकांची मते पाहता त्यांतील बहुसंख्य विश्लेषकांच्या मते भाजपाने २००९च्या निवडणुकीला अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष पद्धतीच्या निवडणुकीचा (Presidential Style Election) रंग देण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस पक्षाध्यक्षा सोनिया गांधी यांनी जेव्हा जाहीर केले की, निवडणुकीनंतर मनमोहन सिंग हेच आमचे प्रधानमंत्री राहतील तेव्हा भाजपाने त्याला प्रत्युत्तर म्हणून लालकृष्ण अडवाणींना आपले प्रधानमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून जाहीर केले. त्यामुळे संपूर्ण निवडणूक ही दोन व्यक्तींमधली निवडणूक आहे असे चित्र तयार झाले. यामुळे दोन नेत्यांमध्ये उत्तम कोण याच्यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून होता. त्यात लालकृष्ण अडवाणी यांनी आपल्या प्रचाराचा मुख्य मुद्दा डॉ. मनमोहन सिंग हे कमजोर प्रधानमंत्री (Weak Prime minister) आहेत, त्यांना हटवा असा केला. हा मुद्दा काँग्रेस पक्षाकडून सोनिया गांधी, राहुल गांधी, मनमोहन सिंग यांनी चांगल्या प्रकारे खोडून काढल्याने भाजपाची कोंडी झाली व भाजपा मतदारांचा विश्वास मिळवू शकली नाही, असे मत अनेक निवडणूक विश्लेषकांनी नोंदवलेले आहे.

नरेंद्र मोदी आपल्या स्वभावधर्मानुसार या दोन्ही निवडणुकींतील भाजपाच्या व्यूहरचनेचा अभ्यास करत होते. सन २००९च्या निवडणुकीच्या वेळी तर ते काही प्रमाणात त्या प्रक्रियेमध्ये सामील देखील होते. त्यांनी आपल्या पद्धतीनुसार निश्चितच २००९च्या भाजपाच्या पराभवाचे विश्लेषण केले असणार. भारतासारख्या खंडप्राय देशातल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये असंख्य गोष्टी त्या निवडणुकीच्या निकालांवर परिणाम करत असतात. मात्र प्रत्येक निवडणुकीतला प्रचार हा अन्य कारणांइतकाच महत्त्वाचा असतो आणि सुयोग्य नियोजनबद्ध आणि प्रभावी प्रचारयंत्रणा निवडणुकीच्या निकालांवर फार मोठा परिणाम करू शकते हे २००४ व २००९च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालांवरून मोदींनी अनुभवले होते. नरेंद्र मोदींनी आपल्या आयुष्यात घालून दिलेल्या मापदंडांचा विचार करता त्यावेळचा भाजपाचा प्रचार हा पूर्णपणे ढिसाळ होता.

नरेंद्र मोदी आपल्या गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात व्यस्त असताना देशभरातील नेटिझन्स (इंटरनेटवर नियमितपणे वावरणारे– म्हणजे ब्लॉग-चॅट-कॉमेंट्समध्ये भाग घेणारे लोक) मध्ये नरेंद्र मोदी हा मोठ्या प्रमाणात चर्चेचा मुद्दा बनत होता. नरेंद्र मोदींवर टिका करणाऱ्यांचा त्यात सहभाग होता, तसाच नरेंद्र मोदींच्या कर्तृत्वाला दाद देणाऱ्यांचा देखील त्यात सहभाग होता. २० ऑक्टोबर २०१० ला फेसबुकवर एक ब्लॉग प्रसिद्ध झाला. त्याचे हेडिंग होते, 'Narendra Modi as Prime Minister? Why not?' अल्पावधीतच त्याला प्रचंड लाइक्स आणि कॉमेंट्सदेखील मिळाल्या. विशेष म्हणजे मिळालेल्या कॉमेंट्स्मध्ये आणि मूळ ब्लॉगमध्ये देखील नरेंद्र मोदींच्या विविध गुणांचा उल्लेख करून प्रधानमंत्रीपदासाठी तेच कसे योग्य उमेदवार आहेत हे अधोरेखित करून सांगण्यात आले होते.

नरेंद्र मोदी स्वत: पहिल्यापासूनच सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर 'ॲक्टिव्ह' होते. त्यामुळे या सर्व घडामोडींबाबत त्यांना नक्कीच माहिती असावी. भारतीय जनता पक्षाची कार्यपद्धती पाहता २०१४ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांचा विचार पक्षात सुरू व्हायला नक्कीच २०१३ साल उजाडणार होते. त्यामुळे हा विषय २०१० साली पक्षातल्या कोणाच्याही डोक्यात आला असण्याची शक्यता नव्हतीच. नेटिझन्स मात्र या विषयावर जोरदार चर्चा करू लागले होते.

मित्रांनो, उज्ज्वल यशप्राप्तीच्या वाटेवरील प्रत्येकाने आपल्या अपेक्षित संधीची वाट पाहात थांबायचे नसते. संधी आपल्यालाच मिळेल असे गृहीत धरून त्या संधीद्वारे अपेक्षित उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी लागणारी सर्व पूर्वतयारी करूनच संधीला सामोरे जायचे असते. नरेंद्र मोदींच्या यशाचा तर हा मूलमंत्र किंवा 'फंडा' आहे. त्यामुळे भाजपाचे नेतृत्व सन २०१३ उजाडेपर्यंत २०१४ साली होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या नियोजनाला लागणार नाही हे माहिती असूनही नरेंद्र मोदींनी आपली तयारी २०११ पासूनच सुरू केली होती. त्यांच्या पद्धतीनुसार जेव्हा खरोखर संधी येईल तेव्हा Ultimate Choice एकमात्र पर्याय म्हणून समोर येण्याची पूर्ण तयारी त्यांनी केली होती.

भारतासारख्या विशाल देशाचा नेता म्हणून आपला विचार व्हायचा

असेल तर देशातली आणि परदेशातील आपली प्रतिमा एक चांगला राजकीय नेता (Statesman) अशी असण्याची गरज आहे हे चाणाक्ष राजकारणी असलेल्या नरेंद्र मोदींनी ओळखलं. या दृष्टीने त्यांनी दोन भागांत प्रयत्न करण्याचे निश्चित केले. पहिला भाग देशांतर्गत प्रतिमेचा आणि दुसरा स्तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिमेचा. या दोन्ही भागांतील प्रतिमा सुधारण्यासाठी त्यांनी योजना तयार केली.

२०१२ सालच्या गुजरातच्या निवडणुकीच्या निमित्ताने मोदींनी आपल्या विरुद्ध केल्या जाणाऱ्या धर्मांध, अल्पसंख्याकांचा विरोधक या अपप्रचाराला उत्तर देऊन देशांतर्गत आपली प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविले.

मोदींविरुद्ध टोकाला जाऊन व्यक्तिगत आरोप करणाऱ्या झाकिया जाफरी यांनी सुप्रीम कोर्टाकडे गोध्रा हत्याकांडानंतरच्या दंगलीत मोदींचा हात होता, त्यांची चौकशी करा असा अर्ज केला होता. २००८ साली सुप्रीम कोर्टाने एक विशेष चौकशी समिती (Special Investigation Team) नेमून पूर्वी राज्य सरकारने ज्या केसेसचा तपास पूर्ण केला होता अशा ८ केसेस निष्पक्ष फेरचौकशी करण्यासाठी SIT कडे दिल्या. २०१० साली SIT ने नरेंद्रमोदींची प्रदीर्घ चौकशी देखील केली. १२ सप्टेंबर २०११ ला या SIT ने सुप्रीम कोर्टापुढे आपला चौकशीचा अहवाल सादर केला. 'नरेंद्र मोदींवर करण्यात आलेले कोणतेही आरोप सिद्ध झालेले नाहीत' असा अहवालात SIT ने स्पष्ट उल्लेख केला होता. सुप्रीम कोर्टाने तो रिपोर्ट स्वीकारला आणि झाकिया जाफरी यांचा अर्ज फेटाळला. नरेंद्र मोदींच्या बाजूने घडलेली ही एक महत्त्वपूर्ण सकारात्मक घटना होती. नरेंद्र मोदींनी ट्वीटरवर 'God is Great' अशी प्रतिक्रिया देऊन आपला आनंद व्यक्त केला. सुप्रीम कोर्टाने क्लीन चीट दिल्यावर या संधीचा आपली प्रतिमा सुधारण्यासाठी उपयोग होईल हे चाणाक्ष मोदींनी ओळखले. आपल्या वाढदिवसाचे निमित्त करून अहमदाबादमध्ये त्यांनी तीन दिवसांचा उपवास व सद्भावना मेळावा असा कार्यक्रम घेतला. सर्व धर्मांच्या प्रती आपली सद्भावना प्रकट करण्यासाठी आणि समाजामध्ये शांतता नांदावी यासाठी आपण उपवास करत असल्याचे त्यांनी जाहीर केले. तीन दिवसांच्या या सद्भावना मेळाव्यात हजारो नागरिकांनी मोदींची भेट घेतली. त्यामध्ये अल्पसंख्य व बहुसंख्य सर्व समाजाचे लोक सामील होते. या मेळाव्याला

देशभर चांगली प्रसिद्धीदेखील मिळाली.

पुढील महिन्यांमध्ये नरेंद्र मोदींनी असे सद्भावना मेळावे गुजरातच्या सर्व जिल्ह्यांमध्ये एकूण ३३ ठिकाणी घेतले. राज्यभरामध्ये सर्वत्र मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद व प्रसिद्धी मिळाली. नरेंद्र मोदींच्या या कल्पनेने त्यांच्या विरुद्ध केल्या जाणाऱ्या चुकीच्या टिकेला योग्य उत्तर दिले गेले. नरेंद्र मोदींनी सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा योग्य उपयोग आपली प्रतिमा बदलण्यासाठी करून घेतला. देशभरात सर्वत्र सकारात्मक संदेश देण्यात ते यशस्वी झाले.

काँग्रेस आणि काँग्रेसचे संबंधित बुद्धिजीवी नरेंद्र मोदींना जसे भारतात त्रास देत होते तसाच त्रास त्यांनी नरेंद्र मोदींना अमेरिका, ब्रिटन आणि काही युरोपियन देशांत देण्याचा प्रयत्न केला होता. अमेरिकेमध्ये कम्युनिस्ट विचारसरणीला मानणाऱ्या प्रोफेसर मंडळींची एक मोठी लॉबी कार्यरत आहे. भारतातील मोदीविरोधक प्रसार माध्यमांच्या लॉबीशी त्यांचा घट्ट संबंध आहे. या अमेरिकेतील प्रोफेसर लॉबीने अमेरिकेतील प्रशासनाकडे अर्ज-विनंत्या करून २००५ साली नरेंद्र मोदींना अमेरिकेचा व्हिसा नाकारायला लावला होता. मोदीविरोधक प्रसारमाध्यमांनी २००५ नंतर मोदींना अमेरिकेने व्हिसा नाकारला हा मुद्दा बातम्यांमध्ये सतत जागता ठेवला होता. जणू काही अमेरिकन व्हिसा ही मोदींसाठी एक जीवनावश्यक गोष्ट होती. तीच गोष्ट ब्रिटिश सरकारची. तेथील अनिवासी भारतीयांच्या मागणीवरून ब्रिटिश सरकारने २००९ साली मोदींच्या भेटीवर बंदी घातली होती.

काँग्रेसप्रणित भारतीयांच्या या कारवायांना नरेंद्र मोदींनी आपल्या पद्धतीने उत्तर दिले. अमेरिकेने व्हिसा नाकारल्यावर तो मिळवण्यासाठी अमेरिकेतील नरेंद्र मोदी समर्थकांनी आणि फ्रेंड्स ऑफ बीजेपी या संघटनेच्या नेत्यांनी अमेरिकन सरकारकडे मोदींच्या बाजूने अपील दाखल केले. स्वाभिमानी आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण मोदींनी त्यांना निरोप पाठवला, ''मित्रांनो, कोणत्याही प्रकारच्या अर्ज-विनंत्या करू नका. अमेरिका एक दिवस स्वत:हून पायघड्या घालून मला बोलवायला येईल.''

अमेरिका आणि युरोपियन देशांच्या आडमुठ्या धोरणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून नरेंद्र मोदींनी पूर्व आशियाई, दक्षिण पूर्व आशियाई देश व चीन, रशिया, ऑस्ट्रेलिया, जपान, आफ्रिकेतील देश आणि आखाती देश अशा इतर महत्त्वाच्या देशांकडे आपले लक्ष वळवले.

आपले विरोधक आपल्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर कुठे कुठे त्रास देऊ शकत नाहीत याचा अंदाज घेऊन मोदींनी रशिया, जपान आणि इस्त्रायल या देशांशी आधीच संबंध प्रस्थापित केले होते. रशियाचा पहिला दौरा त्यांनी २००१ साली मुख्यमंत्री झाल्या झाल्या एक महिन्याने अटलजी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली केला होता. नंतर रशियाशी सतत संबंध वाढवून २००६ आणि २००९ मध्ये देखील त्यांनी रशिया दौरा केला होता. जपानशी त्यांनी असेच चांगले संबंध तयार करून २००७ साली पहिला जपान दौरा केला होता. २०१२ मध्ये त्यांनी जपान एक्सटर्नल ट्रेड ऑर्गनायझेशन (JETO) बरोबर करार करून प्रथम जपानी उद्योजकांचे शिष्टमंडळ गुजरातमध्ये बोलावले, नंतर स्वत: एक शिष्टमंडळ घेऊन जपानमध्ये जाऊन आले. इस्त्रायलबरोबर मोदींनी क्षारपड आणि आम्लधर्मी जमिनीचे शेतीउपयुक्त जमिनीत पुनरुज्जीवन कसे करावे यासाठी करार केला आणि सुमारे १० लाख हेक्टर जमिनीच्या विकासात इस्त्रायलचे सहकार्य मिळवले होते.

२०११च्या सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर गुजरातमधल्या दंगलीची दोनदा (प्रथम गुजरात सरकारच्या पोलिसांकडून व नंतर सुप्रीम कोर्टाने नेमलेल्या SIT कडून) चौकशी होऊन नरेंद्र मोदी व्यक्तिगतरित्या निर्दोष आहेत हे सत्य जगापुढे आले. शिवाय व्हायब्रंट गुजरात समीट आणि टाटा मोटर्स व नंतर फोर्ड आणि प्युजो यांनी गुजरातमध्ये आपली उत्पादन केंद्रे सुरू केल्याने गुजरात हे भारतातले उत्कृष्ट गुंतवणूक केंद्र आहे हे अमेरिका, ब्रिटन आणि युरोपयिन देशांना कळून चुकले. त्यामुळे त्या देशांचे उद्योग आणि वित्तमंत्री आपापल्या सरकारांवर मोदींशी व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यासाठी दबाव टाकू लागले. त्यामुळे त्या सर्व सरकारांनी आपल्या भारतातील राजदूतांना नरेंद्र मोदींशी संबंध वाढवण्याचे आदेश दिले.

ऑगस्ट २०११ मध्ये चीनच्या राजदूताने गुजरातमध्ये जाऊन मोदींना चीन भेटीचे आमंत्रण दिले. नोव्हेंबर २०११ मध्ये मोदींनी चीनचा दौरा केला. २१ ऑक्टोबर २०१२ रोजी ब्रिटिश हाय कमिशनर जेम्स बेव्हन यांनी गांधीनगरला येऊन मोदींची भेट घेतली व आपल्या सरकारतर्फे पूर्वीच्या घटनांबद्दल दिलगिरी व्यक्त करून गुजरातबरोबर आर्थिक व व्यापारी संबंध ठेवण्याची इच्छा प्रकट केली. त्यानंतर ८ मार्च २०१३ ला

जर्मन राजदूत मायकेल स्टेनरने, ३ जून २०१३ ला बेल्जीयम सरकारने नरेंद्र मोदींवर आपल्या देशात येण्यासाठी टाकलेली बंदी उठवली असून त्यांचे आपल्या देशात स्वागत आहे अशी घोषणा केली. लगेचच युरोपियन युनियनकडून देखील याच प्रकारची घोषणा करण्यात आली. ३० एप्रिल २०१३ ला कॅनेडियन हाय कमिशनर गांधीनगरला दाखल झाले. आपल्या सरकारच्या पूर्वीच्या भूमिकेबद्दल दिलगिरी व्यक्त करून मोदींबरोबर व्यावसायिक संबंध वाढवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. अमेरिकेचे सरकार अस्वस्थपणे या सर्व घटना पाहात होते.

मित्रांनो, या सर्व घटना आपोआप घडत होत्या असे वाटते कारण नरेंद्र मोदींनी प्रत्यक्षपणे या घटना घडाव्यात यासाठी काहीच केले नव्हते. मात्र आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा गोष्टी सहजासहजी घडत नसतात. या सर्व घटनांमागील खरे कारण होते आंतरराष्ट्रीय स्तरावर नरेंद्र मोदींची एक कार्यक्षम, कणखर भूमिकेचा भारतातील उभरता नेता (Emerging Leader) अशी प्रतिमा तोपर्यंत तयार झाली होती. 'टाईम' या जगप्रसिद्ध मासिकाच्या आशियाई एडिशनच्या मार्च २०१२ च्या अंकामध्ये नरेंद्र मोदींचा इंटरव्ह्यू प्रसिद्ध झाला होता. त्या मासिकाच्या कव्हर पेजवर नरेंद्र मोदींचा फोटो 'Modi means Business' या शीर्षकासहित छापला होता. त्या लेखाच्या लेखिका Jyoti Thottam यांनी २०१२ साली नरेंद्र मोदींचे वर्णन करताना, '...and is a possible future Prime Minister'' असे वाक्य लिहिले होते. थोडक्यात आपल्या गुजरात विकासाच्या मॉडेलमुळे नरेंद्र मोदी आपली एक कार्यक्षम राजकारणी (Statesman) अशी प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर उभी करण्यात यशस्वी झाले होते.

२३ मार्च २०१३ रोजी अमेरिकेचे तीन कॉंग्रेस सदस्य ॲरान शॉक (Aaron Schock), सिंथीया ल्युमिस (Cynthia Lummis) आणि कॅथी रॉजर्स (Cathy Rodgers) यांच्या नेतृत्वाखालचे एकूण २४ प्रतिनिधींचे शिष्टमंडळ अमेरिकेतून सरळ गुजरातमध्ये पोहोचले. नरेंद्र मोदींशी प्रदीर्घ चर्चा करून त्यांनी गुजरातच्या प्रगतीची माहिती घेतली आणि मोदींना अमेरिका भेटीचे आमंत्रण दिले. गुजरात शासनाच्या अधिकाऱ्यांनी या शिष्टमंडळासाठी पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित केलेले प्रीतीभोजन रद्द करायला लावून मोदींनी अमेरिकन पाहुण्यांना 'विशाला' रिसॉर्टमध्ये

आपल्याबरोबर मांडी घालून जेवायला देखील लावले. मोदींच्या भेटीची पत्रकार परिषदेत माहिती देताना ॲरॉन शॉक यांचे शब्द फार बोलके आहेत. ''We have invited him to come over to the US and share with us the excellent work done by him.''

अशा अनेक उलट सुलट घटना घडत असताना नरेंद्र मोदी मात्र आपली सर्व शक्ती पणाला लावून २०१४ च्या निवडणुकीच्या तयारीला उतरले होते. आपण करत असलेली कोणतीही गोष्ट इतर सर्वसामान्य व्यक्तींसारखी न करता अगदी वेगळेपणाने करण्याची खास 'नरेंद्र मोदी शैली' त्यांनी २०१४ च्या निवडणूक प्रचार मोहिमेतही वापरली आणि २०१४च्या निवडणुकीचा प्रचार एका अद्वितीय, अभूतपूर्व, कधीही न झालेल्या पद्धतीने केला. या प्रचार मोहिमेद्वारे आपल्या कठोर परिश्रमाने, दृढनिश्चयी स्वभावाने, असामान्य राजकीय व्यूहरचना कौशल्याने (Political Manoeuvring Skills) भारतीय राजकारणात एक नवा इतिहास नरेंद्र मोदींनी घडवला आहे.

१३ सप्टेंबर २०१३ रोजी भारतीय जनता पक्षाचे त्या वेळचे राष्ट्रीय अध्यक्ष राजनाथसिंग यांनी २०१४च्या लोकसभा निवडणुकीसाठी नरेंद्र मोदी हे पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार आहेत असे घोषित केले. लगेचच १५ सप्टेंबर २०१३ला हरियाणातील रेवरी येथे माजी सैनिक मेळाव्यात नरेंद्र मोदींनी आपल्या प्रचार अभियानाचा शुभारंभ केला. १० मे २०१४ला २३७ दिवसांनी ही प्रचार मोहीम संपवली. या ऐतिहासिक प्रचार मोहिमेद्वारे नरेंद्र मोदींनी विजयश्री खेचून आणली. या मोहिमेची काही वैशिष्ट्ये पुढे देत आहे.

– १५ सप्टेंबर २०१३ ते १० मे २०१४ पर्यंत २३७ दिवसांत भारतभरातील २५ राज्यांतून मोदींनी एकूण ३,००,००० कि.मी. प्रवास केला.

मोदींनी या काळात भारतभरात ४३७ सभा घेतल्या. राज्य विधानसभेच्या निवडणुका असलेल्या चार राज्यांत दोन महिन्यांत ५२ सभा घेतल्या. त्यांपैकी तीन राज्यांत भाजपा विजयी झाला. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यावर ४५ दिवसांत १९६ भारत विजय रॅली-सभा झाल्या. सरासरी रोज ४ पेक्षा जास्त सभा घेतल्या. दोन हेलीकॉप्टर्स हे सर्व दिवस त्यांच्यासाठी वापरली गेली.

– कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत संपर्क व्हावा म्हणून अद्ययावत होलोग्राम तंत्रज्ञानाचा वापर करून मोदींनी 3D रॅलीज केल्या. स्वत: मोदी एका ठिकाणी स्टुडिओमध्ये भाषण द्यायचे ते या 3D तंत्रज्ञानाने एकाच वेळी अनेक ठिकाणी LED स्क्रीनवर दाखवले जायचे. हे 3D तंत्रज्ञान Uwe Mass या जर्मन उद्योजकाने भारतात निवडणुकीत प्रथमच वापरले. मोदींच्या या सभांची गिनीज् बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. एकूण १३५० ठिकाणी 3D रॅलीज यशस्वीपणे घेण्यात आल्या.

– काँग्रेसने मोदींना 'चहा विकणारा पोऱ्या' असे हिणवायला सुरुवात केली. त्या टीकेचा धागा उचलून मोदींनी 'चाय पे चर्चा' हा अभिनव कार्यक्रम निवडणुकीत सादर केला. वेगवेगळ्या शहरांत चहा स्टॉलवर स्थानिक मतदारांना बोलावून एकाच वेळेला अनेक ठिकाणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मोदी मतदारांच्या प्रश्नांना उत्तर द्यायचे. या उपक्रमात ४००० ठिकाणे जोडण्यात आली.

– निवडणुकीत आपला उमेदवारी फॉर्म भरायला मोदी जेव्हा वडोदरा आणि वाराणसी या दोन्ही मतदारसंघांत गेले तेव्हा मोदींच्या चाहत्यांची एवढी प्रचंड गर्दी झाली की दोन्ही ठिकाणी आपोआप रोड शो झाले. पक्ष कार्यालय ते निवडणूक अधिकारी कार्यालय हे ३-४ किलोमीटरचे अंतर पार पाडायला ५ ते ६ तास लागले. वाराणसीमध्ये असा रोड शो आजपर्यंत कधी झाला नव्हता.

– पक्षाने केंद्रीय प्रचार समितीत मोदींसहित १२ दिग्गज नेते नेमले होते. त्यांच्या हाताखाली २० सबकमिटी बनवल्या होत्या. त्यामध्ये असंख्य कार्यकर्ते काम करीत होते. याच प्रकारची यंत्रणा प्रत्येक राज्यासाठी देखील बनवण्यात आली होती.

– नरेंद्र मोदींनी स्वतंत्रपणे कॅम्पेन फॉर अकाउंटेबल गव्हर्नन्स (CAG), फ्रेंड्स ऑफ नरेंद्र मोदी अशा ग्रुपद्वारे पक्षाबाहेरील स्वयंसेवकांकडे वेगवेगळी कामे दिली होती. नरेंद्र मोदी फॅन क्लब, फ्रेंडस् ऑफ बीजेपी, I Support Narendra Modi, नमो ब्रिगेड अशा ग्रुपमध्ये हजारो उत्साही नागरिक काम करीत होते.

– सोशल मीडियाचा वापर प्रचंड प्रमाणावर करण्यात आला. narendramodi.in, mission272+.com, indiancag.org,

isupportnarendramodi.com, modibharosa.com, NamoNumber.com, shreshthabharat.com अशा अनेक वेबसाईट तयार करण्यात आल्या. त्यावर निवडणुकीतील प्रचाराच्या अद्ययावत बातम्या देण्यात येत होत्या. CAG ने प्रत्येक मतदारसंघासाठी एक याप्रमाणे ३०० फेसबुक पेजेस तयार केली होती. त्यांना 'With Namo for Delhi' अशी वेगवेगळी नावे देण्यात आली होती. त्या पेजेसवर त्या त्या मतदारसंघातील दिवसभराचे अपडेट्स टाकण्यात येत होते.

– फर्ग्युसन कॉलेजमधील सभेपूर्वी त्या सभेसाठी विषय सुचवण्याचे आवाहन फेसबुक पेजवरून करण्यात आले. त्याला २५०० सूचना आल्या. यानंतर प्रत्येक सभेसाठी हा 'Crowd sourcing of material' फॉर्म्युला वापरण्यात आला.

– नरेंद्र मोदी स्वत: सोशल मीडियावर सतत 'ॲक्टिव्ह' होते. फेसबुकवर त्यांचे १ कोटी ४० लाख तर ट्विटरवर ३० लाख फॉलोअर्स होते. Google Hangouts, Facebook Talks चा वापर करून मोदींनी आपल्या IT टीम कडून अनेक विषयांवर चर्चा घडवल्या. 'Selfie with Narendra Modi' हा ट्विटरवरचा टॉप ट्रेंडिंग हॅश टॅग होता. Buzzfeed, Pintrest, Tumblr, Stumble upon असे सर्व ऑनलाईन प्लॅटफॉर्म मोदी टीमने वापरले. विरोधकांवरील टीकेसाठी Spoof Campaign चा वापरही मोदी टीमने केला. www.pappuindia.com हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

– सर्व प्रकारच्या दैनंदिन वापराच्या गोष्टींचा वापर प्रचारासाठी करण्यात आला. त्यात काही अतिशय नाविन्यपूर्ण कल्पनादेखील होत्या. युवा मोर्चाचे तेजींदर पालसिंग बग्गा यांनी मोदींचा फोटो व मेसेज असलेले टी-शर्ट काढले, की-चेन, मग, कपसुद्धा निघाले आणि या सर्वांची ऑनलाईन विक्री करायला 'thenamostore.com' ही वेबसाईटदेखील निघाली. मनीष बारडीया यांनी या निवडणुकीत प्रसिद्ध झालेले Modi mask हे 3D टेक्नॉलॉजी वापरून केलेले मास्क व नंतर मोठ्या प्रमाणावर वापरासाठी तयार केलेले कार्डबोर्डचे मास्क तयार करून दिले. मोदींचा फोटो छापलेली उपरणी, बॅजेस, टोप्या या देखील मोठ्या प्रमाणावर वापरण्यात आल्या. मोदींसारख्या दिसणाऱ्या व्यक्तींना (Look-alikes) मोदींसारखा कुर्ता-पायजमा व मोदी जॅकेट घालून अनेक सभांमध्ये उपस्थित ठेवण्यात येत होते.

– जाहिरातीचं कॅम्पेन O & M या प्रसिद्ध जहिरात कंपनीच्या उपकंपनीला– 'Soho Square' या कंपनीला देण्यात आलं होतं. पियुष गोयल हे भाजपातर्फे या विभागाचे प्रमुख होते तर पियुष पांडे कंपनीतर्फे प्रमुख होते. शिवाय कँपेनचं गीत (Compaign Anthem) तयार करण्याचं काम 'Mc Cann India' या दुसऱ्या प्रसिद्ध जहिरात कंपनीचे प्रसिद्ध गीतकार प्रसून जोशी यांना देण्यात आलं होतं. त्यांनी तयार केलेलं कॅम्पेन गीत 'अच्छे दिन आनेवाले हैं।' हे फारच लोकप्रिय झालं होतं. जहिरातीचं काम कॉर्पोरेट पद्धतीनं केलं जात होतं. त्यामुळे पब्लिक ओपिनीअन सर्व्हेमधून आलेल्या निष्कर्षांच्या आधारावर प्रचाराचा चेहरा (Face of Campaign) ठरवण्यात आला. या सर्व्हेच्या निष्कर्षांनुसार नरेंद्र मोदींची व्यक्ती म्हणून लोकप्रियता भाजपाच्या लोकप्रियतेपेक्षा २०% ने जास्त होती. त्यामुळे सर्व जहिरातींमध्ये One Brand, One Face, One Leader चा निर्णय घेण्यात आला. या टीमने देखील अहोरात्र काम करून १० भाषांमधले रेडिओ, टेलिव्हिजन, वर्तमानपत्रे, होर्डिंग, मासिके, सर्वांसाठी २३० वेगवेगळ्या प्रकारच्या जहिराती तयार केल्या. मेसेजपासून रंगसंगतीपर्यंत अनेक गोष्टींत स्वत: मोदींनी लक्ष घातले होते.

– या निवडणुकीच्या प्रचारात सर्वांत रंग भरला तो मोदींच्या प्रभावी भाषणांनी. आपल्या प्रचंड धावपळीच्या ताणानंतरही एकदा सभा सुरू झाली की नरेंद्र मोदी आपल्या आवेशपूर्ण शैलीत मनापासून भाषण करीत असत. विशेष म्हणजे ४३७ सभांपैकी एकाही सभेत मोदींनी भाषण वाचून दाखवलं नाही. फार कमी नोट्सचा वापर त्यांनी केला. काँग्रेस पक्षातील घराणेशाहीवर त्यांनी कठोर टीका केली. राहुल गांधींचा 'शहजादा' म्हणून मोदींनी केलेला उल्लेख फार लोकप्रिय झाला. मणीशंकर अय्यर यांनी 'चहावाला' म्हणून मोदींना हिणवले. मोदींनी कल्पकतेने त्या शब्दाचा वापर करून 'आपण सर्वसामान्यांचा उमेदवार आहोत' हे सर्व मतदारांच्या मनावर ठसवले. मोदींनी प्रत्येक सभेतील वापरलेली अर्थपूर्ण वाक्यं मतदारांना भावली आणि प्रसारमाध्यमांनी उचलून धरली. मणीशंकर अय्यर यांना त्यांनी सुनावलं, "होय, मी चहा जरूर विकला आहे पण तुम्ही तर अख्खा देश विकायला निघालात." आपल्या आवेशपूर्ण, श्रोत्यांच्या हृदयाला हात घालणाऱ्या, सभेला खिळवून ठेवणाऱ्या भाषणांनी नरेंद्र मोदींनी या २०१४

च्या निवडणूक प्रचारात प्रचंड मोलाची आणि महत्त्वाची भर घातली. आपल्या गुजरात विकासाच्या मॉडेलचे अनेक पैलू त्यांनी स्थानिक अडचणींच्या संदर्भात मोठ्या कल्पकतेने सभांमध्ये मांडले. शिवाय प्रत्येक भाषणात आपल्या शैलीतलं खास वाक्य टाकून मोदींनी आपल्या भाषणांना प्रसारमाध्यमांतून भरपूर प्रसिद्धीदेखील मिळवली. 'सबका साथ सबका विकास' हे त्यांचं एक प्रसिद्ध वाक्य होतं.

– सुरुवातीला मोदींच्या विरोधात असलेली प्रसारमाध्यमं हळूहळू मोदींच्या प्रचारसभांना लाईव्ह (Live) दाखवू लागली कारण मोदींची लोकप्रियता मोदींनी दिलेल्या टीव्ही चॅनेलच्या पहिल्याच इंटरव्ह्यूमध्ये सिद्ध झाली. एकतर प्रचार मोहीम सुरू झाल्यापासून मोदींनी प्रसारमाध्यमांना मुलाखत देण्याचे जाणीवपूर्वक टाळले होते. यामुळे देशभरातील जनतेमध्ये मोदींच्या विषयी प्रचंड उत्सुकता तयार झाली होती. मोदींच्या व्यूहरचनेचा तो एक भाग होता. मोदींना जी माहिती लोकांपर्यंत पोहोचवायची होती तीच माहिती या व्यूहरचनेमुळे लोकांपर्यंत पोहोचली. मोदींनी आपली टीव्ही चॅनेलची पहिली मुलाखत इंडिया टीव्हीच्या रजत शर्मांच्या 'आपकी अदालत' या प्रसिद्ध कार्यक्रमात दिली. या कार्यक्रमाला एवढा प्रचंड प्रतिसाद व TRP मिळाला की सर्व प्रसारमाध्यमे हादरून गेली. ही मुलाखत जेव्हा प्रथम प्रसारित झाली तेव्हा ७४% टीव्हीचे प्रेक्षक ती मुलाखत पाहात होते. या कार्यक्रमात नरेंद्र मोदींना अडचणीचे वाटावेत असे सर्व प्रश्न विचारण्यात आले; परंतु नरेंद्र मोदींनी त्यांच्या ओघवत्या शैलीत त्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. २०१४ च्या निवडणूक प्रचाराच्या आधी प्रसारमाध्यमं प्रचाराची दिशा ठरवत असत. नरेंद्र मोदींनी आपल्या उत्कृष्ट व्यूहरचनेने प्रथमच प्रसार माध्यमांच्या या दादागिरीला सडेतोड उत्तर दिले आणि प्रचाराची दिशा माध्यमांना बदलू दिली नाही.

– सेनापती स्वत: युद्धात आघाडीवरून लढला तर सर्व सैन्यामध्ये विलक्षण उत्साह पसरतो या युद्धाच्या नियमानुसार नरेंद्र मोदींनी सर्व प्रचारयंत्रणेच्या आघाड्यांवर दिवसरात्र एक करून प्रचार केला त्यामुळे प्रत्येक लोकसभा मतदार संघातील भाजपा, संघ व परिवार क्षेत्रातील शेवटच्या कार्यकर्त्यापर्यंत प्रत्येकाने मनापासून भरपूर काम केले. शिवाय मोदींच्या प्रेमामुळे काम करणारे नागरिकदेखील प्रचंड उत्साहाने काम करीत

होते. त्यामुळे २०१४ च्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार हा अभूतपूर्व बनला.

१६ मे २०१४ रोजी निवडणुकीचा निकाल होता. निकालापूर्वी मोदींना त्यांच्या खास यंत्रणेकडून ''आपल्याला २६० जागी विजय मिळेल आणि कोणत्यातरी पक्षाच्या मदतीने सरकार बनवता येईल त्याच्या तयारीला लागा,'' असे सांगण्यात आले होते. मोदींचा स्वत:चा आत्मविश्वास त्यांना वेगळेच सांगत होता. त्यामुळे त्यांनी शांत बसणे पसंत केले. निवडणुकीच्या दिवशी भारतातल्या कानाकोपऱ्यापासून दिल्लीपर्यंतचे कोट्यवधी लोक सकाळी ७.०० वाजल्यापासून टीव्हीसमोर तहान भूक विसरून बसले होते. स्वत: नरेंद्र मोदींनी मात्र ठरवून दुपारी १२ वाजेपर्यंतचा वेळ योगसाधना आणि ध्यानधारणा करण्यात घालवला. त्यांच्या मुख्यमंत्री निवासात ते एकटेच होते. टीव्ही बंद होता आणि भाजपाच्या नेत्रदीपक विजयाचा शिल्पकार निवडणुकीच्या धावपळीत पूर्ण न झालेली ध्यानधारणा पूर्ण करत होता. नंतर आपल्या एका चरित्रकाराला त्यांनी सांगितलं, ''मी माझ्या मनावर नेहमीच स्व-नियंत्रण (Self-restraint) ठेवत असतो. निवडणुकीच्या निकालाचा दिवस माझं स्व-नियंत्रण तपासून पाहायला एक उत्तम संधी घेऊन आला होता, त्यामुळे मी दुपारी १२.०० वाजेपर्यंत वेळ ध्यानधारणेत घालवला.'' तोपर्यंत टीव्ही, फोन, लॅपटॉप सर्व बंद होते. दुपारी १२.०७ ला नरेंद्र मोदींनी बाहेरच्या जगाशी पहिला संपर्क साधला तोही ट्विटरवरून 'India has won. Good times are coming' या संदेशातून. संध्याकाळपर्यंत त्यानी प्रसारमाध्यमांच्या समोर येणं टाळलं. सायंकाळी ते बाहेर पडले आणि आपल्या पद्धतीप्रमाणे आपली माता हिराबाचा आशीर्वाद घ्यायला तिच्या घरी पोहोचले आणि तेथून कार्यकर्ता अभिवादन रॅलीत.

मित्रांनो, आपल्या अपरिमित कष्टानं, प्रचंड जिद्दीनं, आपल्या धाडसी स्वभावानं, आपल्या चाणाक्ष राजकीय समजेनं (Shrewd Political Sense), राजकीय व्यूहरचना कौशल्यानं (Political Manoeuvring Skills) आणि सर्वात महत्त्वाच्या असणाऱ्या न नमणाऱ्या, दुर्दम्य इच्छाशक्तीनं (Indomitable will) वडनगरसारख्या छोट्या खेड्यात, आर्थिक दुर्बळ, इतर मागासवर्गीय समाजातल्या सामान्य कुटुंबात जन्मलेली एक व्यक्ती १२५ कोटींच्या देशाची पंतप्रधान बनली. खोली झाडणे आणि लोकांचे कपडे धुणे यांसारख्या

कामांपासून संघकार्याची सुरुवात केलेला एक स्वयंसेवक वर उल्लेख केलेल्या आपल्या गुणांमुळे या खंडप्राय देशाचा प्रधानमंत्री बनू शकतो हे नरेंद्र मोदींनी सिद्ध केले.

मित्रांनो नरेंद्र मोदींचे हे गुण मनात कायमचे ठेवून आपल्या आयुष्यात मिळालेल्या प्रत्येक संधीचं सोनं करीत राहा. संधी आपल्यालाच मिळणार आहे या आत्मविश्वासानं आयुष्यातल्या प्रत्येक क्षणी आपल्या आयुष्यात काही गुणात्मक वाढ (Value addition) करीत राहा आणि आपल्या मिळवलेल्या कौशल्यांचा समाजासाठी उपयोग करून स्वत:ला या जगासमोर सादर आणि सिद्ध करीत राहा. यामुळे तुमच्यातील प्रत्येकजण नरेंद्र मोदींसारखा सर्वोच्च यशापर्यंत निश्चितच पोहोचेल. सारे जग तुम्हाला 'नमो नम:' करत राहील.

मित्रांनो, नरेंद्र मोदी पंतप्रधानपदावर प्रचंड बहुमताने निवडून आले आणि स्वत:च्या अभूतपूर्व प्रयत्नांनी त्यांनी विजयश्री खेचून आणली, ही आपल्यासारख्या सामान्यांना एक सर्वोच्च साध्य प्राप्त केल्याची, अंतिम ध्येयापर्यंत पोहोचल्याची घटना वाटते. मात्र नरेंद्र मोदींसारख्या राष्ट्रसमर्पित आदर्श व्यक्तीच्या दृष्टीने पंतप्रधानपद हे साध्य (Object) नसून ध्येयाप्रत जाण्याचे साधन (Tool) आहे हे आपण लक्षात ठेवा. भारत देशाला अत्यंत प्रगत राष्ट्र बनवून या जगातील एक महान शक्ती (Super Power) बनवणे हे नरेंद्र मोदींचे अंतीम ध्येय आहे, आणि पंतप्रधान पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून या ध्येयासाठी स्वत:ला संपूर्ण समर्पीत करून त्यांनी काम सुरू केले आहे. नरेंद्र मोदींसारख्या अलौकिक, संपूर्ण समर्पित व्यक्तीसारखे तुम्ही सर्वजण वागू शकला नाहीत तरी त्यांच्याकडून त्यांच्यातले असंख्य आदर्श गुण जरूर घ्या आणि आपल्या गुणांचा व कौशल्यांचा वापर शक्य होईल त्या प्रत्येक क्षणी आपल्या मातृभूमीच्या सेवेत जरूर करा. आपण सर्वांनी प्रयत्नपूर्वक नरेंद्र मोदींना साथ दिली तर आपला देश महानशक्ती (Super Power) निश्चितच बनेल.

✦✦

# संदर्भ सूची


| क्र. | पुस्तक/संदर्भ<br>(अ) पुस्तके | लेखक | प्रकाशक |
|---|---|---|---|
| १. | The Modi Effect | Lance Price | Hodder & Stoughton |
| २. | Narendra Modi - The man, the times | Nilanjan Mukhopadhyay | Tranquebar Press |
| ३. | The Namo - A Political Life | Kingshuk Nag | Roli Books |
| ४. | Narendra Modi - Yes, he can | D.P. Singh | Creatspace |
| ५. | Narendra Modi - The Architect of a modern State | M.V. Kamat | Times Group Books |
| ६. | Modi Nama | Madhu P. Kishwar | Manushi Publications |
| ७. | प्रेरणामूर्ती नरेंद्र मोदी | संगीता शुक्ला | डायमंड बुक्स |
| ८. | नरेंद्र मोदी - एक झंझावात | दादुमिया | उ. व. आपटे |
| ९. | विकास पुरुष नरेंद्र मोदी | डॉ. शरद कुंटे | स्नेहल प्रकाशन |
| | **(ब) वेबसाईट** | | |
| १०. | www.wikipedia.org | वेबसाईट | - |
| ११. | www.narendramodi.in | वेबसाईट | - |


✦✦